१	**१७/०८/२०२०**	**मे. सावी इंन्फीनेट प्रा. लि.**	**रु. २,७०,०६५.००/-**
२	१९/०८/२०२०	मे. इन्फोटेक सर्विसेस	रु. २,७६,८६१.०४/-
३	२०/०८/२०२०	मे. प्रोफेशनल नेटवर्क टेक्नोलॉजीस	रु.२,७४,७२४.०६/-

वरील प्राप्त दरपत्रकांची तुलनात्मक तक्त्याप्रमाणे दरांशी तुलना केली असता **मे. सावी इंन्फीनेट प्रा. लि.** यांच्या दरपत्रकातील दर सर्वात कमी व वाजवी असून सदरचे दर मंजूर करुन मंजूर दरानुसार प्रभाग समिती 'सी' मधील चंदनसार येथील कोव्हीड केंद्रामध्ये सि.सि.टि.व्ही यंत्रणा बसविणे कामी, त्यांच्याशी करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' मधील चंदनसार येथील कोव्हीड केंद्रामध्ये सि.सि.टि.व्ही यंत्रणा बसविणे कामी लघुत्तम निविदाकार मे. **सावी इंन्फीनेट प्रा. लि.** यांचे दर मंजूर करुन, संविदा करणेस व कार्यादेश देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ९६

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन
दिनांक :-०९/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पावसाळी नाले सफाई व रस्त्याच्या कडेला असणाऱ्या डेब्रीज उचलणे कामी १ पोकलेन, २ लाँग बुम, १ जेसीबी मशीन व १ ट्रेलर वाहन विभागाकडून खरेदी करुन मिळणेकामी पुनर्विलोकन करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जूलै २००९ मध्ये झाली असून महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ३११ चौ.कि.मी. एवढे विस्तीर्ण आहे. या शहराचे मोठया प्रमाणात शहरीकरण झाले आहे. शहराचे शहरीकरणामुळे शहरातील सांडपाणी वाहून नेणेकामी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A ते I मध्ये खालीलप्रमाणे नाल्यांची लांबी आहे.

अ.क्र.	प्रभाग समिती	नाल्यांची लांबी
१	A	४२.९२ कि.मी
२	B	७.७० कि.मी
३	C	१०.५० कि.मी
४	D	१२.८६ कि.मी
५	E	१९.०४ कि.मी
६	F	३४.८४ कि.मी
७	G	४१.३३ कि.मी
८	H	२३.१० कि.मी
९	I	१७.५० कि.मी
एकुण		२१०.१५ कि.मी

वरीलप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात २१०.१५ कि.मी. एवढे लांबीचे नाले असून सदरील नाले खोदाई करणे, गाळ काढणे, साफसफाई करणे करिता प्रभाग निहाय निविदा प्रक्रिया करुन पोकलेन, जेसीबी, ट्रेलर भाडे तत्वावर घेतले जातात. सदर कामे करणेकरिता १ महिन्याचा कालावधी देण्यात येतो. या एका महिन्या करिता संबंधित कंत्राटदार यांना अंदाजे ६ ते ७ कोटी भाडे द्यावे लागते. नालेसफाई करणेकामी

आजतागायत खालील प्रमाणे खर्च झाला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	आर्थिक वर्ष	खर्च (लाखात)
१	सन २०१७-१८	रु.१९८.८८
२	सन २०१८-१९	रु.३८७.९७
३	सन २०१९-२०	रु.९२८.७३

तरी नालेसफाई करणेकामी महानगरपालिकेचा मोठया प्रमाणात खर्च होत असल्याने मा.आयुक्त सो. यांच्या सुचनेनुसार पोकलेन, जेसीबी, ट्रेलर हे महानगरपालिकेचे असल्यास त्यांचा आवश्यकतेनुसार नाले सफाई व्यतिरिक्त शहरातील अनधिकृत बांधकामे तोडण्याकरिता वर्षभर सदर वाहनांची आवश्यकता असल्याने सदर कामासाठी देखील मनपाच्या मालकीची मशिन वापरल्यास खर्चात बचत होणार असल्याने सदरची मशिनरी खरेदी करणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

त्यानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नाले सफाई करणेकामी व अतिक्रमण तोडणेकामी खालीलप्रमाणे वाहनांची आवश्यकता आहे.

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	वाहनांची संख्या	दर
१	बॅकहो लोडर (जेसीबी)	२	रु.६०,००,०००/-
२	एक्सांवेटर (पोकलेन) (२० टन क्षमतेचा)	१	रु.५५,००,०००/-
३	एक्सांवेटर (लॉंग बुम) (२० टन क्षमतेचा)	२	रु. १,४०,००,०००/-
४	ट्रेलर	१	रु.४५,००,०००/-
५	ब्रेकर	१	रु.१५,००,०००/-
एकुण		६	रु.३,१५,००,०००/-

वरीलप्रमाणे विविध कंपन्याचे निरनिराळे दर बाजारामध्ये उपलब्ध आहेत. त्यातील नामांकित कंपनीचे दर घेऊन प्रस्तावित केले आहेत. सदरील वाहने खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम **रु.३,१५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तीन कोटी पंधरा लक्ष मात्र)** एवढा खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च

वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी या लेखाशिर्षाखाली करणे आवश्यक आहे. परंतु सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाच्या लेखाशिर्ष अंतर्गत रक्कम रु. २ कोटी इतकी तरतुद होती. सदर तरतुदीतुन रक्कम रु. १ कोटी ८३ लक्ष एवढा खर्च झाला असुन रक्कम रु. १७ लक्ष एवढी शिल्लक आहे. त्यामुळे सदरील लेखाशिर्षावर प्रस्तावित नमुद केलेल्या वाहन खरेदीसाठी पुरेशी रक्कम शिल्लक नाही. त्याचबरोबर धनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० टन क्षमतेचे २ पोकलेन मशीन खरेदी करणेबाबत यापुर्वी मंजुरी दिलेली असुन त्याचा अपेक्षित खर्च रक्कम रु. १ कोटी २० लक्ष आहे.

करीता "नालेसफाई/नालेखोदाई" या लेखाशिर्षा अंतर्गत असलेल्या २० कोटी तरतुदी मधुन ५ कोटी एवढी रक्कम "वाहन खरेदी/रोडरोलर खरेदी" या लेखाशिर्षावर वर्ग करण्याच्या पुर्नविलोकनाचा प्रस्ताव प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पावसाळी नाले सफाई, अतिक्रमण हटविणेच व रस्त्याच्या कडेला असणाऱ्या डेब्रीज उचलणेकामी १ पोकलेन, २ लॉग बुम, २ जेसाबी मशीन, १ ब्रेकर व १ ट्रेलर तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता २ नग २० टन क्षमतेचे पोकलेन खरेदी करणे आवश्यक आहे. आवश्यक वाहने खरेदीसाठी सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील "वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी" या लेखाशिर्षाखाली पुरेशी तरतुद शिल्लक नसल्यामुळे सदरील लेखाशिर्षावर खर्च भागविणेकामी आवश्यक तरतुद करणे आवश्यक आहे. करिता "नालेसफाई/नालेखोदाई" या लेखाशिर्षाखाली रक्कम रु. २० कोटी इतक्या तरतुदीमधुन रक्कम रु. ५ कोटी इतकी तरतुद "वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी" या लेखाशिर्षावर वर्ग करण्याचा पुनर्विलोकनाच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ९७

विभाग :- आरोग्य विभाग

दिनांक :-०९/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पावसाळी नाले सफाई व रस्त्याच्या कडेला असणाऱ्या डेब्रीज उचलणे कामी २ बॅकहो लोडर (जेसीबी), १ एक्सांवेटर (पोकलेन -२० टन क्षमतेचा), २ एक्सांवेटर (लॉग बुम -२० टन क्षमतेचा), १ ट्रेलर व १ ब्रेकर वाहन विभागाकडून खरेदी करुन मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जूलै २००९ मध्ये झाली असून महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ३११ चौ.कि.मी. एवढे विस्तीर्ण आहे. या शहराचे मोठया प्रमाणात शहरीकरण झाले आहे. शहराचे शहरीकरणामुळे शहरातील सांडपाणी वाहून नेणेकामी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A ते I मध्ये खालीलप्रमाणे नाल्यांची लांबी आहे.

अ.क्र.	प्रभाग समिती	नाल्यांची लांबी
१	A	४२.९२ कि.मी
२	B	७.७० कि.मी
३	C	१०.५० कि.मी
४	D	१२.८६ कि.मी
५	E	१९.०४ कि.मी
६	F	३४.८४ कि.मी
७	G	४१.३३ कि.मी
८	H	२३.१० कि.मी
९	I	१७.५० कि.मी
एकुण		२१०.१५ कि.मी

वरीलप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात २१०.१५ कि.मी. एवढे लांबीचे नाले असून सदरील नाले खोदाई करणे, गाळ काढणे, साफसफाई करणे करिता प्रभाग निहाय निविदा प्रक्रिया करुन पोकलेन, जेसीबी, ट्रेलर भाडे तत्वावर घेतले

जातात. सदर कामे करणेकरिता १ महिन्याचा कालावधी देण्यात येतो. या एका महिन्या करिता संबंधित कंत्राटदार यांना अंदाजे ६ ते ७ कोटी भाडे द्यावे लागते. नालेसफाई करणेकामी आजतागायत खालील प्रमाणे खर्च झाला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	आर्थिक वर्ष	खर्च (लाखात)
१	सन २०१७-१८	रु.१९८.८८
२	सन २०१८-१९	रु.३८७.९७
३	सन २०१९-२०	रु.९२८.७३

तरी नालेसफाई करणेकामी महानगरपालिकेचा मोठया प्रमाणात खर्च होत असल्याने मा.आयुक्त सो. यांच्या सुचनेनुसार पोकलेन, जेसीबी, ट्रेलर हे महानगरपालिकेचे असल्यास त्यांचा आवश्यकतेनुसार नाले सफाई व्यतिरिक्त शहरातील अनधिकृत बांधकामे तोडण्याकरिता वर्षभर सदर वाहनांची आवश्यकता असल्याने सदर कामासाठी देखील मनपाच्या मालकीची मशिन वापरल्यास खर्चात बचत होणार असल्याने सदरची मशिनरी खरेदी करणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

त्यानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नाले सफाई करणेकामी व अतिक्रमण तोडणेकामी खालीलप्रमाणे वाहनांची आवश्यकता आहे.

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	वाहनांची संख्या	दर
१	बॅकहो लोडर (जेसीबी)	२	रु.६०,००,०००/-
२	एक्सांवेटर (पोकलेन) (२० टन क्षमतेचा)	१	रु.५५,००,०००/-
३	एक्सांवेटर (लॉग बुम) (२० टन क्षमतेचा)	२	रु.१,४०,००,०००/-
४	ट्रेलर	१	रु.४५,००,०००/-
५	ब्रेकर	१	रु.१५,००,०००/-
एकुण		७	रु.३,१५,००,०००/-

वरीलप्रमाणे विविध कंपन्याचे निरनिराळे दर बाजारामध्ये उपलब्ध आहेत. त्यातील नामांकित कंपनीचे दर घेऊन प्रस्तावित केले आहेत. तरी सदरील वाहने खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.३,१५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तीन कोटी पंधरा लक्ष मात्र) एवढा खर्च अपेक्षीत आहे. तरी सदरील कामी होणारा खर्च सन २०२०-२१ या

वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील **वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी** या लेखाशिर्षाच्या अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून भागविता येईल. तरी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पावसाळी नाले सफाई, अतिक्रमण हटविणेस व रस्त्याच्या कडेला असणाऱ्या डेब्रीज उचलणे कामी २ बॅकहो लोडर (जेसीबी), १ एक्सांवेटर (पोकलेन -२० टन क्षमतेचा), २ एक्सांवेटर (लॉग बुम -२० टन क्षमतेचा), १ ट्रेलर व १ ब्रेकर वाहन विभागाकडून खरेदी करणेकामी रक्कम **रू.३,१५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तीन कोटी पंधरा लक्ष मात्र)** एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. -पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फ्लॅक्स - ०२५०-२५२५१०७.
ई-मेल -vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९८

विभाग : प्रभाग समिती 'एच'
दिनांक : ११ / ०९ /२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रात व्यवसाय करणा-या फ़ेरीवाल्यांकडून दैनंदिन बाजार शुल्क गोळा करण्यासाठी ठेकेदार नियुक्त करण्यासाठी (माहे ऑक्टोंबर २०२० ते माहे मार्च २०२२) वार्षीक ई- निवीदा बाबत प्रक्रिया करणेंस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे बाबत

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रात अंबाडीरोड मार्केट, विश्वकर्मानगर जवळ, दिनदयाळनगर मार्केट, स्टेशनरोड, माणिकपुर नाका, स्टेला या ठिकाणी फ़ेरीवाले व्यवसाय करित आहेत. प्रभाग समिती एच मध्ये एकही आठवडा बाजार भरत नाही. दैनंदिन व्यवसाय करणा-या फ़ेरीवाल्यां कडून पुर्वी पासून महापालिका कर्मचा-यांकडून प्रत्येक फ़ेरीवाल्यांकडून र. रू.१०/- बाजार शुल्क गोळा केले जात आहे. प्रभाग समिती एच मध्ये फ़ेरीवाल्यांकडून बाजार शुल्क गोळा करण्यासाठी आजतागायत ठेकेदार नियुक्त करणेसाठी निवीदा मागविलेल्या नाहीत. वरील महानगर पालिका कर्मचा-यांच्या मार्फ़त सन २०१७ - १८ पासून खालील प्रमाणे दैनंदिन बाजार शुल्क गोळा केले आहे.

सन	महापालिका कर्मचा-यांकडून गोळा केलेले बाजार शुल्क	१०% वाढ करुन येणारी रक्कम
२०१७ - १८	रू.२०,३१,४००/-	रू.२२३४५४०/-
२०१८ - १९	रू.२०,५२,३९७/-	रू.२२५७६३७/-
२०१९ - २०	रू.१९,४८,७२०/-	रू.२१४३५९२/-
२०२० - २१ ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत (०५ महिन्यासाठी)	रू. २१९५०/- एप्रिल २०२० रू.४५६६०/- मे २०२० रू.४७०९०/- जुन २०२० रू.४९०००/- जुले २०२० रू.५५९८०/- ऑगस्ट २०२० एकुण रू.२,१९,६८०/-	

कोवीड १९ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी संपुर्ण देशात २२ मार्च २०२० पासून लॉकडाऊन जाहीर केले होते. त्यामुळे इतर वर्षांच्या मानाने मार्च २०२० पासूनची बाजार शुल्क वसुली कमी आहे. तसेच महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फ़त वेळोवेळी कारवाई होत असते. त्यामुळेही दैनंदिन बाजार शुल्क वसुली कमी होत असते.

प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रात व्यवसाय करणा-या फ़ेरीवाल्यांकडून दि.०१ ऑक्टोंबर २०२० ते दि.३१ मार्च २०२२ (१८ महिने) या कालावधी साठी दैनंदिन बाजार शुल्क वसुली ठेका देणे साठी ठेकेदार नियुक्त करावयाचा आहे. मागील सन २०१९ - २० च्या मध्ये रू. १९,४८,७२०/- प्रत्यक्ष बाजार शुल्क वसुल

झालेली आहे. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर सन २०१९ - २० मध्ये बाजार शुल्क वसुली कमी झालेली आहे. त्या रक्कमेवर १०% वाढ गृहीत धरून र. रु.२१४३५९२/- इतकी अपेक्षीत रक्कम होत आहे. सन २०२१ - २२ साठी र. रु.२१४३५९२/- रक्कमेवर १०% वाढ गृहीत धरून र. रु.२३५७९५१/- इतकी अपेक्षीत रक्कम होत आहे. सदर रक्कम गृहीत धरून वृत्तपत्रात जाहीर ई निवीदा सुचना प्रसिध्द करून प्रभाग समिती एच मध्ये दैनंदिन बाजार शुल्क वसुली करणेसाठी ठेकेदार नियुक्त करणेंस ई निवीदा मागविणेंस व मंजुर रक्कमेवर १८% जीएसटी आकारणेंस तसेच नवीन ठेकेदार नियुक्त होऊन त्यास कार्यादेश देई पर्यंत महापालीका कर्मचा-यांकडून दैनंदिन बाजार शुल्क वसुली करणेंस मंजुरी मिळावी. तसेच सद्यस्थित बाजार पावती पुस्तके संपलेली आहेत.त्यामुळे दि.७.९.२०२० पासून बाजार शुल्क वसुली ठप्प झालेली आहे. मुख्यालयातील भांडार विभागाकडून पावती पुस्तके उपलब्ध होऊ शकली नाही. तरी प्रभाग समिती एच बाजार विभागासाठी १५०० पावती पुस्तके लवकरांत लवकर उपलब्ध होणेस मंजूरी मिळावी.

.....

ठराव निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रात व्यवसाय करणा-या फ़ेरीवाल्यांकडून दैनंदिन बाजार शुल्क वसुल करणे कामी ठेकेदार नियुक्त करण्यासाठी दि.०१ ऑक्टोंबर २०२० ते दि.३१ मार्च २०२२ (१८ महिने) या कालावधी साठी रु.२५,००,०००/- या अपेक्षीत रक्कमेवर वार्षीक ई- निवीदा मागविणेंस व मंजुर रक्कमेवर जीएसटी आकारणेंस तसेच नवीन ठेकेदार नियुक्त होऊन त्यास कार्यादेश देई पर्यंत महापालीका कर्मचा-यांकडून दैनंदिन बाजार शुल्क वसुली करणेंस तसेच प्रभाग समिती एच बाजार विभागासाठी १५०० पावती पुस्तके पुरविणेंस महाराष्ट्र महानगर पलिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

11/9/2020

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९९ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ३१/०९/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ च्या सुरुवातीस व महाराष्ट्रातील संचारबंदीच्या कालावधीत वैद्यकीय आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना राहण्यासाठी उपलब्ध करुन दिलेल्या अधिग्रहीत हॉटेल्सचे देयक अदा करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च,२०२० पासून लागू करुन यामधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली असून शासन अधिसूचनेच्या नियम १० नुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड -१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना करताना संचारबंदीमुळे लोकल व सार्वजनिक वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले होते. यानुसार महानगरपालिकेने कोव्हीड-१९ विषाणूंचे उपचारासाठी कार्यक्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी अलगीकरण व विलगीकरण कक्ष तयार करणेत आले. हे सर्व कामकाज व वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत येणारी रुग्णालये,माता बाल संगोपन केंद्रे,दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभागातील कामकाज ही सेवा आवश्यक असल्याने संपूर्ण कामकाज कालमर्यादेत करणे आवश्यक होते. त्यामुळे महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना संचारबंदीमुळे आपल्या निवासस्थानापासून कार्यालय/रुग्णालय/कोव्हीड केअर सेंटर येथे जाणे-येणे शक्य होत नसल्याने तसेच महानगरपालिकेच्या हद्दीमधील हॉटेल्स व्यवस्था बंद असल्याने वरील संदर्भिय विषयांन्वये त्यांना राहण्यासाठी व जेवणासाठी (खानपान व्यवस्था) महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरील संदर्भिय क्र. १. मा.जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पालघर यांचे कार्यालयाकडील क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोनाविषाणू/तालुकावसईअलगीकरण/कावि-२३३/२०दि.२०/०३/२० रोजीचा आदेश. २. मा.जिल्हाधिकारी पालघर तथा आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांचे जावक क्र.२३४९ दि.२९/०३/२०२० रोजीचा आदेश. ३. मा.जिल्हाधिकारी पालघर तथा आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकार्यालयाकडील क्र. जि. आ. व्य. पालघर /कोरोना विषाणू/ मनपा हॉटेल आदेश /कावि - ४१७/२० दि.०५/०४/२०२० रोजीच्या आदेशानुसार ही हॉटेल्स अधिग्रहीत करण्यांत आली

118

होती. सदर हॉटेल्स मध्ये वैद्यकीय आरोग्य विभागातील व शासनाकडील महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी हॉटेलमध्ये राहुन खानपानाचा वापर केलेला असल्याने हॉटेल्समार्फत देयकांची मागणी या कार्यालयास करण्यांत आलेली आहे.

याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ (क्रमांक ५९) अनुसूची (ड) प्रकरण ५.२.२ व ६७(३) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांना असलेल्या अधिकारान्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेल्या आदेशानुसार वरील सर्व हॉटेल्स धारकांना वरील तक्त्यात नमुद केलेली मागणी रक्कम ही जास्त असल्याने मागणी केलेल्या देयकाच्या ४०% इतके रक्कमेचे खालील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे देयक अदा करणेस सांगितलेनुसार सदरचे उपरोक्त देयक रु.३७,३५,६५५.९३/- रक्कम अदा करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	हॉटेलचे नाव	बील रक्कम	देय असलेली (मुळ मागणी देयकाची ४०% रक्कम)
१.	रॉयल गार्डन, मुंबई-अहमदाबाद हायवे.	४८,७०,६००/-	१९,४८,२४०/-
२.	हॉटेल साई-रेसिडेन्सी वालीव फाटा, सातिवलीरोड, वसई(पूर्व)	२,६४,१८७.८४/-	१०५६७५.१३/-
३.	हॉटेल वेर्स्टन-इन ग्रीन वॅली, सांडोर, वसई(प.)	५,५०,०००/-	२,२०,०००/-
४.	हॉटेल गॅलेक्सी वैभव पारनाका,वसई (प.)	७,८३,५५२/-	३,१३,४२०.८/-
५.	हॉटेल सनशाईन रेसिडेन्सी अहमदाबाद हायवे मालजीपाडा, लोढा धाम, वसई (पूर्व)	२,७०,०००/-	१,०८,०००/-
६.	हॉटेल रुद्र शेल्टर, तुंगारेश्वर फाटा,सातिवली,वसई(पूर्व)	१९,२५,८००/-	७,७०,३२०/-
७.	सिल्वर ऑक्स रेसिडेन्सी, गणेश नगर, नगिनदासपाडा, नालासोपारा (पूर्व)	६,७५,०००/-	२,७०,०००/-
	एकुण	९३,३९,१३९.८४/-	३७,३५,६५५.९३/-

Rikvi
1/8

सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात "नैसर्गिक आपत्ती व इतर " या लेखाशिर्षाखाली रु.१,५०,००,०००/- इतकी तरतुद केलेली आहे. सदर तरतूद कोव्हिड-१९ च्या विविध खर्चात संपली आहे. करिता लेखार्शिष रस्ते बांधकाम या मध्ये ६०,००,००,०००/- तरतुद असून त्यातील १०,००,००,०००/- हे नैसर्गिक आपत्ती व इतर या लेखार्शिषात घेतल्यास ११,५०,००,०००/- तरतुद होईल व सदर तरतुदी मधून बिलाचा खर्च रु. ३७,३५,६५५.९३/- संबंधीतांना महानगरपालिका निधीतून अदा करणेकामी सदरचा विषय प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना राहण्यासाठी उपलब्ध करुन दिलेल्या अधिग्रहीत हॉटेल्सचे देयक रक्कम रु. ३७,३५,६५५.९३/- (अक्षरी- सदत्तीस लक्ष पस्तीस हजार सहाशे पंच्चावन्न रुपये त्र्याण्यव पैसे मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ९००

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन
दिनांक :३१/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहराचे स्वच्छ सर्व्हेक्षण २०२१ व City Livability २०२० मुल्यांकना कामी अनुभवी शहर समन्वयक कंत्राटीतत्वावर नेमण्यास व या कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केंद्र शासनामार्फत देशातील एकुण ४०१४ शहरामंध्ये स्वच्छ सर्व्हेक्षण दरवर्षी होत असुन महाराष्ट्र राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्वच्छ सर्व्हेक्षण कार्यक्रम दरवर्षी हाती घेण्यांत येत आहे. तसचे ह्या अंतर्गत शहरांची प्रगती तपासण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी स्वच्छ सर्व्हेक्षण व City Livability Survey अंतर्गत Ease of Living सर्वेक्षण सुरु करण्यात आले असून महानगरपालिका क्षेत्राचा राहणीमानाचा दर्जाचे मुल्यमापन करुन केंद्र शासनामार्फत निकाल व क्रमांक प्रेक्षेपीत करण्यांत येत आहेत. मागील वर्षाची स्वच्छ सर्व्हेक्षण व City Livability Survey मधील कामगारी खालील प्रमाणे आहे.

वर्षे	स्वच्छ सर्वेक्षण	कामगिरी व प्रमाणपत्र	City Livability Index	शेरा
सन २०१६-१७	२०१७	१३९	-	-
सन २०१७-१८	२०१८	देशातील ४२०३ शहरांमध्ये ८१ क्रमांक	देशातील ११४ शहरांमध्ये २० क्रमांक	शहर समन्वयक यांची नियुक्ती करण्यांत आली होती.
सन २०१८-१९	२०१९	१) देशातील ४२३७ शहरांमध्ये ३६ क्रमांक २) 3 Star GFC Certification ३) ODF Certification	सर्वेक्षण पुर्ण झाले असून अंतिम निकष जाहिर होणे बाकी आहे.	
सन २०१९-२०	२०२०	१) देशातील ४,२४२ शहरांमध्ये ३२ वा क्रमांक	-	

		२) GFC, 1 Star प्राप्त ३) ODF Recertified		

स्वच्छ सर्व्हेक्षणा अंतर्गत नमुद घटक उत्कृष्टरित्या विहित कालावधीत पुर्ण करुन राष्ट्रीय पातळीवर उच्चतम क्रमांक मिळवण्याकरीता शासनाने सन २०१८ मध्ये कंत्राटी तत्वावर कु. दिपाली वा. पाटलेकर यांची City Co-ordinator म्हणुन या महापालिकेत नियुक्ती केली होती. तसेच City Livability Survey अंतर्गत सौ. श्वेता एस माने यांची City Co-ordinator म्हणुन नियुक्ती करण्यांत आली होती.

वरील दोन्ही व्यक्तीच्या सेवा वसई विरार शहर महानगरपालिकेसाठी उपयुक्त ठरल्याने मा.स्थायी समिती सभा दि. १८/०६/२०१९ ठ.क्र. ४२ अन्वये सन २०१८-१९ करिता महापालिकेने वरिल दोन्ही समन्वयकांना ६ महिन्यांकरीता कंत्राटी तत्वावर रु. ५५,०००/- प्रत्येकी ठोक वेतनावर नियुक्ती केली होती. मा.स्थायी समिती सभा दि. ०५/०९/२०१९ ठराव क्र. २४० अन्वये फक्त कु. दिपाली वा. पाटलेकर , शहर समन्वयक यांना फेब्रुवारी २०२० पर्यंत मुदतवाढ देवुन नियुक्ती करण्यात आली होती. City Livability Assessment २०१९ चे काम सुरु असता शहर समन्वयक कु.दिपाली वा.पाटलेकर यांची महापालिकेस आवश्यकता असल्या कारणाने मा.स्थायी समिती सभा दि.२२/०५/२०२० ठराव क्र.५६ अन्वये स्वच्छ सर्वेक्षण २०२१ व City Livability मुल्यांकना कामी पुढील मुदतवाढ देण्यात आली होती व त्यांची मुदत दि.३१/०८/२०२० रोजी संपुष्टात येणार आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२१ व City Livability मुल्यांकनाकामी दोन शहर समन्वयकांची आवश्यकता असून कु.दिपाली वा.पाटलेकर तसेच अन्य एक शहर समन्वयक शासनाकडून मागणी केल्यास गैरसोय टाळण्यास मदत होणार आहे. शहर समन्वय म्हणून ६ महिन्या करिता कंत्राटी तत्वावर नियुक्ती केल्यास त्यांच्या सेवेचा व अनुभवाचा निश्चित महापालिकेस फायदा होणार आहे.

खालीलप्रमाणे काम शहर समन्वयक यांच्याकडून करुन घेण्यात येत असून पुढील आवश्यक कामे करण्यासाठी त्यांची आवश्यकता महानगरपालिकेस आहे

- **स्वच्छ भारत अभियान २०२०-२१ अंतर्गत खालील कामे आहेत.**

१) MIS - केंद्र शासनाच्या माहिती व्यवस्थापन प्रणालीवर मासिक अहवाल अद्यावत करणे व तसेच राज्य शासनास वेळोवेळी अहवाल सादर करणे.

२) ODF+ - हगणदारी मुक्त शहराची माहिती , दस्ताऐवज व मुल्यांकन सहामाही अद्यावत करुन केंद्र व राज्य शासनास अहवाल सादर करणे

३) GFC - कचरामुक्त शहराची माहिती दस्ताऐवज व मुल्यांकन करुन वार्षिक अहवाल तयार करुन केंद्र शासनास सादर करणे .

४) SS२०२१ - स्वच्छ सर्वेक्षण २०२१ माहिती दस्ताऐवज व मुल्यांकन करुन तीमाही अहवाल तयार करुन केंद्र शासनास सादर करणे . (जुन, सप्टेंबर, डिसेंबर, जानेवारी)

- **स्मार्ट सिटी अंतर्गत City Liveability Assessment २०१९ ची खालील कामे आहेत.**

१) EOL - शहरातील सुलभ राहणीमान निर्देशांक दस्ताऐवज तयार करणे व मुल्यांकन अहवाल तयार करुन केंद्र शासनास सादर करणे .

२) MPI - महानगरपालिकेची कमगीरी निर्देशांक दस्ताऐवज तयार करणे व मुल्यांकन अहवाल तयार करुन केंद्र शासनास सादर करणे .

वरिल प्रमाणे कु. दिपाली वामन पाटलेकर यांना कंत्राटीतत्वारी ६ महिन्यांकरीता नेमणुकीस रक्कम रु.५५,०००/- व अन्य एक शहर समन्वयक शासनाकडुन मागविल्यास शासनाने मंजूर व निश्चित केलेल्या वेतनानुसार रक्कम रु. ३५,०००/- या प्रमाणे ६ महिन्यांकरिता रु.५,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदर खर्च सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील **"साफसफाई स्थायी आस्थापना"** या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद **रु.१९ कोटी** मधून भागविणे शक्य आहे.

तरी स्वच्छ सर्व्हेक्षण अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ नुसार सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.०२ सप्टेंबर २०२० ते दि.२८ फेब्रुवारी २०२१ कु. दिपाली वामन पाटलेकर यांची "शहर समन्वयक" म्हणुन नेमणुक करण्यास व अन्य एक शहर समन्वयक यांची मागणी शासनाकडे करुन त्यांची नियुक्ती करण्यास व येणाऱ्या खर्चास कलम ७३ (ड) नुसार खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :-

उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवुन असे ठरविण्यांत आले की, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहराचे स्वच्छ सर्व्हेक्षण व City Livability मुल्यांकनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ नुसार कु. दिपाली वामन पाटलेकर यांना दि.०२ सप्टेंबर २०२० ते दि.२८ फेब्रुवारी २०२१ कंत्राटीतत्वावर ६ महिन्यांकरीता केलेल्या नेमणुकीस व अन्य एक शहर समन्वयक शासनाकडुन मागविण्यास तसेच नियुक्तीस व येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक / आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९०९ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १५/०९/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास Inj.Remdesivir 100 mg विनानिविदा खरेदी करणेस आदेश देणेकामी व त्याकामी येणाऱ्या खर्चाचे अग्रीम देयक अदा करणेकामी प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, [illegible] नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ माताबाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. [illegible] सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी [illegible] गार्सिया कॉलेज, वसई येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, अग्रवाल हॉस्पिटल-वसई पूर्व, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट येथे विलगलीकरण कक्ष व म्हाडा बिल्डींग नं.१० येथे कोविड केअर सेंटर स्थापन करण्यात आले असून चंदनसार येथिल श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे नव्याने कोविड रुग्णालय स्थापन करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये करोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. [illegible] रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन [illegible] परंतु काही वेळा जीवनावश्यक असलेल्या औषधांचे दर ई-निविदेत मंजुर नसल्याने [illegible] करणे गैरसोयीचे होते. चंदनसार येथिल श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे कोविड रुग्णांकरीता जीवनावश्यक असणारे Inj.Remdesivir 100 mg ची आवश्यकता आहे. सदरची औषधे मे.मायलॅन लॅबोरेटरीज लिमिटेड, बॅंगलोर यांच्याकडे उपलब्ध असून याबाबतच्या दराचा व मागणीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.क्र.	औषधाचे नाव	मुळ किंमत	दर निश्चिती नंतरची किंमत	मागणी	एकूण रक्कम (सर्व करासहित)
1	j.Remdesivir 100 mg	4,000	2626.4	1 x 300	7,87,920
				Total	7,87,920/-

तरी मे.मायलॅन लॅबोरेटरीज लिमिटेड, बॅंगलोर यांनी १००% अग्रीम देयकाची मागणी केली आहे. सद्यस्थितीत त्यांच्याकडे उपलब्ध असलेला इंजेक्शनचा साठा कमी प्रमाणात

असून कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता सदर इंजेक्शन त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास ३०० नग Inj.Remdesivir 100 mg खरेदी करणे कामी रू.७,८७,९२०/- इतका खर्च अपेक्षित असून "रुग्णालय औषधे खरेदी" या लेखाशिर्षाखालील नमुद शिल्लक रक्कम रू.३,९७,६३,५९९/- या तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे. तरी सदरची औषधे विनानिविदा खरेदी करणे कामी मे.मायलॅन लॅबोरेटरीज लिमिटेड, बॅंगलोर यांना पुरवठा आदेश व येणाऱ्या खर्चाचे अग्रीम देयक अदा करणेकामी प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबतच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ (क्र.५९) ५.२.२ व ६७ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त Inj.Remdesivir 100 mg खरेदी करण्यास येणाऱ्या रक्कम रू.७,८७,९२०/- (अक्षरी- सात लाख सत्याऐंशी हजार नऊशे विस रुपये मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

15/9/2020.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ४०२

विभाग :- विधी

दिनांक २५/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई दिवाणी न्यायालय व जिल्हा न्यायालयात वसई-विरार शहर महानगरपालिकेची बाजू मांडण्यासाठी नियुक्त वकीलांच्या (विधीतज्ञ) फी धोरणाबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि.३ जुलै २००९ रोजी वसई तालुक्यातील वसई, नालासोपारा, नवघर-माणिकपूर, विरार या ४ नगरपरीषदा व ५३ गामपंचायती मिळून करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेचे एकुण क्षेत्रफळ अंदाजे ३११ चौ.कि.मी.चे असुन सद्यपरिस्थितीत महानगरपालिकेची लोकसंख्या अंदाजे २२ लक्ष पर्यंत पोहोचलेली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या ही १२२२३५० इतकी होती. यावरून महानगरपालिकेच्या लोकसंख्या वाढीचा दर हा साधारणत: दुपटीने आहे असे निदर्शनास येते.

वाढती लोकसंख्या व भौगोलिकदृष्ट्या लाभलेले मोठे क्षेत्रफळ या बाबींमुळे शहरात अनधिकृत बांधकाम व इतर वादविवादांची प्रकरणे ही मोठ्या प्रमाणात आहेत. वाढत्या अनाधिकृत बांधकामांवर अंकुश ठेवणेसाठी महानगरपालिकेमार्फत करावव्या लागणाऱ्या कायदेशिर कारवाईच्या विरोधात विकासक वसई दिवाणी न्यायालयात दावा दाखल करीत असतात. तसेच महानगरपालिका नवीन असल्यामुळे गामपंचायत क्षेत्रातुन महानगरपालिका क्षेत्रात समावेश झालेल्या जिल्हा परिषद क्षेत्रात समावेश झालेल्या परिसरातुन जमिनीवरून व जमिनीच्या हद्दीवरून अनेक दावे न्यायालयात दाखल होत असतात. यात काही ठिकाणी महानगरपालिकेला पक्षकार केले जाते. या बाबींचा विचार करून महानगरपालिकेने आपली बाजू वसई दिवाणी न्यायालयात सक्षमपणे मांडण्यासाठी प्रशासकिय ठराव क्र.२७ दि.१२/०८/२००९ अन्वये वसई येथिल दिवाणी न्यायालयाचे कामकाज पाहण्यासाठी विधीतज्ञ मंडळ नियुक्त करण्याचे निश्चित केले होते. त्यानुसार खालील विधीतज्ञ महानगरपालिकेच्या विधीतज्ञ मंडळावर (पॅनलवर) कार्यरत होते.

१. ॲड.श्री.दिगंबर देसाई
२. ॲड.श्रीम.साधना धुरी
३. ॲड.श्री.संतोष खळे
४. ॲड.श्री.योगेश विरारकर
५. ॲड.श्री.जयेश घरत
६. ॲड.श्रीम.पुनम मोरे

महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.०४ दि.१३/१०/२०१७ अन्वये उपरोक्त विधीतज्ञांची नियुक्ती रद्द करून नविन विधी तज्ञ पॅनेलवर नियुक्त करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार प्रक्रीया राबवून वसई दिवाणी न्यायालयातील कामकाज पाहण्यासाठी नव्याने खालील विधी तज्ञांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

१. ॲड.श्री.संतोष खळे
२. ॲड.श्री.योगेश विरारकर
३. ॲड.श्री.पुष्पक राऊत
४. ॲड.श्री.स्वप्नील भदाणे

वरील विधीतज्ञांची नियुक्ती करीत असताना ॲड.श्री संतोष खळे व ॲड.श्री.योगेश विरारकर यांची फेरनियुक्ती करण्यात आलेली आहे. वसई दिवाणी न्यायालयातील जुन्या पॅनलवरील वकीलांच्या दाव्याची सन २०१७ ची स्थिती खालीलप्रमाणे;

अ.क्र.	वकीलांचे नाव	एकुण दावे	स्थगिती असलेले दावे	स्थगिती नसलेले दावे	प्रलंबित	निकाली
१	ॲड.श्री.दिगंबर देसाई	१०८८	१३५	१७२	६६६	४२२
२	ॲड.श्रीम.साधना धुरी	३७०	२००	४९	३३५	३५
३	ॲड.श्री संतोष खळे	१३१	३९	३४	१३०	१
४	ॲड.श्री.योगेश विरारकर	०	०	०	०	०
५	ॲड.श्री.जयेश घरत	०३	०	०	०३	०
६	ॲड.श्रीम.पुनम मोरे	०	०	०	०	०
एकुण		१५९२	३७४	२५५	११३४	४५८

उपरोक्त तक्त्यातील ॲड.श्री.दिगंबर देसाई, ॲड.श्रीम.साधना धुरी व ॲड.श्री.जयेश घरत यांचेकडे प्रलंबित दाव्यांची संख्या अनुक्रमे ६६६, ३३५ व ०३ अशी होती. तदनंतर या विधी तज्ञांची नियुक्ती रद्द केल्यामुळे नव्याने नियुक्त केलेल्या विधीतज्ञांकडे प्रलंबित दाव्यांपैकी काही जुने दावे चालविण्यासाठी देण्यात आले.

परंतू जुने विधीतज्ञ मंडळ (पॅनल) रद्द करून नविन विधीतज्ञ मंडळ (पॅनल) नियुक्त करतेवेळी विधी तज्ञांना जुने दावे हस्तांतरीत केले तर कशाप्रकारे फी अदा करता येईल याबाबतचा स्पष्ट उल्लेख मा.सर्वसाधारण सभा दि.१३/१०/२०१७ चे ठराव क्र.०४ मध्ये दिसुन येत नाही. त्यामुळे ज्या विधीतज्ञांना जुने दावे हस्तांतरीत केलेले आहेत त्यांना मंजूर फी पैकी निम्म्या फी मध्ये काम करावे लागत आहे. कारण संदर्भ क्र.१ नुसार यापूर्वीच्या विधीतज्ञांनी दाव्याचा वकालतनामा व लिखीत विधान न्यायालयात सादर करून दाव्याची निम्मी फी घेतलेली आहे. त्यामुळे नवीन विधीतज्ञांनी दाव्यांच्या फी मध्ये पुर्वलक्षी प्रभावाने वाढ करून मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिका अदा करीत असलेल्या दिवाणी व जिल्हा न्यायालयाच्या वकीलांचे 'फी' दर पुढीलप्रमाणे आहेत .

अ.क्र.	दाव्याचा प्रकार	दाव्याचा टप्पा	टप्पानिहाय अदा करावयाची फी	दाव्याबद्दलची एकुण फी
१	मनपाविरूध्द दाखल दिवाणी दावे दाव्यामध्ये लेखी कथन झाल्यानंतर ५0% रक्कम	Filling of VP Rs.2000/- Filling of W.S. Rs.3000/- Arg. On injunction Rs.3000/- Cross Examination Rs.2500/- Arg. On Disposal of Suit Rs.5000/- Rs.200/- per date in J.D. Court Rs.300/- per date in S.D. Court	४000/-	एकुण रक्कम रूपये ८000/-
	दाव्यामध्ये अंतिम निर्णयानंतर साक्षांकीत प्रत प्राप्त झाल्यानंतर ५0% रक्कम		४000/-	
२	मनपाच्या वतीने अपिल दाखल करण्याकरीता दाखल झाल्यानंतर ५0% रक्कम	Filling of VP Rs.2000/- Filling of W.S. Rs.3000/- Arg. On injunction Rs.3000/- Cross Examination Rs.2500/- Arg. On Disposal of Suit Rs.5000/- Rs.200/- per date in J.D. Court Rs.300/- per date in S.D. Court	४000/-	एकुण रक्कम रूपये ८000/-
	अपिलातील अंतिम निर्णयानंतर साक्षांकीत प्रत प्राप्त झाल्यानंतर (सदर अपिल दाखल करनेकरीता (Processing Fee) भरावी लागणारी कोर्ट फी ची रक्कम मनपाने भरणा करावी) अंतिम निर्णयानंतर ५0% रक्कम		४000/-	

३	Miscellaneous Application for Condonation of Delay Filled By the Corporation or Against the Corporation दाखल झाल्यानंतर ५0% रक्कम		३000/-	एकुण रक्कम रूपये ६000/-
	अंतिम निर्णयानंतर ५0% रक्कम		३000/-	
४	Municipal Appeal			एकुण रक्कम रूपये ६000/-
५	निवडणूक दावे			एकुण रक्कम रूपये ५000/-
६	मोटर अपघात दावे			एकुण रक्कम रूपये ८000/-
७	न्यायालयीन आदेशाचा अंमलबजावणी संबंधीत दावे			एकुण रक्कम रूपये ५000/-
८	केव्हेट दाखल करणेकरीता (बमई, ठाणे, औद्योगिक, कामगार न्यायालय)	रू.१000/-		एकुण रक्कम रूपये २000/-
९	फौजदारी दावे/खटले १. अवैध कत्तल आणि मांस विक्री संबंधीत दाव्यांमध्ये २. इतर फौजदारी दावे (चेक बाऊंस, PCPNDT, बेकायदेशीर वृक्षतोड करणे) ३. फौजदारी अपील, पुनरावृत्ती, पुनरावलोकन अनुपयोग			एकुण रक्कम रूपये ८000/- ८000/- ५000/-
१0	कामगार/औद्योगिक न्यायालयीन दावे	For drafting Application for Condonation of Delay Rs.15000/- Affidavit in support Rs.2500/- Adjourned for evidence Rs.3500/-		एकुण रक्कम रूपये ८000/-

		Filed reply for Adjourned for evidence Rs.3500/- Rs.750/- per date		
११	Miscellaneous Application			एकुण रक्कम रूपये २000/-
१२	नगररचना विभागाशी संबंधीत बांधकाम परवानगी विषयी सल्ला (O.C., C.C., R.D.P., T.D.R.)			एकुण रक्कम रूपये २५00/-
१३	करारनामा १.करारानुसार मसूदा तयार करून देणेकरीता २.कराराचे परिक्षण करून देणेकरीता			एकुण रक्कम रूपये २000/- १५00/-
१४	अभिप्राय व कायदेशिर सल्ला देणेकरीता			एकुण रक्कम रूपये २000/-
१५	Cases pertaining to Courts Beyond Thane, Mumbai Jurisdiction			एकुण रक्कम रूपये ८000/- + प्रवास खर्च
१६	Cases pertaining to slum Tribunal, Competent Authority consumer state Commission, National Human Right Commission, MACT (Mumbai)			एकुण रक्कम रूपये ८000/-
१७	लोकआयुक्त न्यायालय			एकुण रक्कम रूपये ५000/-
१८	न्यायालयीन प्रकरणामध्ये साक्षांकीत प्रती काढणे			एकुण रक्कम रूपये ५00/-
१९	लिगल नोटीस तयार करून बजावण्याकरीता			एकुण रक्कम रूपये १५00/-

२०	साधी/मायनर नोटीस बजावण्याकरीता			एकुण रक्कम रूपये १000/-

उपरोक्त कोष्टकातील वसई दिवाणी व जिल्हा न्यायालयातील विधी तज्ञांची फी ची रक्कम ही कमी आहे. तसेच जुने दावे चालविताना त्यांना प्राप्त होणारी फी ही एकूण दाव्याच्या फी रक्कमेच्या निम्मी फी आहे. या बाबींचा विचार करता कमी फी मुळे जुन्या दाव्यांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता खालीलप्रमाणे टप्पानिहाय सुधारीत फी रचना सुचविणेत येत आहे.

अ.क्र.	दाव्याचा प्रकार	दाव्याचा टप्पा	टप्पानिहाय अदा करावयाची प्रस्तावित फी	दाव्याबद्दलची एकुण प्रस्तावित फी
१	**दिवाणी न्यायालयात** मनपाविरूध्द दाखल दावे	१. वकालतनामा दाखल करणे (Filling of VP) २. लेखी विधान दाखल करणे (Filling of W.S.) ३. Exhibit 5 युक्तिवाद व आदेश (Exhibit 5 argument followed Order) ४. सुनावणी (Hearing) ५. अंतिम युक्तिवाद व आदेश / निर्णय / हुकूम (Final Argument followed by order/judgment/decree)	२000/- २000/- १५00/- ४५00/- २000/-	एकुण रक्कम रूपये १२000/-
२	**जिल्हा न्यायालयात** मनपाच्या वतीने किंवा मनपाच्या विरूध्द अपिल दाखल झाल्यास	१. वकालतनामा दाखल करणे (Filling of VP) २. अंतिम युक्तिवाद व अंतिम आदेश/निर्णय/हुकूम (Final argument followed By final order / judgment / decree)	४000/- ६000/-	एकुण रक्कम रूपये १0000/-
३	दिवाणी न्यायालयात अपिल			एकुण रक्कम रूपये ८000/-
४	निवडणूक दावे			एकुण रक्कम रूपये ८000/-
५	मोटर अपघात दावे			एकुण रक्कम रूपये ८000/-

६	न्यायालयीन आदेशाचा अंमलबजावणी संबंधीत दावे			एकुण रक्कम रूपये ८000/-
७	केव्हेट दाखल करणेकरीता			एकुण रक्कम रूपये २000/-
८	**फौजदारी खटले** 1. Summons Case 2. Warrant Case 3. Summery Case	१. वकालतनामा दाखल करणे (Filling of VP) २. प्रतिवादीने केलेले बचावाचे विधान (Plea/Charge) ३. सुनावणी (Hearing) ४. अंतिम युक्तिवाद (Final Argument) ५. निर्णय (Judgment)	२000/- २000/- २000/- २000/- २000/-	एकुण रक्कम रूपये १0000/-
९	**Miscellaneous Applications** (Civil/Criminal)	१. वकालतनामा दाखल करणे/अर्ज (Filling of VP / Application) २. युक्तिवाद आदेश (Argument followed by order)	३000/- ३000/-	एकुण रक्कम रूपये ६000/-
१0	नगररचना विभागाशी संबंधीत बांधकाम परवानगी विषयी सल्ला (O.C., C.C., R.D.P., T.D.R.)			एकुण रक्कम रूपये ३000/-
११	करारनामा १. करारानुसार मसूदा तयार करून देणेकरीता २. कराराचे परिक्षण करून देणेकरीता			एकुण रक्कम रूपये ३000/- २000/-
१२	अभिप्राय व कायदेशिर सल्ला देणेकरीता			एकुण रक्कम रूपये २000/-
१३	Cases pertaining to Courts Beyond Vasai, Thane, Palghar, Mumbai jurisdiction			एकुण रक्कम रूपये १२000/- + प्रवास खर्च
१४	लोकआयुक्त न्यायालय			एकुण रक्कम रूपये ५000/-

१५	न्यायालयीन प्रकरणामध्ये साक्षांकीत प्रती काढणे			एकुण रक्कम रूपये ५००/-
१६	लिगल नोटीस तयार करून बजावण्याकरीता			एकुण रक्कम रूपये १५००/-
१७	साधी/मायनर नोटीस बजावण्याकरीता			एकुण रक्कम रूपये १०००/-

उपरोक्त प्रस्तावीत केलेल्या दरांपैकी वसई दिवाणी न्यायालय व जिल्हा न्यायालयाकरीता नव्याने नियुक्त केलेल्या वकीलांचे 'फी' दर नवीन विधीतज्ञ मंडळ (पॅनल) नियुक्त केलेल्या तारखेपासुन लागु करणे उचित होईल. तसेच इतर न्यायालयांकरीताच्या विधीतज्ञांचे 'फी' दर हे मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.०४ दि.१३/१०/२०१७ अन्वये सुचविल्याप्रमाणे योग्य आहेत त्यामुळे त्यात बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सदरचा खर्च अर्थसंकल्पातील 'दावे आणि खटले फी' व इतर अनूषांगिक लेखाशिर्षाखाली करता येईल.

तरी प्रस्तावीत दरानुसार वसई दिवाणी न्यायालय व जिल्हा न्यायालयाकरीता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.३०४ दि.११/०९/२०१९ अन्वये नियुक्त केलेल्या नवीन विधीतज्ञांची नियुक्ती झालेपासुन पूर्वलक्षी प्रभावाने दाव्याची 'फी' अदा करणे व इतर न्यायालयांकरीता विधीतज्ञांचे 'फी' दर मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.०४ दि.१३/१०/२०१७ अन्वये प्रस्तावात सुचविल्याप्रमाणे अदा करणेकामीचा प्रस्ताव प्रशासकीय व आर्थिक मंजूरीस्तव सविनय सादर .

ठराव :- वसई दिवाणी न्यायालय व जिल्हा न्यायालयात वसई-विरार शहर महानगरपालिकेची बाजू सक्षमपणे मांडण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.३०४ दि.११/०९/२०१९ अन्वये नेमलेल्या विधीतज्ञांची नियुक्ती झालेपासुन पूर्वलक्षी प्रभावाने नवीन प्रस्तावित 'फी' दर लागू करणेस व त्यानुसार 'फी' अदा करणेकामी तसेच इतर न्यायालयांकरीता विधीतज्ञांचे 'फी' दर मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.०४ दि.१३/१०/२०१७ च्या निर्णयात प्रस्तावित केलेनुसार अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

11/9/२०

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १०३ विभाग :- बांधकाम
दिनांक :- १६ / ०९/ २०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात घरगुती गॅस वाहिन्या अंथरणे कामी रस्ता खोदाई करण्यास परवानगी देणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- भारत सरकारच्या पेट्रोलियम आणि गॅस नियमक मंडळ, नवि दिल्ली, यांनी महाराष्ट्रातील पालघर क्षेत्रात पाईप गॅसचे जाळे उभारण्याच्या दृष्टीने प्राधिकृत संस्था म्हणून "मे.गुजराथ गॅस लि." (गुजराथ सरकार उपक्रम) या संस्थेस प्राधिकृत केले आहे. त्यानुसार "मे.गुजराथ गॅस लि." यांनी वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ८ इंच व्यासाचे पाईप भुमीगत अंथरुन त्याव्दारे नागरिकांना घरगुती वापराचा गॅस पुरवठा करणे कामी प्रस्ताव सादर केला आहे. महापालिका क्षेत्रात मे.गुजराथ गॅस लि. यांना सुमारे ११४ कि.मी. भुमीगत पाईप अंथरावयाचे असून त्यासाठी परवानगीचे ४ प्रस्ताव त्यांनी दि. १६/०४/२०१६ अन्वये महापालिकेकडे सादर केले आहेत.

महापालिकेचा रस्ता खोदाईचा प्रचलित दर रु. ७,१५०/- प्रती मीटर हा दर जास्त वाटत असल्याने मे.गुजराथ गॅस लि. यांनी दि. १६/०३/२०२० च्या पत्राने दर कमी करणेबाबत महापालिकेस विनंती केली आहे. तसेच याबाबत दि.१/०९/२०२० रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक, वसई विरार शहर महानगरपालिका व मे.गुजराथ गॅस लि. यांच्या प्रतिनिधीं समवेत झालेल्या बैठकीत मा. आयुक्त यांनी प्रत्यक्षात रस्ता पुर्नबांधणीसाठी होणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक अभ्यास करुन सादर करण्याबाबत बांधकाम विभागास निर्देश दिले. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मे.गुजराथ गॅस लि. हे महापालिका क्षेत्रात २३० कि.मी. गॅसचे पाईप भुमीगत अंथरणार असून प्रथम टप्प्यात २६ कि.मी. पाईप अंथरणेचे काम करणार असल्याबाबत त्यांनी दि. ४/०९/२०२० च्या पत्राने प्रस्ताव सादर केला आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारच्या विविध व्यासाच्या केबल/तार/पाईप रस्ता, जमिन खोदाई करुन टाकण्याच्या परवानगीसाठी परवाना शुल्क निश्चिती मा. महासभा ठराव क्र. ७ दि. २०/१२/२०१२ अन्वये करण्यात आली असून त्यानुसार खालील प्रमाणे रस्ता खोदाईचे दर आहेत.

16/9/2020

अ. क्र.	अस्तित्वातील पृष्ठभाग	व.वि.श.मनपाचे प्रस्तावित दर
		प्रती मिटर
१)	कच्चा रस्ता	२०९०.००
२)	खडीकरण रस्ता	२५००.००
३)	डांबरी (६०/७० ग्रेड)	७१५०.००
४)	पेव्हर ब्लॉक रस्ता	५१२०.००
५)	कॉक्रीट रस्ता	५१२०.००
६)	मास्टिक अस्फाल्ट	६०७८.००

वरील प्रमाणे दर निश्चित असून याव्यतिरिक्त रू. ५/- प्रती मिटर प्रती वर्ष २० वर्षाचे भुभाडे, ५०% रक्कम परतावा अनामत, १०% पर्यवेक्षण फि व १०% मार्गाचा हक्क असे शुल्क रस्ता खोदाईसाठी येणाऱ्या मागणी अर्जांवर आकारून परवानगी देण्यास मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार येणाऱ्या अर्जांवर शुल्क आकारून परवानगी देण्यात येत आहे. परंतू महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. ने सदरचे दर जास्त वाटत असल्याने व सदर अंथरण्यात येणारी विज केबल नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्याने महापालिकेने निश्चित केलेले दर कमी करण्यास केलेल्या विनंतीवरून मा. महासभा ठराव क्र. १४ दि. २०/११/२०१३ अन्वये रू. २,०९०/- प्रति मिटर असा दर आकारण्यास, परतावा अनामत घेऊन इतर आवश्यक दर हे (मार्गाचा हक्क, पर्यवेक्षण फी व भुभाडे) मा. महासभा दि. २०/१२/२०१२ ठराव क्र. ०७ अन्वये निश्चित केल्याप्रमाणेच स्विकारून परवानगी देण्यास मान्यता प्राप्त आहे. सदर प्राप्त मान्यतेनुसार सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. कडून येणाऱ्या रस्ता खोदाईच्या मागणी नुसार दर आकारून परवानगी देण्यात येत आहे. सदर रस्ते दुरूस्तीचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेची सद्याची लोकसंख्या २१ लक्ष इतकी झाली असून या लोकसंख्येस मुलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून देणे हि महापालिकेची जबाबदारी आहे. नागरिकांच्या हितार्थ सेवा पुरविणाऱ्या शासकीय/ निमशासकीय संस्था यांनी या सेवा माफक दरात नागरिकांना उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने स्थानीक स्वराज्य संस्थेने मदत करणे आवश्यक आहे. महापालिका क्षेत्रात पाईप गॅसचे जाळे उभारणे कामी तयार केलेल्या प्रकल्पाच्या अंदाजीत किंमतीच्या मर्यादेत सदर खर्च सिमीत राहण्यासाठी महापालिकेने प्रचलित दरात सवलत किंवा दर शिथील करण्याच्या दृष्टीने विचार करण्याबाबत मे.गुजराथ गॅस लि. यांनी केलेल्या विनंती नुसार व मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या निर्देशनूसार बांधकाम विभागाने प्रचलीत दर काही प्रमाणात शिथील करण्याच्या दृष्टीने सर्वकष बाबी तपासून १ रनींग मीटर रस्ता पुर्नबांधणीसाठी आवश्यक बाबींचा समावेश करून सन २०२०-२१ च्या राज्य दरसूची वर आधारीत अंदाजपत्रक तयार केले असून त्यानुसार १ रनींग मीटर करीता (१५ % ETP Charges सह) रू. ३,७२९/- असा दर येत आहे.

मे.गुजराथ गॅस लि. यांनी केलेल्या विनंतीनुसार महापालिका क्षेत्रात गॅसचे पाईप भूमीगत अंथरण्यासाठी रू. ३,७२९/- प्रति रनींग मीटर रस्ता खोदाई शुल्क (सर्व प्रकारच्या रस्त्यांसाठी) व रू. ५/- प्रती मीटर प्रती वर्ष या प्रमाणे २० वर्षाचे भुभाडे आकारून आवश्यक अटी-शर्ती करारात अंतर्भुत करून परवानगी देणे योग्य होईल.

16/9/2020

महापालिका क्षेत्रात दर व कर निश्चित करुन आकारणी करण्यासाठी किंवा त्यात बदल, सुधारणा करण्यासाठी मा. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीची आवश्यकता आहे. परंतू सद्य:स्थितीत शासनाने वसई-विरार शहर महानगरपालिकेवर आपली प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना सदर प्रस्तावास मान्यता देण्याचे अधिकार निहीत आहेत.

तरी मे.गुजराथ गॅस लि. यांना महापालिका क्षेत्रात २३० कि.मी. गॅसचे पाईप भूमीगत अंथरणेसाठी प्रचलीत दरात सवलत देऊन रु. ३,७२९/- प्रति रनींग मीटर रस्ता खोदाईचा दर (सर्व प्रकारच्या रस्त्यांसाठी) आकारण्यास व रु. ५/- प्रति मीटर प्रति वर्ष या प्रमाणे २० वर्षाचे भुभाडे आकारुन आवश्यक अटी-शर्ती करारात अंतर्भुत करुन परवानगी देण्याचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :-

- भारत सरकारच्या पेट्रोलियम आणि गॅस नियमक मंडळ, नवि दिल्ली, यांनी महाराष्ट्रातील पालघर क्षेत्रात पाईप गॅसचे जाळे उभारण्याच्या दृष्टीने प्राधिकृत संस्था म्हणून "मे.गुजराथ गॅस लि." (गुजराथ सरकार उपक्रम) यांना प्राधिकृत केले आहे.
- महापालिका क्षेत्रातील नागरीकांना घरगुती वापराचा गॅस माफक दरात उपलब्ध करुन देण्यासाठी महापालिका क्षेत्रातील रस्ते खोदाई करुन गॅस पाईप भुमीगत अंथरणेसाठी परवानगीच्या प्रस्तावा अनुषंगाने महापालिकेचा प्रचलित दर कमी करुन देण्याबाबत मे.गुजराथ गॅस लि. यांनी दि.१६/०३/२०२० ने विनंती केली आहे.
- महापालिका क्षेत्रातील नागरीकांच्या हितार्थ हा प्रकल्प मे.गुजराथ गॅस लि.यांच्या मार्फत राबविण्यात येणार असल्याने त्यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे.
- मे.गुजराथ गॅस लि. यांनी केलेल्या विनंती नुसार मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७ दि. २०/१२/२०१२ अन्वये निश्चित केलेले दर शिथील करुन बांधकाम विभागाने चालू दरसूचीनूसार तयार केलेल्या प्रती १ रनींग मीटर करिता रु. ३,७२९/- या दरा प्रमाणे दर आकारण्यास व तो वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
- तसेच मा. सर्वसाधारण सभा दि. २०/१२/२०१२ ठराव क्र. ०७ अन्वये निश्चित केलेला रु. ५/- प्रती मीटर प्रती वर्ष २० वर्षाचे आगाऊ भुभाडे आकारुन आवश्यक अटी-शर्तीचा करार करुन टप्प्या-टप्प्याने परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

16/9/2020

(गंगाथरन डी.) भा.प्र.से.
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४०४

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक १६/९/२०२०

प्रस्तावाचा विषय :-वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोव्हीड १९ अलगीकरण व विलगीकरण कक्षातील दाखल रुग्णांकडे पिवळे रेशनकार्ड असलेल्या व रेशनकार्डच नसणाऱ्या आर्थिक दृष्टया दुर्बल रुग्णांना व सदर ठिकाणी काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना दयावयाच्या चहा-नाश्ता व जेवणाची व्यवस्था करणेकामी पुरवठाधारक (संस्थेकडून) विनानिविदा चहा-नाश्ता व जेवण उपलब्ध करुन देणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोरोना (कोव्हीड-१९) विषाणूंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक असल्याने महानगरपालिका हद्दीत बाहेरुन आलेले प्रवासी व संशयीत रुग्ण यांची तपासणी मोहिम सूरु आहे. महानगरपालिकेने स्थापन केलेले अलगीकरण व विलगीकरण कक्षामध्ये रुग्ण संख्या वाढत असून सदयस्थितीत रुग्णांना महापालिकेव्दारे सकाळी चहा-नाश्ता, दुपारी भोजन, संध्याकाळचा चहा व रात्रीचे भोजन पुरविण्यात येत होते. वरील संदर्भ क्र.१ नुसार मा. आयुक्त यांनी दिनांक २३/०५/२०२० रोजीच्या मंजुर टिपणीनुसार (१)महानगरपालिकेच्या अलगीकरण व विलगीकरण कक्षातील रुग्णांना त्यांचे नातेवाईकांकडून घरचे सकाळचा चहा-नाश्ता, दुपारचे भोजन, संध्याकाळचा चहा व रात्रीचे भोजन हे (विल्हेवाट लावता येण्याजोगे अश्या डिस्पोसेबल बंद पिशवीमध्ये वस्तु वापरुन) उपलब्ध करुन देण्याबाबत सुचित करणे अथवा ज्या रुग्णांना स्वतःच्या घरचे सकाळचा चहा-नाश्ता, दुपारचे भोजन, संध्याकाळचा चहा व रात्रीचे भोजन व्यवस्था करणे शक्य नसल्यास त्यांचे नातेवाईकांनी स्वखर्चाने उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करणेकामी सुचित केले आहे. (२)तसेच महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील रुग्णांना (पिवळे रेशनकार्ड धारकांना) व रेशनकार्डच नसणाऱ्या आर्थिक दृष्टया दुर्बल रुग्णांना सकाळी चहा-नाश्ता, दुपारी भोजन, संध्याकाळी चहा व रात्रीचे भोजन हे महानगरपालिकेकडून उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास एक तातडीची बाब म्हणून मान्यता दिलेली आहे.सबब महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अलगीकरण व विलगीकरण कक्षातील दाखल रुग्णांना व सदर ठिकाणी काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना त्या त्या ठिकाणच्या लगतच्या महिला बचत गटा मार्फत चहा-नाश्ता व जेवण पुरविणे अत्यावश्यक आहे. सदर चहा-नाश्ता व जेवण तातडीने पुरविणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

सन १९४९ (क्रमांक ५९) अनुसूची (ड) प्रकरण ५.२.२ व ६७(३) अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवर खरेदी करुन पुरविणे योग्य होईल.

यानुसार चहा-नाश्ता व जेवण मे.श्रमिक महिला विकास संघ,वसई (प.) व मे.यशोधरा वस्तीस्तर संघ, बोळींज, विरार (प.) या वितरकांकडून प्राप्त दरपत्रकातील दरांबाबत मा.आयुक्त महोदयांनी केलेल्या वाटाघाटी अंती मंजुर दराने सदरचे चहा-नाश्ता व जेवण उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. याबाबतचा दरासह तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पुरवठादार/संस्थेचे नाव	तपशील	अलगीकरण/ विलगीकरण केंद्र	दर (सर्व करासहित वाहतुक खर्चासहित)
१.	मे.श्रमिक महिला विकास संघ, वसई (प.)	चहा-नाश्ता, सकाळचे जेवण, रात्रीचे जेवण (डिस्पोसेबल बंद पॅकींग मध्ये)	संत जी.जी.कॉलेज, वसई(प.)	२००/- (प्रति व्यक्ती प्रति दिवस)
२.	मे.यशोधरा वस्तीस्तरसंघ, बोळींज, विरार (प.)	चहा-नाश्ता, सकाळचे जेवण, रात्रीचे जेवण (डिस्पोसेबल बंद पॅकींग मध्ये)	म्हाडा इमारत क्र.१० व म्हाडा इमारत क्र.१४.विरार (प.)	२००/- (प्रति व्यक्ती प्रति दिवस)

कोरोना विषाणू संसर्गाची वाढती संख्या लक्षात घेता सदर रुग्णांना व कार्यरत वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना चहा-नाश्ता व जेवण तातडीने पुरविणे गरजेचे आहे. सदरकामी मासिक अंदाजे रक्कम रु.१५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात "रुग्णालय इतर साहित्य खरेदी" या लेखाशिर्षाखाली रु.४,००,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आली असुन या तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे. तरी चहा-नाश्ता व जेवण उपलब्ध करुन देणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त ठिकाणी वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना व कोव्हीड-१९ उपचाराकामी दाखल रुग्णांना चहा-नाश्ता व जेवण उपलब्ध करुन देणेकामी अंदाजे रक्कम रु.१५,००,०००/- (अक्षरी- पंधरा लाख रुपये मात्र) इतक्या खर्चास कार्योत्तर प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय, विरार पूर्व, जि- पालघर पिन नं 401 305
दूरध्वनी – 0250 -2525101/02/03/04/05/06, फॅक्स्- 0250- 2525107.
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १०५ विभाग: उद्यान
दिनांक: १७/०९ / 2020

प्रस्तावाचा विषय : वसई विरार शहर महानगरपालिका 9 प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील उद्याने देखभालीकरीता कार्यरत असलेल्या महिला बचत गटास उद्यान देखभाल कामाकरीता माहे एप्रिल 2020 ते माहे ऑगस्ट 2020 या पाच महिन्याकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर : उपरोक्त् विषयांन्वये सादर करणेत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका 9 प्रभाग समिती कार्यक्षेत्रात एकूण 150 उद्याने अस्तित्वात आहेत. सदर उद्यानांचे दैनंदिन व रखवालीचे काम स्थानिक महिला बचत गटामार्फत करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मांडण्यात आला होता व सदर प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.22 दि.18/06/2016 अन्वये सर्वानुमते मान्यता दिल्यानुसार व पारित करणेत आलेल्या ठरावानुसार उद्यान विभाग व महिला बालकल्याण विभाग यांच्या सहकार्याने उद्यान निहाय बचत गटांना वाटप करण्याची कार्यवाही पूर्ण करणेत आली होती.

वरील निर्णयानुसार नमुद महिला बचत गट यांच्याकडून करारनामा करून उद्यानांच्या प्रतवारीनुसार मोबदला रक्कम ठरवून खालील प्रमाणे नमुद उद्यानांचे देखभालीचे कामकाज सोपविण्यात आले व देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.31/03/2017 रोजी संपलेने त्यांना मा.आयुक्त् सो. यांना प्रदान करणेत आलेल्या अधिकारात मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.16 दि.19/06/2017 अन्वयेच्या निर्णयानुसार सदर महिला बचत गटास पूर्वलक्षी प्रभावाने दि.1/4/2017 ते दि.31/03/2018 पर्यंत एक वर्षाकरीता मुदतवाढ देणेत आलेली होती. सदर एक वर्षाची मुदतवाढ दि.31/03/2018 रोजी संपल्याने मा.महासभा ठराव क्र.21 दि.20/04/2018 च्या निर्णयान्वये पूर्वलक्षी प्रभावाने दि.31/3/2019 पर्यंत उद्यान देखभालीचा मुदतवाढीचा कार्यादेश देणेत आलेला होता.

सदर कामाकरीता नियुक्त् महिला बचत गट यांना मा.सर्वसाधारण सभा दि.24/4/2018 रोजीच्या मुदतवाढीच्या कार्योत्तर मंजुरीच्या ठराव क्र.21 च्या निर्णयानुसार काही नव्याने विकसीत झालेल्या उद्यानांच्या देखभालीकरीता नविन स्थानिक महिला बचत गट नियुक्त् करणेत आलेले आहेत. पूर्वी कार्यरत असलेल्या महिला बचत गटांस पूर्वलक्षी प्रभावाने दि.31/03/2019 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर उद्यानांपैकी काही उद्यानांमध्ये नविन स्थानिक महिला बचत गट नियुक्ती होईपर्यंत पूर्वी

कार्यरत असलेल्या महिला बचत गटास पूर्वलक्षी प्रभावाने दि.31/3/2019 पर्यंत होणाऱ्या खर्चास मुदतवाढ देण्यात आली होती.

मा.सर्वसाधारण ठराव क्र.17 दि.20/8/2019 अन्वये उद्याने देखभाल करणेकामी नव्याने स्वारस्य अभिरूची मागविणेत यावी व सदरची प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत पूर्व कार्यरत असलेल्या महिला बचत गटांना मुदतवाढ देण्यात यावी या निर्णयान्वये सन 2019-20 करीता दि.31/3/2020 पर्यंत उद्यान देखभालीकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार खालील नमुद उद्यानांची देखभाल नियुक्ती केलेल्या महिला बचत गटांमार्फत करण्यात येत आहे.

सदरचा तपशिल खालील प्रमाणे.

तक्ता क्र.1

प्रभाग समिती ए- बोळिंज				
अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यांनांची प्रतवारी	प्रतवारी नुसार माबदला रक्कम प्रती महिना
1	वृक्ष नक्षत्र व वनस्पती उद्यान	युक्ती महिला बचत गट,	B	26,450/-
2	मनु तलाव	जय भवानी महिला बचत गट,	B	26,450/-
3	रानपाडा तलाव	के.जी.एन.स्वयंसहाय्यता महिला बचत गट	B	26,450/-
4	रानपाडा स्मशानभूमी	सदर स्मशानभुमी नुतनीकरणाचे काम चालू असल्याने उद्यान देखभालीचे काम बंद करण्यात आले आहे.	B	26,450/-
5	विवा उद्यान एम. बी.इस्टेट	मंगलमुर्ती महिला बचत गट,	B	26,450/-
6	लक्ष्मीकृषी उद्यान	नजराणा महिला स्वयंसहाय्यता महिला बचत गट	C	13,225/-
7	रुणवाल विहार (सम्राट व्हिला) उद्यान	संजीवनी महिला बचत गट	C	13,225/-
8	चाचा नेहरू नारंगी उद्यान	सावित्रीबाई फुले महिला बचत गट	B	26,450/-
9	कोफराड तलाव	परिवार महिला स्वयंसहाय्यता महिला बचत गट	B	26,450/-
10	कमानवाला उद्यान	नंदनवन महिला बचत गट	B	26,450/-
11	सायन्स विज्ञान उद्यान	स्वकृता महिला बचत गट	B	26,450/-

12	विराट नगर वैकुंठ स्मशानभुमी	समर्थ महिला बचत गट	B	26,450/-
13	एकदंत बालउद्यान विराट नगर	साईबाबा महिला बचत गट	B	26,450/-
14	नारंगी गाव तलाव उद्यान	श्री महालक्ष्मी महिला बचत गट	B	26,450/-
15	कै. कृ.म. उर्फ बापूजी चौधरी परिक्रमा व बाल उद्यान डोंगरपाडा	राधाकृष्ण् महिला बचत गट	B	26,450/-
16	नानभाट तलाव	अस्मिता स्वयंसहाय्यता महिला बचत गट	B	26,450/-
17	नारंगी आरोग्य क्रेंद्र व उद्यान नारंगी	ओमसाई महिला बचत गट	B	26,450/-
18	विराट नगर बालउद्यान चानक्य चौक	शिवसाई महिला बचत गट	C	13,225/-
19	बालउद्यान नॅशनल स्कुल मागे	संस्कृती महिला बचत गट	C	13,225/-
20	समर्थ नगर येथिल उद्यान/ बोळिंज	आदर्श महिला बचत गट	B	26,450/-
21	चिखलडोंगरी परिक्रमा उद्यान	सर्वेश्वर महिला बचत गट	B	26,450/-
22	कल्पवृक्ष सोसा., समोरील बालोद्यान	स्वामी समर्थ महिला बचत गट	C	13,225/-
23	राम मंदिर उद्यान	उमादेवी महिला बचत गट	A	39,675/-
24	शंकर मंदिर उद्यान	मोमीन महिला बचत गट	B	26,450/-
25	भंडारवाडा उद्यान सेंट जेम्स चर्च समोर	बंद आहे	C	13,225/-
26	आदर्श शाळेसमोरील उद्यान	बंद आहे	C	13,225/-
प्रभाग समिती बी- विरार पुर्व				
अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यांनांची प्रतवारी	प्रतवारी नुसार माबदला रक्कम प्रती महिना
1	रानळे तलाव उद्यान	एकविरा महिला बचत गट,	B	26,450/-
2	वासुदेव वालु पाटील मनवेलपाडा उद्यान	सुयश महिला स्वयंसहाय्यता महिला बचत गट	B	26,450/-
3	तारवाडी रेल्वे ट्रॅक बालोद्यान	कल्पतरु महिला बचत गट	B	26,450/-

4	तारवाडी बाल उद्यान (सुर्यकिरण)	जीवदानी महिला बचत गट	C	13,225/-
5	मातृछाया उद्यान	वज्रेश्वरी महिला बचत गट	C	13,225/-
6	मनवेलपाडा तलाव उद्यान	गजानन महिला बचत गट	B	26,450/-
	मारेगाव तलाव उद्यान	रिध्दि सिध्दि महिला बचत गट	B	26,450/-
प्रभाग समिती सी- चंदनसार				
अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यांनां ची प्रतवारी	प्रतवारी नुसार माबदला रक्कम प्रती महिना
1	कै.ॲड सी.पी.सोलंकी परिक्रमा व नौका विहार केंद्र उद्यान (टोटाळे तलाव)	सदर उद्यानांची देखभाल मंजुर ठेकेदारामार्फत करणेत येत असून दि.31/03/2021 पर्यंत कार्यादेश देण्यात आलेला आहे.	-	-
2	साने गुरूजी बालोद्यान			
3	वावटेवाडी बालोद्यान/ आर. जे. उद्यान	जय दुर्गा महिला बचत गट	C	13,225/-
4	गोपचरपाडा तलाव उद्यान	चामुंडादेवी महिला बचत गट	B	26,450/-
5	हिंदु स्मशानभुमी उद्यान	वर्धिनी महिला बचत गट	B	26,450/-
6	दुधदर्या फुलपाडा उद्यान/ गुलमोहर उद्यान	साईकृपा महिला बचत गट	A	39,675/-
7	खडप्या तलाव उद्यान	महालक्ष्मी प्रसंन्न महिला बचत गट	A	39,675/-
8	बर्फेश्वर महादेव उद्यान	धनलक्ष्मी महिला बचत गट	A	39,675/-
प्रभाग समिती डी- आचोळे				
अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यांनां ची प्रतवारी	प्रतवारी नुसार माबदला रक्कम प्रती महिना
1	महेश पार्क उद्यान	हॅलो सखी वैभवलक्ष्मी महिला बचत गट	B	26450/-
2	आचोळे तलाव उद्यान	माऊली स्वयंसहाय्यता महिला बचत गट	A	39,675/-
3	नवघर पुर्व पाण्याची टाकी उद्यान	श्री भवानी महिला बचत गट	C	13,225/-
4	नवघर पुर्व बस डेपोजवळील उद्यान	सावित्रीबाई महिला बचत गट, नवघर पुर्व	B	26,450/-
5	नागेला तलाव	सावित्रीबाई महिला	A	39,675/-

	उद्यान	बचत गट, नालासोपारा		
6	स्वागत उद्यान	संतोषी माता महिला बचत गट	B	26,450/-
7	इव्हरशाईन सिटी स्मशानभुमी उद्यान	जिजाई महिला बचत गट	B	26,450/-
8	सिरॉक उद्यान	शाश्वती महिला बचत गट	C	13,225/-
9	पारस उद्यान	रमाई महिला बचत गट	B	26,450/-
10	नवघर पुर्व मस्जितजवळील उद्यान	संस्कार महिला बचत गट	B	26,450/-
11	नवघर पुर्व स्मशानभुमी उद्यान	-	B	26,450/-
12	वर्धमान तलाव उद्यान	साई-प्रेरणा महिला बचत गट	B	26,450/-
प्रभाग समिती ई- नालासोपारा पश्चिम				
अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यांनांची प्रतवारी	प्रतवारी नुसार माबदला रक्कम प्रती महिना
1	लक्ष्मीबेन छेडा नगर उद्यान	गंगासागर महिला बचत गट	B	26,450/-
2	शनिमंदिर उद्यान	साईनिधी महिला बचत गट	B	26,450/-
3	पाटील हॉस्पिटल उद्यान	सप्तश्रृंगी महिला बचत गट	B	26,450/-
4	बाटेला तलाव उद्यान	एकविरा महिला बचत गट	B	26,450/-
5	सोपारा उद्यान	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	A	39,675/-
6	संयुक्त नगर कालिंदी उद्यान	सखी महिला बचत गट	B	26,450/-
7	महात्मा फुले नगर उद्यान	सावित्रीबाई फुले महिला स्वयंसहाय्यता महिला बचत गट	B	26,450/-
8	शांती पार्क उद्यान	हॅलो सखी श्रावणधारा महिला बचत गट	B	26,450/-
9	झालावाड उद्यान	श्री महालक्ष्मी महिला बचत गट	B	26,450/-
10	वृंदावन उद्यान	हॅलो सखी शुभ महिला बचत गट	A+	52,900/-
11	टिंकल उद्यान	जिजामाता महिला बचत गट	B	26,450/-
12	संयुक्त नगर ममता उद्यान	संतोषी माता महिला बचत गट	B	26,450/-

13	चंद्रेश कुंज उद्यान	रिध्दि सिध्दि महिला बचत गट	B	26,450/-
14	अथर्व उद्यान	-	C	13,225/-
15	नाना नानी पार्क उद्यान	प्रगती महिला बचत गट	C	13,225/-
16	छेडा नगर खुला रंगमंच उद्यान	साथ संगत महिला बचत गट	C	13,225/-
17	चक्रेश्वर तलाव उद्यान	सदर उद्यानांची देखभाल मंजुर ठेकेदारामार्फत करणेत येत असून दि.31/03/2021 पर्यंत कार्यादेश देण्यात आलेला आहे.	-	-

प्रभाग समिती एफ (पेल्हार)

अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यांनांची प्रतवारी	प्रतवारी नुसार माबदला रक्कम प्रती महिना
1	धानिव तलाव उद्यान	धनलक्ष्मी महिला बचत गट	A	39,675/-

प्रभाग समिती जी (वालीव)

अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यांनांची प्रतवारी	प्रतवारी नुसार माबदला रक्कम प्रती महिना
1	सातिवली तलाव	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	B	26,450/-
2	परेरा नगर उद्यान	श्री दत्तगुरु महिला बचत गट	A	39,675/-
3	वालीव तलाव	निर्मिती महिला बचत गट	A	39,675/-
4	जुचंद्र तलाव	जय मल्हार महिला बचत गट	A	39,675/-
5	मुरूमपाडा उद्यान	सुखकर्ता महिला बचत गट	C	13,225/-
6	नाईकपाडा उद्यान	मंगलमूर्ती महिला बचत गट	B	26,450/-
7	सिटीझन उद्यान	सुमंगल महिला बचत गट	B	26,450/-

प्रभाग समिती एच (नवघर माणिकपूर)

अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यांनांची प्रतवारी	प्रतवारी नुसार माबदला रक्कम प्रती महिना
1	दिवाणमान स्मशानभुमी	सागरशेत महिला बचत गट	B	26,450/-
2	उमेळमान	पदयात्रा महिला बचत	B	26,450/-

	स्मशानभुमी	गट		
3	सुर्या उद्यान	समृद्धी महिला बचत गट	B	26,450/-
4	जॉगर पॉइंट उद्यान		C	13,225/-
5	के.टी.सरमणी उद्यान		C	13,225/-
6	गायत्री मंदिरासमोरील उद्यान		C	13,225/-
7	नरसुळे नाला		C	13,225/-
8	दिवाण कुलदिपसिंग उद्यान	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	C	13,225/-
9	आनंद नगर उद्यान	एकता महिला बचत गट	B	26,450/-
10	स्व.किरण गव्हाणकर उद्यान		C	13,225/-
11	सरदार वल्लभभाई पटेल उद्यान		C	13,225/-
12	सागर सरिता उद्यान	प्रगती महिला बचत गट	C	13,225/-
13	शाहू महाराज उद्यान		C	13,225/-
14	डी.जी.नगर नाला		C	13,225/-
15	कै.पद्मम कमळया पाटील उद्यान		C	13,225/-
16	मुक्तीधाम उद्यान		C	13,225/-
17	नाना-नानी पार्क		C	13,225/-
18	चिमाजी आप्पा उद्यान	स्वरांजली महिला बचत गट	C	13,225/-
19	मीना नगर उद्यान		C	13,225/-
20	अष्टविनायक उद्यान		C	13,225/-
21	वीर जिजामाता उद्यान	गाव देवी महिला बचत गट	B	26,450/-
22	ओमकारेश्वर उद्यान		B	26,450/-
23	किलबिल उद्यान		C	13,225/-
24	विघ्नेश्वर उद्यान		B	26,450/-
25	विद्यामंदिर उद्यान	महालक्ष्मी महिला बचत गट	B	26,450/-
26	सी कॉलनी उद्यान		C	13,225/-
27	शांतीवन उद्यान		C	13,225/-
28	विद्यामंदिर पाण्याची टाकी		C	13,225/-
29	अपना घर मागील बाजूस	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	C	13,225/-
30	मैत्री पार्क उद्यान	वैष्णवी महिला बचत गट	C	13,225/-
31	बालगोपाळ उद्यान		C	13,225/-
32	अशोक उद्यान	धारावी महिला बचत गट	C	13,225/-
33	नवयुग नगर उद्यान		C	13,225/-

34	सर सेनापती अरूणकुमार वैद्य		C	13,225/-
35	पूर्वा उद्यान		C	13,225/-
36	साईनगर जवळील उद्यान	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	C	13,225/-
37	हॅपी कॅसल	गौरीमाता महिला बचत गट	C	13,225/-
38	साईनगर जवळील उद्यान		B	26,450/-
39	के.टी.पार्क		C	13,225/-
40	इंदिरा गांधी उद्यान	ओमसाई महिला बचत गट	B	26,450/-
41	विशाल नगर उद्यान		C	13,225/-
42	वसंत उद्यान		C	13,225/-
43	तुळजादेवी मंदिर उद्यान	वंदन महिला बचत गट	A+	52,900/-
44	तुळजादेवी मंदिर समोरील उद्यान		A+	52,900/-
45	सुयोग नगर चुळणा बाभोळा तलाव	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	C	13,225/-
46	खलाटीपाडा उद्यान	सप्तश्रृंगी महिला बचत गट	C	13,225/-
47	माणिकपूर पाण्याची टाकी उद्यान		C	13,225/-
48	युनिटी नगर उद्यान		C	13,225/-
49	मणिटेपार उद्यान		C	13,225/-
50	चुळणा बाभोळा रोड स्मशानभुमी	स्वतिक महिला बचत गट	C	13,225/-
51	कृष्णा टाऊनशिप मैदान	ओमसाई महिला बचत गट	B	26,450/-
52	चुळणा तलाव	श्री राम समर्थ स्वयंसहाय्यता महिला बचत गट	B	26,450/-
53	अयप्पा मंदिर नाना नानी पार्क	एकता महिला बचत गट	C	13,225/-

प्रभाग समिती आय (वसई)

अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यांनांची प्रतवारी	प्रतवारी नुसार माबदला रक्कम प्रती महिना
1	लोकमान्य टिळक उद्यान प्रभुआळी	संघर्ष महिला बचत गट	B	26,450/-
2	उमेळा हनुमान मंदिर उद्यान	ओमकार महिला बचत गट	B	26,450/-
3	उमेळा उद्यान		C	13,225/-
4	चिमाजी आप्पा किल्ला गार्डन	जननी महिला बचत गट	B	26,450/-

5	वाल्मिकी मंदिर उद्यान कोळीवाडा	आदर्श महिला बचत गट	B	26,450/-
6	पाचूबंदर स्मशानभुमी	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	B	26,450/-
7	गिरीज तलाव उद्यान	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	C	13,225/-
8	उमेळा विभागीय कार्यालयाजवळील उद्यान	पदयात्रा महिला बचत गट	C	13,225/-
9	पी.कवळी बिल्डर उद्यान कोळीवाडा	संगिनी महिला बचत गट	A	39,675/-
10	वसई कोर्ट नाका जवळील उद्यान	श्री साई महिला बचत गट	C	13,225/-
11	बेणापट्टी स्मशानभूमी	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	B	26,450/-
12	तामतलाव उद्यान	रमाबाई महिला बचत गट	A+	52,900/-
13	हुतात्मा बाळा सावंत उद्यान, पापडी	चाफेबुवा प्रसन्न महिला बचत गट	B	26,450/-
14	नायगांव अमोलनगर उद्यान	मैत्री महिला बचत गट	B	26,450/-
15	विजय पार्क नायगांव		B	26,450/-
16	नायगांव मरियम नगर उद्यान	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	B	26,450/-
17	वाल्मिकेश्वर मंदिर उद्यान नायगांव	सदर उद्यान देखभालीचे काम बंद करणेत आलेले आहे.	C	13,225/-
18	नाना- नानी पार्क गिरीज	-	C	13,225/-
19	चोबारे तलाव	नवदुर्गा महिला बचत गट	A	39,675/-

तक्ता क्र.2

अ.क्र.	उद्यानांची प्रतवारी	प्रतवारी नुसार मासिक मोबदला रक्कम रू.	प्रतवारी नुसार प्रमाणे उद्यानांची संख्या	प्रतवारी नुसार बंद असलेल्या उद्यानांची संख्या	दैनंदिन देखभालीचे काम चालू असलेली उद्याने (4-5)	मासिक खर्च रक्कम रू. (3X6)	माहे एप्रिल 2020 ते माहे ऑगस्ट 2020 पर्यंतचा खर्च (5 महिने)
1	2	3	4	5	6	7	8
1	A+	52,900	4	-	4	2,11,600/-	10,58,000/-
2	A	39,675	13	-	13	5,15,775/-	25,78,875/-
3	B	26,450	69	6	63	16,66,350/-	83,31,750/-
4	C	13,225	61	10	51	6,74,475/-	33,72,375/-
एकूण			147	16	131	30,68,200/-	1,53,41,000/-

वरील तक्ता 1 मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकूण 150 उद्यानांपैकी 3 उद्यानांची देखाल मंजूर ठेकेदारामार्फत करण्यात येत आहे व उर्वरीत 147 उद्यानांची आकारमानानुसार प्रतवारी करणेत आलेली असून त्यापैकी 131 उद्यानांची देखभाल महिला बचत गटांमार्फत करणेत येत आहे. तरी, पूर्वकार्यारत असलेल्या महिला बचत गटांना देखभालीकामी देण्यात आलेल्या उद्यानांच्या प्रतवारी प्रमाणे ठरविण्यात आलेल्या मासिक मोबदला रक्कमेनुसार देखभालीकामी मासिक खर्च रक्कम रू. 30,68,200/- (अक्षरी. तीस लक्ष अडुसष्ट् हजार दोनशे रूपये मात्र/-) इतका खर्च तसेच माहे एप्रिल 2020 ते ऑगस्ट 2020 या 5 महिन्यांकरीता एकूण रक्कम रू1,53,41,000/- (अक्षरी. एक कोटी त्रेप्पन्न लक्ष एकेचाळीस हजार रूपये मात्र/-) इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर माहे मार्च 2020 पासून कोव्हिड 19 चा प्रादुर्भावामुळे शासनाच्या आदेशानुसार सार्वजनिक स्थळे लोकांकरीता बंद ठेवणेत आलेली आहेत. परंतु दैनंदिन रखरखावाचे व देखभालीचे काम कार्यरत होते. सदर कोव्हिड 19 च्या प्रादुर्भावामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाजुक असल्यामुळे व उद्यानांतील दैनंदिन कामाचे या कालावधीमध्ये स्वरूप लक्षात घेता माहे एप्रिल 2020 ते माहे ऑगस्ट् 2020 या 5 महिन्यांच्या कालावधीत सदर देखभालीकरीता होणारा खर्च रक्कम रू.1,53,41,000/- (अक्षरी. एक कोटी त्रेप्पन्न लक्ष एकेचाळीस हजार रूपये मात्र/-) या रक्कमेच्या 50% प्रमाणे होणारी रक्कम रू.76,70,500/- (अक्षरी – रू.शहात्तर लक्ष सत्तर हजार पाचशे मात्र/-) अदा करणे अनुज्ञेय राहील.

सदरकामी होणारा खर्च लेखाशिर्षक- वृक्षारोपण/उद्यान देखभाल (लेखा संकेतांक क्रमांक-551-2490-1) मंजूर तरतुद रक्कम रू.4,51,19,,000/- (अक्षरी- चार कोटी एकावन्न लक्ष एकोणवीस हजार रूपये मात्र/-) मधून भागविता येईल.

तरी सन 2020-21 करीता बचत गटामार्फत उद्यान देखभालीकामी येणारा खर्च रक्कम मोबदला रक्कमेच्या 50% रक्कमेनुसार प्रदान करणेस निर्णयास्त्व सादर. तसेच त्याकामी होणारा खर्च रू.76,70,500/- (अक्षरी – रक्कम रू.शहात्तर लक्ष सत्त हजार पाचशे मात्र/-) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त सो. तथा प्रशासक यांच्यापुढे मांडणेस शिफारस आहे.

ठराव : वसई विरार शहर महानगरपालिका 9 प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील उद्याने देखभालीकरीता कार्यरत असलेल्या महिला बचत गटासह झालेल्या चर्चेनुसार सदर मोबदला देयक माहे एप्रिल 2020 ते माहे ऑगस्ट 2020 या पाच महिन्याकरीता 100% प्रदान करणेस तसेच सदरकामी होणाऱ्या खर्च रक्कम रू.1,53,41,000/- (अक्षरी. एक कोटी त्रेप्पन्न लक्ष एकेचाळीस हजार रूपये मात्र/-) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक 17/9/2020
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९०६

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १५/०९/2020

प्रस्तावाचा विषय :- माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र येथिल प्रसुति विभागातील एन.एस.टी मशिनचे प्रोब दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागा अंतर्गत कार्यरत असलेल्या माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र येथिल वरील संदर्भिय विषयानुसार प्राप्त टिपणीतील अहवाल अवलोकनी घेता प्रसुति विभागातील बाळांचे हदयाचे ठोके व हालचालीचे अचूक निदान करणेकामी आवश्यक असलेले एन.एस.टी मशिन नादुरुस्त असल्साचे निदर्शनास आले आहे. यामुळे रुग्णालयीन कामकाजात गैरसोय निर्माण होत आहे. सदरचे मशिन हे सी.एस.आर अंतर्गत प्राप्त झाले असल्यामुळे मशिन दुरुस्त करणेकामी उत्पादीत कंपनीच्या प्रतिनिधिस सदर मशिनच्या नादुरुस्तीबाबत कळविण्यात आले. त्यानुसार सदर प्रतिनिधीने मशिन दुरुस्तीबाबत केंद्रास भेट दिली असता एन.एस.टी मशिनचे प्रोब नादुरुस्त असल्याचे तोंडी कळविले. त्याअनुषंगाने माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र यांच्यामार्फत प्रोब दुरुस्त करणेकामी विविध कंपनीशी संपर्क साधून ई-मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले, सदर दरपत्रकांचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र	कंपनीचे नाव	प्राप्त दर (सर्व करांसहित	सर्वात कमी दर
१	मे.मिल्टन जनरीक प्रा.लि., मुंबई	रु.१९,५३६/-	रु.१७,३६०/-
२	मे.डॉ.सिध्दी लॅबोरेटरीज, विरार	रु.१७,३६०/-	
३	मे.श्री गजानन मेडीकल स्टोअर्स विरार	रु.१९,२६४/-	

वरील प्राप्त दरपत्रकापैकी मे.डॉ.सिध्दी लॅबोरेटरीज, विरार यांच्याकडून प्राप्त नमुद दर (रु.१७,३६०/-) सर्वात कमी असून मशिन दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. सदर कामी होणारा खर्च "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह रुग्णालयीन उपकरणे खरेदी तसेच देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखालील नमुद शिल्लक तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे. तरी मे.डॉ.सिध्दी लॅबोरेटरीज, विरार यांच्याकडून एन.एस.टी मशिनचा प्रोब

दुरुस्ती करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१७,३६०/- इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेकामी मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ (क्र.५९) अनुसूची (ड) प्रकरण ५.२.२ व ६७ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त एन.एस.टी मशिनचे प्रोब दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या रक्कम रु.१७,३६०/- (अक्षरी- सतरा हजार तीनशे साठ रुपये मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४०७

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ३८/०९/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे" या कामीची मे.लिओ ऑक्सिजन, वसई (प.) या निविदाधारकाची मंजूर ई-निविदा रद्द करून कोवीड-१९ रुग्णालय, इतर रुग्णालये व माताबाल संगोपन केंद्रे येथे आवश्यकतेनुसार क्रायोजेनिक लिक्विड ऑक्सिजन सिलिंडर (२३० लि. क्षमतेचे), जम्बो ऑक्सिजन सिलिंडर (७ घनमिटर क्षमतेचे) व लहान ऑक्सिजन सिलिंडर (१.५ घनमिटर क्षमतेचे) मे.स्पिड ट्रेनिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा यांच्यामार्फत आवश्यकतेनुसार रिफिलिंग करणेकामी प्रशसकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी गोन्सालो गार्सिया कॉलेज, वसई येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, कौलसिटी रुग्णालय, वसई (प.), अग्रवाल हॉस्पिटल-वसई पुर्व, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट, वसई (पू) व चंदनसार येथिल श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे विलगीकरण कक्ष, तसेच म्हाडा बिल्डींग नं.१० येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले आहेत.

कोरोना बाधित रुग्णांना वैद्यकीय उपचारा दरम्यान नियमित ऑक्सिजन देण्याची गरज भासत आहे. मे. लिओ ऑक्सिजन, वसई (प) यांनी दाखल केलेली ई-निविदा मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४७ दि.१८/०६/२०१९ अन्वये मंजूर असून सदर निविदेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३ दि.१६/०३/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यात आली असून मे.लिओ ऑक्सिजन, वसई यांच्यामार्फत सद्यस्थितीत कार्यक्षेत्रातील सर्व रुग्णालयांना ऑक्सिजन

18/9

सिलिंडर रिफिलिंग सेवा पुरविली जात होती परंतू कोवीड-१९ संसर्ग झालेल्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता सदर निविदाधारकावर ऑक्सिजन सेवा पुरविणेकामी अतिरिक्त भार असल्याने जा.क्र.वविशम/वैआवि/१०२२/२०२० दि. १४/०९/२०२० रोजी ऑक्सिजन सेवा नियमितपणे व आवश्यकतेनुसार न पुरविल्यामुळे संबंधितांना नोटीस बजावण्यात आली होती. सदर नोटीसेचे उत्तर आवक क्र. ३४७८ दिनांक १५/०९/२०२० नुसार प्राप्त झाले असून मे. लिओ ऑक्सिजन यांनी केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने अमान्य करण्यात आला असून कोवीड-१९ कालावधीत ऑक्सिजन रिफिलिंग सेवा ही बाब अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने सदर बाबीची गंभीरता लक्षात घेता "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे" याकामीची मंजुर ई-निविदा रद्द करणेकामी शिफारस आहे. दरम्यान कोवीड कालावधीत ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सेवा सुरळितपणे उपलब्ध करून देण्याची आवश्यकता लक्षात घेता मा.आयुक्त यांनी अन्य वितरकाकडून सेवा प्राप्त करून घेणेकामी आदेश केले आहेत. त्यानुसार आवक क्र. ३४७८ दिनांक १५/०९/२०२० नुसार मे.स्पिड ट्रेनिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा यांच्यामार्फत दरपत्रक उपलब्ध करून घेण्यात आले. सदर वितरकाकडे स्वतःच्या मालकीचा ऑक्सिजन उत्पादन प्रकल्प असल्यामुळे रुग्णालयीन गैरसोय टाळून रुग्णांस ऑक्सिजन सेवा नियमितपणे विनाखंड पुरविणे शक्य होईल.

मे.लिओ ऑक्सिजन, वसई यांनी ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सेवा उपलब्ध करून देणेकामी ई-निविदेत सादर केलेल्या दरांशी मे.स्पिड ट्रेनिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा यांच्याकडील प्राप्त दरांशी तुलना केलेला तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	ऑक्सिजन सिलिंडरचा तपशिल	मे.लिओ ऑक्सिजनचा मंजूर दर (सर्व करासहित)	मे.स्पिड ट्रेनिंग इंटरप्रायझेस यांचे प्राप्त दर (सर्व करासहित)	सर्वात कमी दर (सर्व करासहित)
1	Cryogenic Liquid Oxygen Cylinder 230 Ltrs	-	रु. 10,920/-	रु.10,920/-
2	Medical Oxygen Jumbo Cylinder 7 M3	रु. 493/-	रु. 392/-	रु. 392/-
3	Small Oxygen Cylinder 1.5 M3	रु. 325/-	रु. 112/-	रु. 112/-

सोबत तक्यात नमुद केलेले मे.स्पिड ट्रेनिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा यांचे दर कमी असून सदरचे दर वाहतुक खर्चासह आहेत. सद्यस्थितीत कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवर ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सेवा सक्षम व स्थानिक उत्पादकाकडून पुरविणे योग्य होईल. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील सर्व रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे व कोवीड रुग्णालये या सर्वांकरीता ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग करणेकामी मासिक अंदाजे

18/9

खर्च रक्कम रु.१५ लाख अपेक्षित असून सदरचा खर्च "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह रुग्णालयीन उपकरणे खरेदी तसेच देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखालील नमुद तरतुदी मधून भागविता येणे शक्य होणार आहे. तरी मे.लिओ ऑक्सिजन यांची "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे" या कामीची मंजूर ई-निविदा रद्द करणे कामी तसेच मे.स्पिड ट्रेनिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा यांच्याकडून आवश्यकतेनुसार ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सेवा पुढील आदेश होईपर्यंत उपलब्ध करून देणेकामी होणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेकामीच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ (क्र.५९) अनुसूची (ड) प्रकरण ५.२.२ व ६७ (क) अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त मे.लिओ ऑक्सिजन यांची "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे" या कामीची मंजूर ई-निविदा रद्द करणे कामी तसेच ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सेवा मे.स्पिड ट्रेनिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा (पूर्व) यांच्याकडून पुढील आदेश होईपर्यंत उपलब्ध करून घेणेकामी होणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी) 18/9/2020.
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर, पिन नं ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल -vasaivirarcorporation @yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९०८ विभाग : आस्थापना

दिनांक : १८/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या त्रेवार्षिक वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिकेच्या विविध विभागातील तांत्रिक, प्रशासकीय व विकास कामे करण्यासाठी अभिकर्ता नेमणेबाबत प्राप्त झालेल्या ई-निविदांपैकी कमी दराच्या ई-निविदाधारकाकडून सुरक्षा अनामत रक्कम घेणे, त्यांच्याशी संविदा करणे व त्यांना कार्यादेश देणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि. ३ जुलै, २००९ रोजी झाली. त्यात विरार, नालासोपारा, नवघर-माणिकपूर व वसई या तत्कालीन चार नगरपरिषदा व ५५ महसूली गावांचा समावेश आहे. महानगरपालिकेचा कायम कर्मचारी वर्ग अपुरा पडत असल्याकारणाने बांधकाम, पाणी पुरवठा, सामान्य प्रशासन, सार्व.आरोग्य, सार्व.वाचनालय, अग्निशमन, वाहन, महिला व बालकल्याण, दिवाबत्ती, नगररचना इ. विभागातील प्रशासकीय, तांत्रिक व विकास कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६६ अ अन्वये अभिकर्त्यांद्वारे कर्मचाऱ्यांची कंत्राटी/ठेका तत्वावर नेमणूक करून केली जात आहेत.

मा. आयुक्त तथा प्रशासक, ठराव क्र. ०६, दि. ०७/०७/२०२० अन्वये सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या त्रेवार्षिक वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिकेच्या विविध विभागांत तांत्रिक, प्रशासकीय व वित्तीय कामे करण्यासाठी कंत्राटी तत्वावर मनुष्यबळ पुरविणेसाठी अभिकर्ता नेमणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने वेगवेगळ्या संवर्गातील पदे ठेकापध्दतीने पुरविणाऱ्या इच्छूक पुरवठादार, संस्था, कंत्राटदाराकडून सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या तीन वित्तीय वर्षाकरीता जावक क्र. वविशम/आस्था/३९०/२०२०, दि. ९/०७/२०२० अन्वये जाहिर ई-निविदा सूचना दै. लोकसत्ता, दै. सामना व दै. नरवीर चिमाजी या वृत्तपत्रांत प्रसिध्द करून http//vvmc.maharashtra.etenders.in या संकेतस्थळावर दि. ५/०८/२०२० पर्यंत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

तरी ई-निविदा सूचनेनुसार ई-निविदा उघडण्यात आल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	निविदा धारकाचे नाव	नोंदणीकृत असल्यास नोंदणी क्र.	कामगार आयुक्तां कडिल नोंदणी क्र.	GST प्रमाणपत्र	मागील ३ वर्षाचे आयकर प्रमाणपत्र	ESIC नोंदणी प्रमाणपत्र	PF नोंदणी प्रमाण पत्र	पॅन कार्ड	व्यवसाय कर प्रमाणपत्र	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
१	स्वयंभू ट्रान्सपॉर्ट	√	√	√	√	√	√	√	√	पात्र
२	श्री राम एंटरप्रायजेस	√	√	√	√	अप्राप्त	√	√	√	अपात्र
३	हेना एंटरप्रायजेस	√	√	√	√	√	√	√	√	पात्र
४	साई गणेश एंटरप्रायजेस	√	√	√	√	√	√	√	√	पात्र

उक्त तक्त्यामधील श्री.राम एंटरप्रायझेय यांचे ESIC नोंदणी प्रमाणपत्र नसल्याने अपात्र ठरवून इतर तीन पात्र निविदाधारकांचे लिफाफे दि. १०/०८/२०२० रोजी सकाळी ११.४० वा. आर्थिक लिफाफे उघडण्यात आले. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. तसेच दि. १२/०८/२०२० रोजी श्री राम एंटरप्रायजेस यांना पात्र ठरवून दि. १३/०८/२०२० रोजी तांत्रिक बोलीचा लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	निविदा धारकाचे नाव	नोंदणीकृत असल्यास नोंदणी क्र.	कामगार आयुक्तां कडिल नोंदणी क्र.	GST प्रमाणपत्र	मागील ३ वर्षाचे आयकर प्रमाणपत्र	ESIC नोंदणी प्रमाणपत्र	PF नोंदणी प्रमाण पत्र	पॅन कार्ड	व्यवसाय कर प्रमाणपत्र	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
१	स्वयंभू ट्रान्सपॉर्ट	√	√	√	√	√	√	√	√	पात्र
२	श्री राम एंटरप्रायजेस	√	√	√	√	√	√	√	√	पात्र
३	हेना एंटरप्रायजेस	√	√	√	√	√	√	√	√	पात्र
४	साई गणेश एंटरप्रायजेस	√	√	√	√	√	√	√	√	पात्र

तरी उपरोक्त सर्व निविदा धारक हे पात्र असल्याने त्यांचा तांत्रिक बोलीचा लिफाफा उघण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	संवर्ग	मागणी करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या	स्वयंभू ट्रान्सपॉर्ट	हेना एंटरप्रायजेस	साई गणेश एंटरप्रायजेस	श्री राम एंटरप्रायजेस
१	लिपीक टंकलेखक	244	०.९९ %	४.९५ %	४.८५ %	३.३९ %
२	लघु टंकलेखक	19				
३	स्वच्छता निरीक्षक	48				
४	ग्रंथपाल	2				
५	सहा. ग्रंथपाल	7				
६	दुरध्वनी चालक	5				
७	तारतंत्री	59				
८	प्रमुख माळी	3				
९	ड्राफ्टसमन	11				
१०	सर्वेअर	5				
११	ट्रेसर	6				
१२	अग्निशमन विमोचक	177				
१३	चालक यंत्रचालक, अग्निशमन विभाग	41				

१४	वाहनचालक	42				
१५	शिपाई	49	०.९९ %	४.८० %	४.९० %	३.३९ %
१६	कक्ष सेवक, वैद्यकिय आरोग्य विभाग	43				
१७	कक्ष सेविका, वैद्यकिय आरोग्य विभाग	6				
१८	आया	29				
१९	मजूर	79				

अ. क्र.	संवर्ग	मागणी करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या	शासन निर्णय दि.२/२/२०१३ नुसार किमान १०% आर्थिक बचतीच्या अनुषंगाने महानगरपालिकेने ठरविलेला प्रती कर्मचारी मासिक दर (रुपये) (अ.क्र.२० ते २९)	स्वयंभू ट्रान्सपॉर्ट	हेना एंटरप्रायजेस	साई गणेश एंटरप्रायजेस	श्री राम एंटप्रायजेस
२०	सहा. क्रिडा अधिकारी	1	36,816/-	०.९९ %	४.८० %	४.९० % %	५.१९ %
२१	सहा. उद्यान अधिक्षक	3					
२२	विधी अधिकारी	5	37,072/-	०.९९ %	४.८० %	४.९० %	५.१९ %
२३	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	91					
२४	कनिष्ठ अभियंता (विद्युत)	10					
२५	कनिष्ठ अभियंता (यांत्रिक)	8					
२६	कनिष्ठ अभियंता (Computer Software)	5					
२७	कनिष्ठ अभियंता (Computer Hardware)	2					
२८	कनिष्ठ अभियंता (Network)	2					
२९	संगणक तंत्रज्ञ (Programmer)	2					

			अर्धकुशल (घरपट्टी/पाणीपट्टी) (अ.क्र.३०)				
३०	घरपट्टी पाणीपट्टी वसुली कामी अर्धकुशल मनुष्यबळ	110	21736/-	०.९९ %	४.८० %	४.८५ %	२.९४ %

उपरोक्त ई-निविदा भरल्याबाबत तक्ता तपासण्यात आला त्यानुसार मे. स्वयंभू ट्रान्सपॉर्ट यांची कमी दराची ई-निविदा (०.९९ %) सर्वात कमी दराची आहे. सदर ई-निविदा दि. रोजी ई-निविदा समिती समोर ठेवली असता निविदा समिती सदस्य तथा मुख्य लेखापरिक्षक यांनी मे. स्वयंभू ट्रान्सपार्ट कंपनी यांचे दर ०.९९% हा कमी असल्याने २% आयकर व इतर सरचार्ज भरुन कशा प्रकारे काम करु शकेल या बाबत संबंधित ठेकेदारास समक्ष बोलावून या बाबत खुलासा घ्यावा, असे निर्देश दिले होते.

त्यानुसार मे. स्वयंभू ट्रान्सपॉर्ट यांना दि. १९/०८/२०२० रोजी सायंकाळी ४.०० वा. महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, मा. आयुक्त दालनात बोलविण्यात आले. त्यांना विचारणा केली असता त्यांनी सदर ई-निविदा ०.९९ % या प्रोफिट दराने काम करण्यास होकार दिलेला आहे तसेच सदर कामकाजासाठी महानगरपालिकेच्या हद्दीत एक कार्यालय स्थापन करुन त्यात महापालिकेशी समन्वय साधण्यासाठी एक मॅनेजर व कर्मचारी नेमून ठेक्याचे कामकाजाचा समन्वय ठेवतील. कर्मचाऱ्यांचे पगाराबाबत व त्यांचे शासकीय वजावटी भरण्याबाबत कोणतीही तक्रार उद्‌भवणार नाही.

तसेच या संदर्भात करारनाम्यातील अटी व शर्ती काय असाव्यात या संदर्भात दि. २/९/२०२० व दि. ४/०९/२०२० रोजी बैठक बोलावून निविदा समितीमध्ये करारनाम्यात अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या.

प्रारुप करारनाम्याचा मसुदा मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांना पत्र क्र. वविशम/आस्था/६००/२०, दि. ५/०९/२०२० रोजी पाठवून मंगळवार दि. ०८/०९/२०२० रोजी सांकाळी ४.०० वाजता निविदा समिती समोर करारनाम्यातील अटी व शर्ती अंतिम करणे व त्यातील संदिग्ध दूर करणे इत्यादी विषयावर चर्चा करण्यासाठी कळविण्यात होते.

दि. ८/०९/२०२० च्या निविदा समितीच्या बैठकीत सदस्यांनी काही मुद्दे उपस्थित केल्याने सदर मुद्यांबाबत खालीलप्रमाणे खुलासा करुन समितीने अंतिम निर्णय होणेसाठी मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेशी करारनामा करण्याचा मसूदा अंतिम करुन खालीलप्रमाणे सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत.

अ.क्र	उपस्थित मुद्दा	समितीचा निर्णय
१	प्रतिनिधी यांनी करारनाम्यातील अट क्र. ४ व २४ व प्रपत्र २ मधिल अनु. क्र. ६ शासकीय विमा १ % कपात निविदा दर सुची (Price Schedule) नाही. आम्हाला गट विमा काढावा लागेल. प्रत्येक कर्मचाऱ्यांचे वेतनातुन कपात करावा लागेल, असा मुद्दा उपस्थित केला	१) प्रत्येक कर्मचाऱ्यांचे वेतनातुन पगार कपात करुन गट विमा काढल्यास त्याचा पुरावा सादर केल्यास देयकातून १% शासकीय विमा रक्कम कपात केली जाणार नाही. २) करारनाम्यासोबत Price Schedule १ ते ४ वेतनगटाप्रमाणे देण्यात येईल.
२	करारनाम्यातील अट क्र.२१ अन्वये अभिकर्त्याने दर महा देयक तयार/सादर करताना मागील महिन्याचे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे किमान वेतन, ई.पी.एफ.,	उद्योग उर्जा व कामगार विभागाकडिल शासन निर्णय दि. २२/०२/२०१९ अन्वये अभिकर्त्याने प्रथम ठेकेपध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन दर महिन्याचे ५

	ई.एस.आय.सी., पी.टी. कामगार कल्याण निधी, व्यवसाय कर इ. शासकीय भरणाबाबतचे दस्तऐवज इत्यादी तपशिल देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील.	तारखेपूर्वी करुन व इतर शासकीय वजावटी भरल्याची चलने सोबत जोडूनच देयकाची मागणी करावयाची आहे.
३	अट क्र. ३३, ४ % सुरक्षा अनामत Fix Deposit मध्ये न घेता Bank Gaurantee मध्ये घ्यावी. पगार आम्ही करुन नंतर बिलाची मागणी करणार आहेत सुरक्षा अनामत Bank Gaurantee मध्ये घेतल्यास त्याचे पैशामध्ये (Liquidation) मध्ये रुपांतर करणेस विलंब लागतो. सबब बँक गॅरंटी न घेता Fix Deposit घेणे उचित ठरेल.	१) ४% रक्कमे पैकी २.५ % BG १.५ % FD रक्कम सुरक्षा अनामत रक्कम मध्ये भरणा करावी. २) इसारा रक्कम (EMD) (१%) पूर्णपणे Fix Deposit स्वरूपात वळती करुन घेण्यात यावी.

उक्त सर्व करारनाम्यातील काही ठिकाणी सुधारणाकेलेल्या अटी शर्ती मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट चे प्रतिनीधी यांनी मान्य केले. केलेल्या आहेत तसेच मुद्दे देखील मान्य केलेले आहेत.

मा. निविदा समितीने खालीलप्रमाणे शिफारसी केलेल्या आहेत. (निविदा समितीचे इत्तीवृत्त पृष्ठ क्र. प/वि वर ठेवले आहे)

१) मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेशी सुधारित केल्यानुसार करारनामा करणेस शिफारस आहे.

२) करारनामा (Letter of Acceptence) सोबत संबंधित न्यूनतम निविदा धारकास पाठविण्यात व १० दिवसांत त्यांच्याशी संविदा करणेस शिफारस केलेली आहे.

निविदा समितीने शिफारस केल्यानुसार मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेशी संविदा करणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये वरील कमी दराची ई-निविदाधारकासोबत संविदा करणेबाबत आस्थापना विभागाकडून आलेला अहवाल त्यावरील मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांचे अभिप्राय पाहणेत आले, त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

प्रस्तावाचा निर्णय :- उपरोक्त सर्वात कमी /न्यूनतम दराच्या मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट या ठेकेदारासोबत कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस, त्यांना कार्यादेश देणेस व त्यांचे मासिक देयके अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

तसेच असेही निर्देश देत आहे की, नेमण्यात येणाऱ्या अभिकर्त्याने / ठेकेदाराने महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार ठेका कर्मचाऱ्यांस वेतन देणे बंधनकारक आहे. महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी वेतन अदा करीत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित ठेकेदारावर आवश्यकती कायदेशीर कारवाई करण्यात यावी व त्याला काळ्या यादीत टाकण्याबाबत प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

18/9/2020.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३०९

विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक ३८/९/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील श्री जीवदानी देवी रुग्णालय, चंदनसार येथे चादरी, कपडे, बेडशीट धुण्यासाठी कमर्शिअल वॉशिंग मशिनसेट खरेदी करणेबाबत येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये कोविड-१९ चे रुग्ण मोठ्या प्रमाणात सापडत आहेत. क्रिटीकल रुग्णांवर उपचाराकरीता महानगरपालिकेने चंदनसार, विरार येथे **श्री जीवदानी देवी रुग्णालय** सुरु केलेले आहे.

सदर रुग्णालयात रुग्णांची संख्या दिंवसेदिवस वाढत आहे. सध्या ४० पेक्षा अधिक रुग्ण दाखल आहेत. या रुग्णावर उपचार केल्यानंतर व बरे झाल्यावर डिचार्ज केले जाते. त्यानंतर त्यांनी वापरलेल्या चादरी, बेडशिट निंजंतुकीकरण करुन चादरी व बेडशीट धुवाव्या लागतात. सध्या पावसाळा असल्याने चादरी व बेडशीट सुकल्या जात नाहीत. यासाठी गरम पाण्यात डिर्टजंट टाकून निंजंतुकीकरणसाठी वॉशिंग मशिन, हायड्रो एक्स्ट्राक्टर व टम्बलर ड्रायर इत्यांदी कमर्शिअल मशिनरी चा संच आवश्यक आहे. सदर मशिन घेणेबाबत मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी निंदेश दिलेले आहेत.

यापूर्वी संत गोन्सालो गार्सिया कॉलेज येथिल कोविड उपचार केद्रावर मॉकाटेक्स कंपनीचे उपरोक्त मशिन संच बसविण्यांस आले असून ते सुरळीतरित्या काम करीत आहेत. त्याच दराने सदर उत्पादक कंपनी कडून वॉशिंग मशिन संच विना ई-निविदा थेट उत्पादक कंपनी कडून केल्यास मशिनरी त्वरीत उपल्बध होतील.

श्री जिवदानी रुग्णालय, चंदनसार येथे सध्या कोविड रुग्णावर उपचार सुरु आहेत. भविष्यात कोविड साथ संपल्यानंतर रुग्णालयामध्ये रुग्ण खाटाची संख्या वाढीचा विचार करता वॉशिंग मशिनची गरज भासणार आहे. त्यामुळे खरेदी केलेल्या मशिनचा वापर योग्य होईल.

मे. मॉकाटेक्स कंपनी यांनी मशीनरी पूरविणे बाबत खालीलप्रमाणे दरपत्रक सादर केलेले आहे व ते सोबत जोडले आहे.

अ.क्र.	तपशिल	क्षमता	आवश्यक नग	प्राप्त दर (सर्वकरासहित)
१.	वॉशिंग मशिन मॉडेल क्र. MVW-२० मार्काटेक्स	२० KG	१ नग	२५००००
२.	मार्काटेक्स हायड्रो एक्स्ट्रॅक्टर मॉडेल क्र.MHE-१५	१५ KG	१ नग	१४००००
३.	मार्काटेक्स टंबलर ड्रायर मॉडेल क्र.MTP-१५	१५ KG	१ नग	२१००००
			एकुण	६०००००

अ.क्र.	तपशिल	क्षमता	आवश्यक नग	प्राप्त दर (सर्वकरासहित)
			Discount १० %	६००००
			एकूण	५४००००
			वाहतुक खर्च	१२७१२
			एकुण	५५२७१२
			१८% GST	९९४८८
			एकुण	६,५२,२००/-

वरील मशिनरींची दैनदिंन आवश्यकता असल्याने व ई-निविदा प्रक्रियेस विलंब होणार असल्याने थेट उत्पादकाकडून खरेदी केल्यास मनपाचे आर्थिक हिताचे राहील.

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय विभागातील रुग्णालय व शहराअंतर्गत विविध ठिकाणी दवाखाने व्यवस्थापन अंतर्गत ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह रुग्णालयातील उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी महानगरपालिकेच्या श्री जीवदानी देवी रुग्णालय, चंदनसार रुग्णालय येथे कमर्शिल वॉशिंग मशिन संच खरेदी करावयाचे असून त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा मे. मॉकाटेक्स लॉन्ड्री ॲण्ड गारमेंट फिनिशिंग इक्वीप्मेंट प्रा.लि. या उत्पादक कंपनीकडून विना ई-निविदा तात्काळ थेट खरेदी करण्यांस येणाऱ्या रक्कम रु.६,५२,२०००/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव:- सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद आवश्यक वॉशिंग मशिन तात्काळ में. मॉकाटेक्स लॉन्ड्री ॲण्ड गारमेंट फिनिशिंग इक्वीप्मेंट प्रा.लि. हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ रुग्णांकरिता उपचार केंद्रावर चादरी, कपडे, बेडशीट धुण्यासाठी कमर्शिअल वॉशिंग मशिनसेट खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ६,५२,२००/- (अक्षरी सहा लक्ष बावन्न हजार दोनशे मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

14/9

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६१०

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ३८/०९/2020

प्रस्तावाचा विषय :- विजयनगर तुळींज रुग्णालयात डायलेसिस मशिनची दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मंजुरी मिळणेबाबत..

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागा अंतर्गत विजयनगर तुळींज रुग्णालय येथे ऑगस्ट २०१६ पासून ४ बेड क्षमतेचा डायलेसिस विभाग सुरु करण्यात आलेला असून सद्यस्थितीत ४ मशिनपैकी फक्त एकच मशिन कार्यरत असून नियमितपणे डायलेसिस सेवा घेणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत आहे. विजयनगर तुळिंज मधून प्राप्त टिपणीतील अहवाल अवलोकनी घेता डायलेसिस विभागातील ३ नग मशिनची त्वरीत दुरुस्ती व १ मशिनची देखभाल (Servicing) करणे गरजेचे आहे. सदर मशिनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मंजूर असलेले निविदाधारक मे.डिस्प्लेअर ट्रेनिंग कॉर्पोरेशन, मुंबई सेवा नियमितपणे देत नसल्यामुळे दि.१०/०८/२०२० रोजीच्या टिपणीनुसार संबंधित निविदाधारकावर पुढील कार्यवाही करणेकामी प्रस्तावित आहे. डायलेसिसची सेवा ही अत्यावश्यक बाबीत मोडत असून रुग्णांची गैरसोय टाळणेकामी तुळींज रुग्णालयातून देखभाल दुरुस्ती सेवा देणाऱ्या वितरकांच्या प्रतिनिधी मार्फत डायलेसिस मशिनची पाहणी करण्यात आली. त्यांच्याकडून देखभाल दुरुस्ती करणेकामी ई-मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले, त्या प्राप्त दरपत्रकांचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	मशिन दुरुस्तीचा तपशिल	दुरुस्ती करणेकामी लागणाऱ्या एकूण नगांची संख्या	मे.डॉ.सिध्दी लॅबोरेटरीज , विरार यांच्याकडून प्राप्त दर	मे.श्री गजानन मेडीकल स्टोअर्स, विरार यांच्याकडून प्राप्त दर	मे.मिल्टन जनरीक प्रा.लि., मुंबई यांच्याकडून प्राप्त दर	सर्वात कमी दर सर्व करासहित
1	Nipro Haemodi	2	35400	35860.20	35966.4	**35400**

	alysis Machine flow Sensor					
2	Nipro Haemodialysis Machine Sub Board Blood Pump Repair Charges	1	21240	21516.12	21579.84	**21240**
3	Nipro Haemodialysis Machine Viscas Pump Motor	1	33040	33469.52	33568.64	**33040**
4	Conductivity Cell	2	2360	2390.68	2397.76	**2360**
5	Alarm Bulp	1	1003	1016.04	1019.05	**1003**
6	Heperin Pump 'O' Ring Sensor	4	8496	8606.45	8631.93	**8496**
7	Blood Pump Sensor	1	3540	3586.02	3596.64	**3540**
8	V.Pressure wair	3	7788	7889.24	7912.61	**7788**
9	Hansen Connector	1	1062	1075.81	1078.99	**1062**
10	Service Charges For each Machine	4	16520	16734.76	16784.32	**16520**
		Total	**रु.1,30,449**	रु.1,32,144.84	रु.1,32,536.18	**रु.1,30,449**

वरील प्राप्त दरपत्रकापैकी मे.डॉ.सिध्दी लॅबोरेटरीज, विरार यांच्याकडून प्राप्त नमुद दर (रु.१,३०,४४९/-) सर्वात कमी आहे. विजयनगर तुळींज रुग्णालयातील

डायलेसिस विभागातील मानद नेफ्रॉलॉजिस्ट यांनी सदर दर वाजवी असल्याचे कळविलेले आहे. तरी मशिन दुरुस्त करणे आवश्यक आहे. सदर कामी होणारा खर्च "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह रुग्णालयीन उपकरणे खरेदी तसेच देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखालील नमुद शिल्लक तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे. तरी मे.डॉ.सिध्दी लॅबोरेटरीज यांच्याकडून डायलेसिस मशिन दुरुस्ती करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,३०,४४९/- इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेकामी मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ (क्र.५९) अनुसूची (ड) प्रकरण ५.२.२ व ६७ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये उपरोक्त डायलेसीस मशिन दुरुस्त करणेकामी येणाऱ्या रक्कम रु. १,३०,४४९/- (अक्षरी एक लाख तीस हजार चारशे एकोणपन्नास रु. मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. १११

विभाग :- आरोग्य विभाग
दिनांक :३०/९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दैनंदिन रस्ते सफाई करणेकामी यांत्रिक झाडू (Road Sweeping Machine Vehicle) खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि.३ जूलै २००९ रोजी झाली असून भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई या शहराच्या लगतचे शहर म्हणून वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्राची दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार वसई विरार शहराची लोकसंख्या १२,२२,३९० एवढी असून सद्या स्थितीत अंदाजे २० लक्ष लोकसंख्या असून त्यामध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. वाढती लोकसंख्या व शहरीकरणाचा विचार करता महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत प्रभाग समिती A ते I मध्ये दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन या दैनंदिन स्वच्छतेच्या कामाकरिता २० झोन तयार करुन २० अभिकर्त्यांची नेमणूक केली आहे. वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात निर्माण होणारा घनकचरा संकलन व गटार सफाई करणेकामी प्रभाग निहाय कचरा संकलनासाठी १३७४ एवढे मनुष्यबळ सद्यस्थितीत कार्यरत आहेत. तसेच गटार सफाईसाठी ७८६ व रस्ते सफाई करण्यासाठी १२५२ असे एकुण ३४१२ मनुष्यबळ सद्यस्थितीत कार्यरत आहेत.

तरी वसई विरार शहर महानरगपालिका कार्यक्षेत्रात ९२४ कि.मी. लांबीचे रस्ते असून सदरील रस्त्यांची स्वच्छता करणेकामी १२५२ मनुष्यबळ सद्यस्थितीत उपलब्ध आहेत. सदरील मनुष्यबळावर मासिक खर्च रक्कम रु.३,०४,७२,४२७/- एवढा होत असून सदरील खर्च मोठया प्रमाणात होत असल्याने तसेच वाढते शहरीकरणामुळे दिवसाघडीत रस्त्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे भविष्यात सदरील रस्त्यांची स्वच्छता करणेसाठी मोठया प्रमाणात मनुष्यबळाचा वापर करावा लागणार आहे. सदरील बाब हि खर्चीक असल्याने सदरील कामाच्या खर्चावर नियंत्रण मिळविण्यासाठी रस्ते यांत्रिक पध्दतीने स्वच्छ केल्यास कमी मनुष्यबळ व वेळेची बचत होऊ शकते तसेच मनुष्यबळावर होणाऱ्या खर्चास हि आळा घालता येऊ शकतो.

तरी भविष्यात रस्ते सफाईचा विचार करता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ते सफाई करणेकामी यांत्रिक झाडू (**Road** Sweeping Machine Vehicle) ने रस्ते स्वच्छतेसाठी वापरल्यास रस्त्यावरील माती, गवत व केर कचरा यांत्रिक झाडूने उचल्यास मनुष्यबळावरील खर्च व वेळेची बचत होणार असल्याने मा.आयुक्त सो. यांच्या सुचनेनुसार खरेदी करण्यात येणाऱ्या यांत्रिक झाडूचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वाहनाचे नाव	प्रति मशीन दर	GST १८%	खरेदी करावयाच्या मशिनची संख्या	GST सह दोन मशीन खरेदीसाठी होणारा एकूण खर्च
१	यांत्रिक झाडू (**Road** Sweeping Machine Vehicle)	रु.१,८०,००,०००/-	रु.३२,४०,०००/-	२	रु.४,२४,८०,०००/-

तरी वरीलप्रमाणे यांत्रिक पध्दतीने रस्ते सफाईसाठी यांत्रिक झाडू (**Road** Sweeping Machine Vehicle)खरेदी करणेकामी अंदाजे GST सह **रक्कम रु.४,२४,८०,०००/- (अक्षरी रक्कम रु.चार कोटी चोवीस लक्ष ऐंशी हजार मात्र)** एवढा खर्च अपेक्षीत आहे. सदरील खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील **लेखाशिर्ष घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इत्यादी साफसफाईसाठी घंटा गाडी यांत्रिक झाडू उपलब्ध करणेसह ठेका व भाडयाच्या वाहनाद्वारे यांत्रिक पध्दतीने नाले सफाई** या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद **रक्कम रु. १५५** मधून भागविणे शक्य आहे.

तरी वसई विरार शहर महनगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ते यांत्रिक पध्दतीने सफाई करणेकामी यांत्रिक झाडू (Road Sweeping Machine Vehicle) ई-निविदा प्रक्रियेने वाहन विभागाकडून खरेदी करणेकामी व त्यासाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

D/Aarogy/korona/GEM Portal/ prashaskiy thrav

ठराव निर्णय :-

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दैनंदिन रस्ते सफाई करणेकामी २ यांत्रिक झाडू (Road Sweeping Machine Vehicle) ई-निविदा प्रक्रियेने वाहन विभागाकडून खरेदी करणेस व होणाऱ्या **रक्कम रु.४,२४,८०,०००/- (अक्षरी रक्कम रु.चार कोटी चोवीस लक्ष ऐंशी हजार मात्र)** एवढया अंदाजीत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

8/9/2020.

प्रशासक / आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

D/Aarogy/korona/GEM Portal/ prashaskiy thrav

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३१२ विभाग :- वाहन

दिनांक :- १८/०९/ २०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकरीता ४ नग रुग्णवाहीका जी.इएम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेस व त्यावर आवश्यक उपकरणे बसविणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- देशात कोरोना विषाणुचा संसर्ग मोठया प्रमाणात झाला असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणुच्या संसर्गामुळे कोरोना रुग्ण वाढत आहेत. त्याकरीता नागरिकामध्ये संसर्ग वाढु नये याबाबत वेळोवेळी वेगवेगळया उपाययोजना महापालिकेमार्फत केल्या जात आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विलगीकरण व अलगीकरण कक्षात ठेवण्यात येणाऱ्या संबंधित रुग्णांची स्वॅब तपासणी करणे, संशयित रुग्णांचे स्वॅब घेतल्यानंतर ते पुढील तपासणीसाठी हाफकीन इन्स्टीटयुट व इतर ठिकाणी पाठविणे याकामी रुग्णवाहीकेची आवश्यकता भासत असते. महानगरपालिका मालकीच्या एकुण ८ रुग्णवाहीका असुन कोरोना(कोव्हीड-१९) विषाणुचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता आपल्याकडील रुग्णवाहीका अपुऱ्या पडत असल्यामुळे खाजगी रुग्णवाहीका भाडेतत्वावर उपलब्ध कल्या असुन त्यांचा प्रति माहे अंदाजित भाडे खर्च रु. ५ ते ६ लक्ष एवढा येत असुन वर्षाकाठी अंदाजे रु. ७० ते ७२ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे.

रुग्णवाहीकेसाठी द्यावे लागणारे भाडे खर्चाचा विचार करुन मा. आयुक्त सो. यांनी मे. फोर्स मोटर्स या कंपनीच्या बी टाईप ४ नग रुग्णवाहीका जीइएम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेकामी दि. २८/०५/२०२० रोजी निर्देश दिलेले आहेत. मे. फोर्स मोटर्स या कंपनीच्या टेम्पो ट्रॅव्हलर रुग्णवाहीकांच्या बी ,सी व डी इ. प्रकार असुन यामधुन बी टाईप रुग्णवाहीका खरेदी करणे व त्यामध्ये ऑक्सीजन किट ठेवण्याची व्यवस्था, एक्सटर्नल बॅटरी, इलेक्ट्रीकल सॉकेटर्स, ४ नग छोटे फॅन इ. वस्तु बसविणे आवश्यक आहे.

जी.इएम (Government E-Marketplace) पोर्टलवरील १ नग रुग्णवाहीकेची अंदाजे खरेदी किंमत रु. १३,९५,७४३/- (तेरा लक्ष पंच्याण्णव हजार सातशे त्रेचाळीस मात्र) असुन ४ नग रुग्णवाहीकेची अंदाजित किमत रु. १५,८२,९७२/- (अक्षरी पंच्यावन्न लक्ष ब्याऐंशी हजार नऊशे बाहत्तर मात्र) एवढी आहे. तसेच इतर आवश्यक उपकरणे रुग्णवाहीकेत बसविण्यासाठी अंदाजे रक्कम रु. चार लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. असा एकुण रु. ५९,८२,९७२/- इतका अंदाजे खर्च आवश्यक आहे. सदरच्या खर्चाकरीता वैद्यकीय आरोग्य विभागाच्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकातुन रुग्णवाहीका व शववाहीनी खरेदी व आऊटसोर्सिंग या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रु. १ कोटी २० लक्ष इतकी तरतुद आहे. रुग्णवाहीकेच्या आऊटसोर्सिंगचा प्रस्ताव सभागृहाने अद्याप मंजुर केलेला नाही. करीता सदर लेखाशिर्षाखाली रुग्णवाहीकेसाठी खरेदी करणेचा खर्च करता येईल.

सद्यस्थितीत लॉकडाउन सुरु असुन महानगरपालिकेच्या सोशल डिस्टसिंगमुळे बैठका घेता येत नाही. व रुग्णवाहीकांची निकड या बाबींचा विचार करुन रुग्णवाहिका तातडीने विकत घ्यावयाचा असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसूची -ड प्रकरण ५ संविदा २ (२) नुसार महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोगय विभागासाठी नवीन ४ नग रुग्णवाहिका जीइएम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करता येणे शकय होईल. तद्नंतर सभा होतील किंवा प्रशासकिय राजवटीत प्रस्ताव रितसर मंजूर करुन घेता येईल.

तरी फोर्स या कंपनीच्या बी टाईप प्रकारचे ४ नग रुग्णवाहीका वाहने जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेस व त्यास आवश्यक उपकरणे बसविणेकामी येणाऱ्या खर्च रक्कम रु. ५९,८२,९७२/- (अक्षरी रु. एकोणसाठ लक्ष ब्याऐंशी हजार नऊशे बाहत्तर मात्र) ला अनुसूची - उ प्रकरण ५ संविदा २ (२) खाली कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजने अंतर्गत वसई- विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागा करीता ४ नग रुग्णवाहीका मे. फोर्स मोटर्स या कंपनीच्या टेम्पो ट्रॅव्हलर रुग्णवाहीका हे वाहन जी.इएम(Government E-Marketplace)पोर्टलवरून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रुपये ५९,८२,९७२/- (अक्षरी रुपये एकोणसाठ लक्ष ब्याऐंशी हजार नऊशे बाहत्तर मात्र) ला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त यांचे दि.३०/०५/२०२० जा.क्र.५७ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेचा मंजूरी आदेश घेण्यात आलेला होता. सदर आदेशान्वये खरेदी कलेल्या मे. फोर्स मोटर्स या कंपनीच्या ४ नग टेम्पो ट्रॅव्हलर रुग्णवाहीकांस, रुग्णवाहिकांच्या प्रत्यक्ष खरेदी खर्च र. रु. ५६,२९,०५२/- व वाहनास स्टिकर लावणे, नंबर प्लेट लावणे आणि आर.टी.ओ. नोंदणीकामी आलेल्या खर्च रक्कम रु. २२,५००/- अशा एकूण प्रत्यक्षात आलेल्या खर्च रक्कम रु. ५६,५१,५५२/- (अक्षरी रुपये छप्पन्न लक्ष एक्कावन्न हजार पाचशे बावन्न मात्र) ला अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

18/9/2020

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ९९३

विभाग :- वाहन

दिनांक :- १८/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- मौजे गोखिवरे येथील क्षेपण भूमीतील डोझर दुरुस्ती करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात दररोज सरासरी ६२५ ते ६५० मे. टन कचरा गोळा करुन ५६ कॉम्पेक्टर व ५७ डंम्परव्दारे गोखिवरे येथील क्षेपण भूमीवर जमा करण्यात येतो. क्षेपण भूमीवरील कचरा सपाटी करण्यासाठी व गाडयामधुन उतरलेला कचरा उचलून वरच्या भागात टाकण्यासाठी डोझर व पोकलेनचा वापर करण्यात येतो.

महानगरपालिकेकडे ५५० टन क्षमतेचा कोमाक्सु कंपनीचा डोझर असून तो गेल्या ६ महिन्यापासून नादुरुस्त आहे. सदर डोझर सुमारे ३.५० वर्ष जुना असून कचऱ्यामध्ये सारखा वापरामुळे त्याची चेन पुर्णपणे नादुरुस्त झालेली आहे. तसेच मेकॅनीकल भाग सुध्दा नादुरुस्त झालेला आहे.

गोखिवरे येथील क्षेपणभूमी करिता सुमारे १९ हेक्टरची जागा आरक्षित असून सद्य: सुमारे ६ हेक्टर जागेमध्ये कचरा गेल्या १० वर्षापासून साठविण्यात येत आहे. सदर कचरा टेकडीच्या वरच्या भागात पोहचविण्यासाठी कच्चा रस्ता करण्यात आला होता व त्या रस्त्यावरुन वाहतूक करुन कचरा वरच्या बाजूस वाहतूक करण्यात येत होता.

येत्या जून महिन्यापासून पावसाळा सुरु होत असल्यामुळे टेकडीच्या वरच्या बाजूस कचऱ्याने भरलेल्या गाडया चढविण्यास अडचणी येतात व गाडया सरकण्याचे प्रकारही घडतात. त्यामुळे कचरा रस्त्याच्या लगतच वजन काटयाच्या समोर आणि एस.एल.एफ.च्या समोरच खाली करावा लागतो. व त्यानंतर कचरा पोकलेनचा वापर करुन पुन्हा वरच्या बाजूस स्थलांतरीत करावा लागतो. सदर कचऱ्याची उंची व टेकडीची उंची या दोन्ही बाबी विचारात घेता कचरा वरच्या बाजूस एका पोकलेनव्दारे स्थलांतरीत करणे अशक्य होत असल्याने दोन टप्प्यात कचरा दोन पोकलेनचा वापर करुन वरच्या भागात स्थलांतरीत करावा लागतो.

यापूर्वी गोखिवरे येथील क्षेपण भूमीतील डोझर दुरुस्ती करणेकामी मा. स्थायी समितीने मे. दिलशाद अर्थ मुविंग सर्विसेस यांच्या रु. २३,४९,११०/- रकमेचे दरपत्रकास दि. १८/०१/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ४६२ अन्वये काम लवकरात लवकर पूर्ण करुन घेण्याच्या अनुषंगाने निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची - ड प्रकरण - ५ संविदा २(२) नुसार प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात आली होती. त्याप्रमाणे दि. ०५/०७/२०१९ रोजी करारनामा करुन दि. ०८/०२/२०१९ रोजीच्या आदेशान्वये सदर कामाचा कार्यादेश देण्यात आला होता. तद्नंतर १ महिन्याच्या कालावधीत डोझरचे काम पूर्ण करुन तो कार्यान्वित करण्यात आला. सदर डोझर ऑगस्ट महिन्याच्या मध्यापर्यंत कार्यान्वित होता. परंतु पावसाळ्या दरम्यान कार्यरत असताना त्याची चैन ही नादुरुस्त झाली असून ती पूर्णपणे नव्याने टाकणे गरजेचे झाले आहे. प्रथमत: केलेल्या कामात चैन हा मॅकेनिकल पार्ट बदलण्यात आला नव्हता व मे. दिलशाद अर्थ मुविंग सर्विसेस यांनी दिलेल्या दरपत्रकात डोझर चैन ही वस्तु नव्याने घेण्यात आली नव्हती.

तद्नंतर मा. आयुक्त सो. यांच्या तोंडी आदेशान्वये सदर डोझर दुरुस्त करुन पूर्ववत करण्याबाबत सांगण्यात आले. पुढील कार्यवाही करताना मागील ठेकेदाराकडून डोझरची पहाणी करुन अंदाजित दरपत्रक मागविले असता रु. ३२,७७,३५७/- चे दरपत्रक सादर केलेले आहे. सदर मशिन D85 ESS कोमात्सू ची असल्याने त्यांच्या कंपनीचे दरपत्रकसुध्दा मागविण्यात आले. त्यांनी रु. ३४,८२,३९७/- चे अंदाजित दरपत्रक सादर केले आहे. सदर दरपत्रकांचा विचार करता असे लक्षात आले की, DOZCO (India) Pvt. Ltd. या कंपनीव्दारे आपणास सदरचे अंडर कॅरेज (डोझर चैन स्प्रॉकेट दुरुस्ती) बाबत लागणाऱ्या पार्टस सदर कंपनी उपलब्ध करुन देत आहे. त्यानुसार त्यांनी डोझरची पहाणी केली असता सदरची पार्टस यादी व त्यांचे रु. १३,६४,११३/- रुपयाचे अंदाजित दरपत्रक सादर केले व सदर पार्टस ची ६ महिन्याची हमी दिलेली आहे. विचार करता आपणास DOZCO (India) Pvt. Ltd. या कंपनीव्दारे सदरचे पार्टस खरेदी करणे उचित असून एखाद्या अनुभवी मॅकेनिकव्दारे त्यांचे योग्य त्या प्रकारे फिटींग करणे महापालिकेच्या खर्चाच्या दृष्टीने सोयीचे होईल.

गोखिवरे येथील क्षेपणभुमीतील येणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण फारच जास्त असल्याने व पोकलेनव्दारे कचऱ्याची सपाटीकरण करणे शक्य होत नसल्याने महानगरपालिकेस पोकलेन, जेसीबी भाडेतत्वावर पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराकडून उपलब्ध करुन घेण्यात आले असुन डोझर

कचरा सपाटीकरणासाठी वापरण्यात येत आहे. क्षेपणभूमी मध्ये डोझरचा वापर करणे अत्यावश्यक आहे. परंतू भाडे तत्वावरील डोझर खर्चीक असल्यामुळे तसेच अतिवृष्टीमुळे व पावसामुळे क्षेपण भूमीची परिस्थिती, स्वच्छता अभियान अंतर्गत पुर्ववत करणेकामी महानगरपालिकेच्या मालकीचे डोझर दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

डोझर दुरुस्ती कामी लागणाऱ्या खर्चास महानगरपालिकेच्या २०२०-२१ च्या वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील साफसफाई वाहन दुरुस्ती व निगा लेखाशिर्षामधुन भागविणे शक्य असल्याने सदर येणारा खर्च प्रस्तावित करता येईल. सदर डोझर दुरुस्तीकामी DOZCO (India) Pvt. Ltd. या कंपनीव्दारे स्पेअर पार्टस खरेदी करणेकामी व त्यासाठी होणाऱ्या अंदाजित रु. १४,००,०००/- पर्यंतच्या खर्चास मा. आयुक्त सो. यांच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर.

<u>ठराव</u> :- मौजे गोखिवरे येथील क्षेपणभुमीतील डोझर तातडीने दुरुस्ती करुन घेणे गरजेचे असल्याने व येत्या स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत सदरची मशिनरी सुस्थितीत असणे गरजेचे असल्याने सदर डोझर दुरुस्तीकामी DOZCO (India) Pvt. Ltd. या कंपनीव्दारे स्पेअर पार्टस खरेदी करणेकामी अंदाजित रु. १४,००,०००/- पर्यंतच्या खर्चास तसेच सदरचे डोझर दुरुस्तीकामी मॅकेनिक खर्च (लेबर चार्जेस) साठी अंदाजित रु. २,९९,०००/- पर्यंतच्या असे एकुण रक्कम रु. १६,९९,०००/- (अक्षरी रु. सोळा लक्ष नव्याण्णव हजार मात्र) प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ११४ विभाग :-वाहन

दिनांक :-१८/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता २ नग व नगररचना विभागा करीता १ नग महिंद्रा बोलेरो B6 BS6 प्रकारचे वाहन जी.इ.एम (Government E- Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- सादर करणेत येते की, सादर करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे २ रुग्णालये तसेच विवधि ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माता बाल संगोपन केंद्रे, क्षयरोग विभाग व ९ दवाखाने कार्यरत आहेत. सदर कार्यालयात रुग्णालय नोंदणी विभाग, पी.सी.पी.एन. डी.टी. विभाग, साथरोग विभाग, प्रजनन व बाल आरोग्य विभाग, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान विभाग कार्यरत आहेत. त्याअनुषंगाने कार्यालयातील प्र. सहा. आयुक्त/ अधिकारी/ कर्मचारी यांना कार्यालयीन दैनंदिन कामकाजासाठी महानगरपालिका रुग्णालय, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने इ. ठिकाणी भेटी देणेसाठी चार चाकी वाहनांची आवश्यकता आहे. तसेच कार्यालयातील वैद्यकीय अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी कार्यक्षेत्रामधील वेळोवेळी जाहीर होणारे कार्यक्रमाचे निरीक्षण, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांची तपासणी, लसीकरण सत्र निरीक्षण, खाजगी रुग्णालये व पी.सी.पी.एन. डी.टी. केंद्रे, एम.टी पी. केंद्रे इ. करीता कार्यक्षत्रात भेटी/तपासणी देणेकामी चारचाकी वाहनांची आवश्यक आहे.

तसेच नगररचना विभागाकडुन इमारती बांधकाम परवानगी दिल्या जातात. याकामी नगररचना विभागाकडील अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी लागते तसेच विविध अनुषंगिक कामाची सर्वे करणे, बांधकामांविषयी विविध तक्रारीच्या अनुषंगाने जागेवर जाऊन अहवाल तयार करणे इत्यादी कामे केली जातात व त्याकामी चार चाकी वाहनाची आवश्यकता आहे.

सदर विभागांची मागणी संदर्भिय क्र. १ व २ अन्वये मान्य करुन मा. आयुक्त सो. यांनी वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता २ नग व नगररचना विभागा करीता १ नग मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे महिंद्रा बोलेरो B6 BS6 प्रकारचे वाहन जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेस तोंडी आदेशित केले.

सदरचे वाहन शासनाच्या जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन महिंद्रा बोलेरो B6 BS6 प्रकारचे वाहन खरेदी करणेकरीता पाहणी केली असता त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	कंपनीचे नाव	प्रती वाहनाची किंमत	एकुण ३ वाहनांची किंमत
१	महिंद्रा बोलेरो B6 BS6)	मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा	रु. ७,४१,०७२/-	रु. २२,२३,२१६/-

सदर निविदा जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवर मागविली असता वरील कंपनी व्यतिरिक्त कंपनीचे अधिकृत वितरक त्यात भाग घेवुन निविदा स्पर्धात्मक होऊन कमी दराची निविदा प्राप्त होऊ शकेल. सदर वाहनाच्या खरेदीस होणारा खर्च अर्थसंकल्पातील

अंदाजपत्रकातील "वाहन खरेदी/रोडरोलर खरेदी" या लेखाशिर्षात" या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रु. ४ कोटी इतकी तरतुद आहे. सदर लेखाशिर्षाखाली ३ नग बोलेरो प्रकारचे वाहन खरेदी करता येईल. ३ नग मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे महिंद्रा बोलेरो B6 BS6 प्रकारचे नवीन वाहने जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणे व इतर अनुषंगिक खर्च (वाहनावर मनपाचे स्टिकर चिकटविणे, वाहनाची नोंदणी करणे व इतर) यांस अंदाजित रक्कम रु. २२ लक्ष ५० हजार (अक्षरी रु. बावीस लक्ष पन्नास हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी ३ नग मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे महिंद्रा बोलेरो B6 BS6 प्रकारची नवीन वाहने जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन बिड प्रक्रिया राबवुन खरेदी करणेस व इतर अनुषंगिक अंदाजित खर्च रक्कम रु. रु. २२ लक्ष ५० हजार (अक्षरी रु. बावीस लक्ष पन्नास हजार मात्र) इतक्या खर्चास मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचेकडे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग २ नग व नगररचना विभागाकरीता १ नग मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे महिंद्रा बोलेरो B6 BS6 प्रकारचे वाहन जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणे व इतर अनुषंगिक खर्च (वाहनावर मनपाचे स्टिकर चिकटविणे, वाहनाची नोंदणी करणे व इतर) अंदाजित रक्कम रु. २२ लक्ष ५० हजार (अक्षरी रु. बावीस लक्ष पन्नास हजार मात्र) इतका खर्च अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकातील "वाहन खरेदी/रोडरोलर खरेदी" या लेखाशिर्षातुन करणेच्या कामास मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ६१५ विभाग :-वाहन

दिनांक :- १८/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विशेष नियोजन प्राधिकरण विभागासाठी १ नग युटीलिटी वाहन जी. इ. एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विशेष नियोजन प्राधिकरण विभागामार्फत २१ गावे अर्नाळा, अर्नाळा किल्ला, पाटीलवाडा, मुक्कामपाडा, टेंभी, कोल्हापुर, वासळई, खोचिवडे, पाली, आक्टण, तरखड, सत्पाळा, कळंब, चंद्रपाडा, टोकरे, खैरपाडा, डोलीव, खार्डी, टिवरी, मालजीपाडा, रानगाव ही गावे पुर्व/पश्चिम व विरार मुख्यालयापासुन दुर असल्याने अनधिकृत बांधकामाबाबत पडताळणी/पाहणी/कारवाई करण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

करीता मा. आयुक्त महोदयांनी विशेष नियोजन प्राधिकरण विभागासाठी १ नग युटीलिटी प्रकारचे वाहन खरेदी करणेबाबत मौखिक आदेशीत केलेले आहे. सदरचे युटीलिटी प्रकारचे वाहन खरेदी करणेसाठी जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन युटीलिटी वाहनाची खरेदी करणेकरीता पाहणी केली असता खालील २ प्रकारमधील वाहने खरेदी करता येतील :-

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	कंपनीचे नाव	प्रती वाहनाची किंमत
१	महिंद्रा (कॅम्पर २ डब्लु डी BS-VI PS)	मे. महिंद्रा ॲड महिंद्रा लि.	रु. ७,१६,८०८/-
२	टाटा योध्दा क्यु कॅब ४x२BS-6	मे. टाटा मोटर्स	रु.७,३९,१८५/-

वरील दोन प्रकारच्या वाहनाची बिड जी.इ.एम पोर्टलवर मागविली असता सदरची निविदा स्पर्धात्मक होऊन कमी दराची निविदा प्राप्त होऊ शकेल. सदर वाहनाच्या खरेदीस होणारा खर्च अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकातील "वाहन खरेदी/रोडरोलर खरेदी" या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रु. २ कोटी इतकी तरतुद आहे. करीता सदर लेखाशिर्षाखाली १ नग युटीलिटी प्रकारचे वाहन जी. इ. एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करता येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) (क) अन्वये नवीन १ नग युटीलिटी प्रकारचे वाहन जी.इ.एम (Governmernt E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करता येणे शक्य होईल.

तरी १ नग युटीलिटी प्रकारचे नवीन वाहने जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या इतर अनुषंगिक अंदाजित खर्च रक्कम रु.७,४०,०००/- (अक्षरी रु. सात लक्ष चाळीस हजार मात्र) रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विशेष नियोजन प्राधिकरण विभागामार्फत २१ गावे अंतर्गत अनधिकृत बांधकामाबाबत पडताळणी, पाहणी व कारवाई करण्यास (Government E-Marketplace) पोर्टलवरुन १ नग युटीलिटी महिंद्रा (कॅम्पर २ डब्लु डी BS-VI PS) प्रकारचे वाहन खरेदी करणेकामी मा. आयुक्त यांचेकडून दि. २५/०७/२०२० रोजी अंदाजित र. रु. ७,४०,०००/- रकमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) व अनुसूचि ड प्रकरण ५ (२) (२) खाली मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार खरेदी केलेल्या वाहनांस, वाहनाचा प्रत्यक्षात आलेल्या खर्च र. रु. ७,२६,८८८/- व वाहनांवर मनपा स्टिकर लावणे, नंबर प्लेट लावणे आणि आर.टी.ओ. नोंदणीकामी येणाऱ्या अपेक्षित खर्च र. रु. ४५००/- अशा एकूण र. रु. ७,३१,३८८/- (अक्षरी रुपये सात लक्ष एकतीस हजार तिनशे अठ्ठ्याऐंशी मात्र) ला अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०५
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ११९

विभाग :-वाहन

दिनांक :- १८/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समितीअंतर्गत कार्यालयीन कामकाजाकरीता ९ नग महींद्रा बोलेरो पिक अप BS -VI PS, 7T वाहन जीइएम (Government E-Marketplace)पोर्टलवरून खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- देशात कोरोना विषाणूचा संसर्ग मोठ्या प्रमाणात झाला असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे कोरोना रूग्ण वाढत आहेत. त्याकरीता नागरीकांमध्ये संसर्ग वाढू नये यावावत वेळोवेळी वेगवेगळ्या उपाययोजना महानगरपालिकेमाफत केल्या जात आहेत.

कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्याकरीता शहरात कंटेंटमेंट झोन तयार करून त्यासाठी बॅरीगेट्स एका जागेहून दुसऱ्या जागेत वाहून नेणे, फेरीवाले, दुकान मालक व गाहक, सोशल डिस्टंसींगचे पालन करीत आहेत किंवा नाही याची पाहणी करणेकामकाजासाठी मालवाहु वाहनाची गरज असलेवावतची मागणी सर्व प्रभागातील सहा. आयुक्त यांनी मा. आयुक्त महोदय यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या बैठकीत केलेली आहे.

सदर मागणीचा विचार करून मा. आयुक्त सो. यांनी ९ नग महींद्रा बोलेरो पिक अप BS-VI PS, 7T वाहन खरेदी करणेवावत आदेशीत केलेले आहे. सदरचे ९ नग महींद्रा बोलेरो पिक अप BS-VI PS, 7T वाहन खरेदी करणेसाठी जी. इ. एम. (Government E-Marketplace) पोर्टलवरून खरेदी करणेकामी अंदाजे खरेदी किंमत रू. ६,७७,८५७/- (अक्षरी सहा लक्ष सत्याहत्तर हजार आठशे सत्तावन्न रूपये मात्र) असुन ९ नग वाहनाकरीता अंदाजित किंमत रू. ६१,००,७१३/- (अक्षरी एकसष्ट लक्ष सातशे तेरा रूपये मात्र) एवढी आहे. सदरचा खर्च अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील " वाहन खरेदी/गेडरोलर खरेदी" या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रू. २ कोटी इतकी तरतूद आहे. करीता सदर लेखाशिर्षाखाली ९ नग महींद्रा बोलेरो पिक अप BS-VI PS, 7T वाहन खरेदी करण्याचा खर्च करता येईल.

सद्यस्थितीत लॉकडाऊन सुरु असुन महानगरपालिकेच्या सोशल डिस्टन्सिंगमुळे बैठका घेता येत नाही. व वाहनाची निकड या बाबींचा विचार करुन वाहने तातडीने विकत घ्यावयाचे असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसुची-ड प्रकरण ५ संविदा २(२) नुसार महानगरपालिकेच्या वाहन विभागामार्फत नवीन ९ नग युटीलिटी प्रकारचे वाहन जी.इ.एम (Governmernt E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करता येणे शक्य होईल. तदनंतर सभा होतील किंवा प्रशासकीय राजवटीत प्रस्ताव रितसर मंजुर करुन घेता येईल.

तरी मे. महींद्रा या कंपनीच्या महींद्रा बोलेरो पिक अप BS-VI PS, 7T टाईप ९ नग नवीन वाहने जी.इ.एम.पोर्टलवरून खरेदी करणेस व येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रू.६१,00,७१३/- (अक्षरी एकसष्ट लक्ष सातशे तेरा रूपये मात्र) ला अनुसूचि ड प्रकरण ५ संविदा २ (२) खाली कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्याकरीता शहरात कंटेंटमेंट झोन तयार करून त्यासाठी बॅरीकेट्स एका जागेहून दुसऱ्या जागेत वाहून नेणे, फेरीवाले, दुकान मालक व गाहक, सोशल डिस्टंसींगचे पालन करीत आहेत किंवा नाही याची पाहणी करणेकामकाजासाठी मालवाहु वाहनाची गरज असल्याकारणाने मे. महींद्रा या कंपनीच्या महींद्रा बोलेरो पिक अप BS-VI PS, 7T टाईप ९ नग नवीन वाहने जी.इ.एम. पोर्टलवरून खरेदी करणेस व त्याकामास येणाऱ्या अंदाजित रक्कम रुपये ६१,००,७१३/- (अक्षरी रुपये एकसष्ट लक्ष सातशे तेरा मात्र) रकमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त यांचे दि. ०२/०६/२०२० रोजी जा.क्र. ६० अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेची मंजूरी आदेश घेण्यात आली होती. सदर आदेशान्वये खरेदी केलेल्या महिंद्रा कंपनीच्या ९ नग महींद्रा बोलेरो पिक अप BS-VI PS, 1.7T वाहनास, वाहनांच्या प्रत्यक्ष खरेदी खर्च रक्कम रु. ६१,०९,१८२/- व वाहनास स्टिकर, नंबर प्लेट बसविणे आणि आर.टी.ओ नोंदणीकामी आलेल्या खर्च रक्कम रु. ३५,५५०/- अशा एकूण प्रत्यक्षात आलेल्या खर्च रक्कम रुपये ६१,४४,७३२/- (अक्षरी रुपये एकसष्ठ लक्ष चव्वेचाळीस हजार सातशे बत्तीस मात्र) ला अंतिम प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

18/9/2020

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९३७ विभाग :- वाहन

दिनांक :-१८/०९/ २०२०

प्रस्तावाचा विषय :- कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजने अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत असलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता २१ नग रुग्णवाहीका व २ नग शववाहीनी जी.इएम (Government E-Marketplace)पोर्टलवरून खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- देशात कोरोना विषाणुचा संसर्ग मोठया प्रमाणात झाला असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणुच्या संसर्गामुळे कोरोना रुग्ण वाढत आहेत. त्याकरीता नागरिकामध्ये संसर्ग वाढु नये याबाबत वेळोवेळी वेगवेगळया उपाययोजना महापालिकेमार्फत केल्या जात आहेत.

शहरात २१ ठिकाणी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. सदर नागरीक प्राथमिक आरोग्य केंदाच्या माध्यमातुन त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या परिसरातील नागरीकांच्या तपासणी करणे, संशयीत कोरोना रुग्ण, कोरोना बाधीत रुग्णांना विलगीकरण व अलगीकरण कक्षात रवानगी करणे या आणि अशा संलग्न कामाकरिता वाहनांची आवश्यकता लागते. रुग्णांना ने-आण करणे किंवा मृत व्यक्तींना स्मशानभुमीपर्यंत पोहचविणे याकामी इतर वाहना ऐवजी रुग्णवाहीका व शववाहीनी घेणे उचित होईल. गुरुवार दि. १८/०६/२०२० रोजी मा. महापौर सो. यांच्या अध्यक्षतेखाली वसई प्रभाग समिती आय येथे कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने अनौपचारीक बैठक घेण्यात आलेली होती. सदर बैठकीत उपस्थित प्रभाग समितीचे सभापती व इतर पदाधिकारी यांनी रुग्णवाहीकांची कमतरता असलेबाबतची चर्चा करण्यात आलेली आहे.

सदर मागणीचा विचार करून मा.आयुक्त सो.यांनी दि. २०/०६/२०२० रोजी वैद्यकीय विभाग व वाहन/परिवहन विभागाच्या घेतलेल्या बैठकीत जी.इ.एम (Governmernt E-Marketplace) पोर्टलवरुन उपलब्ध असलेल्या कमी किंमतीच्या व चांगल्या २१ नग रुग्णवाहीका व २ नग शववाहीनी खरेदी करणेबाबतचे तोंडी आदेश देण्यात आले. सदर सुचनेनुसार दि. २०/०६/२०२० रोजी जी.इ.एम पोर्टलवरती पाहणी केली असता फोर्स , टाटा विगंर, महिन्द्रा सुप्रो एलेक्स रुग्णवाहीका बी एस -६ मॉडेल या रुग्णवाहीका निर्दशनास आलेल्या आहेत. त्यापैकी फोर्स व विंगर रुग्णवाहीका वाहनांची किंमत जवळजवळ रक्कम रु १४ लक्ष असुन महिन्द्रा सुप्रो एलेक्स रुग्णवाहीकेची किंमत अंदाजे रक्कम रु. ५ लक्ष ८४ हजार इतकी आहे. सदर बाब मा. आयुक्त महोदय यांच्या माहितीस्तव सादर केली असता मा. आयुक्त महोदय सो. यांनी महिन्द्रा सुप्रो एलेक्स रुग्णवाहीका वाहने जी. इ.एम (Governmernt E-Marketplace) पोर्टलवरुन तात्काळ खरेदी करणेबाबत आदेशित केले.

सदरच्या खर्चाकरीता वैद्यकीय आरोग्य विभागाच्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकातुन रुग्णवाहीका व शववाहीनी खरेदी व आऊटसोर्सिंग या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रु. १ कोटी २० लक्ष इतकी तरतुद असुन रक्कम रु. ५६,९४,३४९/- इतकी रक्कम शिल्लक आहे. तसेच रुग्णालय वाहन भाडे या लेखाशिर्षातर्गत रक्कम रु. ३.५ कोटी इतकी तरतुद असुन रक्कम रु. २,६९,१०,००३/- इतकी शिल्लक आहे. करीता "रुग्णवाहीका व शववाहीनी खरेदी व आऊटसोर्सिंग" या लेखाशिर्षात "रुग्णालय वाहन भाडे" या लेखाशिर्षातुन रक्कम रु. १ कोटी पुर्ननियोजनच्या अधिन राहुन खरेदी करणेस आवश्यक आहे.

तरी महिन्द्रा सुप्रो एलेक्स प्रकारचे २१ नग रुग्णवाहीका व २ नग शववाहीनी वाहने जी.इ.एम (Governmernt E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या इतर अनुषंगिक अंदाजित खर्च रक्कम रु. १,३४,३२,०००/- (अक्षरी रु. एक कोटी चौतीस लक्ष बत्तीस हजार मात्र) रकमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांच्या अधिकारान्वये कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजने अंतर्गत वसई- विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत असलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता २१ नग रुग्णवाहीका व २ नग शववाहीनी म्हणुन महिन्द्रा सुप्रो एलेक्स हे वाहन जीइएम(Government E-Marketplace)पोर्टलवरून खरेदी करणेस व त्याकामास येणाऱ्या अंदाजित रक्कम रुपये १,३४,३२,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी चौथीस लक्ष बत्तीस हजार मात्र) रकमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त यांचे दि. १९/०६/२०२० रोजी जा.क्र. ७५ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेचा मंजूरी आदेश घेण्यात आला होता. सदर आदेशान्वये खरेदी केलेल्या महिंद्रा कंपनीच्या २३ नग रुग्णवाहीका, रुग्णवाहिकांच्या खरेदीस आलेला प्रत्यक्ष रक्कम रु. १,३४,८७,५९१/- व रुग्णवाहिकेवर स्टिकर लावणे, नंबर प्लेट लावणे आणि आर.टी.ओ नोंदणीकामी आलेल्या खर्च रक्कम रु. ८६,२५०/- अशा एकूण खर्च रक्कम रुपये १,३५,७३,८४१/- (अक्षरी रुपये एक कोटी पस्तीस लक्ष त्र्याहत्तर हजार आठशे एक्केचाळीस मात्र) ला अंतिम प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ९१८ विभाग :-वाहन

दिनांक १८/९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती अंतर्गत दिवाबत्ती विभागाकरीता ९ नग युटीलिटी वाहन जी. इ. एम (Government E- Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- देशात कोरोना विषाणुचा संसर्ग मोठया प्रमाणात झाला असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना संसर्गामुळे कोरोना रुग्ण वाढत आहेत. त्याकरीता नागरीकांमध्ये संसर्ग वाढु नये याबाबत वेळोवेळी वेगवेगळया उपाययोजना महानगरपालिकेमार्फत केल्या जात आहेत.

सदर कामी महानगरपालिकेचा खर्च देखील मोठया प्रमाणात होत आहे. सदरचा खर्च कमी करणेकामी दिवाबत्ती विभागाकरीता महापालिकेच्या मालकीचे वाहन जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करुन भाडेतत्वावर घेण्यात आलेले वाहन कमी केल्याने महापालिकेचे अर्थातच खर्चात बचत करता येईल.

दिवाबत्ती विभागामार्फत रस्त्यावरील दिवे दुरुस्ती करणे, त्याकामी लागणारे साहीत्य वाहुन नेणे. करिता पिक-अप वाहनाची आवश्यकता लागते. विद्युत विभागाला दैनंदिन कामे करण्याकरिता १६ टेम्पो वाहने भाडयाने देण्यात आली होती. परंतु भाडयाच्या वाहनावर होणारा मासिक खर्च खुप मोठया प्रमाणात होता. करिता मा. आयुक्त महोदय यांनी ७ नग टेम्पो वाहने बंद केले असुन ९ नग टेम्पो वाहने दिवाबत्ती विभागाला सुरु आहेत. परंतु सदर टेम्पो वाहनास लागणारे मासिक भाडेही मोठया प्रमाणावर असल्याने मा. आयुक्त महोदयांनी दिवाबत्ती विभागासाठी ९ नग युटीलिटी प्रकारचे वाहन खरेदी करणेबाबत मौखिक आदेशीत केलेले आहे. सदरचे ९ नग युटीलिटी प्रकारचे वाहन खरेदी करणेसाठी जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन युटीलिटी वाहनाची खरेदी करणेकरीता पाहणी केली असता खालील २ प्रकारमधील वाहने खरेदी करता येतील :-

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	कंपनीचे नाव	प्रती वाहनाची किंमत	९ नग वाहनाची किंमत
१	महिंद्रा(बोलेरो पिकअप BS-VI PS,7T)	मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि.	रु. ६,७७,८७५/-	रु. ६१,००,८७५/-
२	टाटा योध्दा १७०० पिकअप BS-6	मे. टाटा मोटर्स	रु.७,४५,३६०/-	रु. ६७,०८,२४०/-

वरील दोन प्रकारच्या वाहनाची बिड जी.इ.एम (Government E-Marketplace)पोर्टलवर मागविली असता सदरची निविदा स्पर्धात्मक होऊन कमी दराची निविदा प्राप्त होऊ शकेल. सदर वाहनाच्या खरेदीस होणारा खर्च अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकातील "वाहन खरेदी/रोडरोलर खरेदी" या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रु. २ कोटी इतकी तरतुद आहे. करीता सदर लेखाशिर्षाखाली ९ नग युटीलिटी प्रकारचे वाहन खरेदी करता येईल.

सद्यस्थितीत लॉकडाऊन सुरु असुन महानगरपालिकेच्या सोशल डिस्टन्सिंगमुळे बैठका घेता येत नाही. व वाहनाची निकड या बाबींचा विचार करुन वाहने तातडीने विकत घ्यावयाचे असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्तांची प्रशासकिय मान्यता घेवून वाहन विभागामार्फत नवीन ९ नग युटीलिटी प्रकारचे वाहन जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करता येणे शक्य होईल. तद्नंतर सभा होतील किंवा प्रशासकीय राजवटीत प्रस्ताव रितसर मंजुर करुन घेता येईल.

तरी ९ नग युटीलिटी प्रकारचे नवीन वाहने जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेस येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रु. ६७,०८,२४०/- (सदुसष्ट लक्ष आठ हजार दोनशे चाळीस मात्र) ला मा. आयुक्त महोदयांची मान्यता घेवून कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या दिवाबत्ती विभागामार्फत रस्त्यावरील दिवे दुरुस्ती करणे, त्याकामी लागणारे साहीत्य वाहुन नेणे करिता ९ नग युटीलिटी प्रकारचे वाहन जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेस व त्याकामास येणाऱ्या अंदाजित रक्कम रुपये ६७,०८,२४०/- (अक्षरी रुपये सदुसष्ट लक्ष आठ हजार दोनशे चाळीस मात्र) रकमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त यांचे दि. २०/०६/२०२० रोजी जा.क्र. २२७ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेचा मंजूरी आदेश घेण्यात आला होता. सदर आदेशान्वये खरेदी केलेल्या महिंद्रा कंपनीच्या ९ नग युटिलिटी वाहनास, वाहनांच्या प्रत्यक्ष खरेदी खर्च रक्कम रु. ६१,०९,१८२/- व वाहनास स्टिकर, नंबर प्लेट बसविणे आणि आर.टी.ओ नोंदणीकामी आलेल्या खर्च रक्कम रु. ३५,५५०/- अशा एकूण प्रत्यक्षात आलेल्या खर्च रक्कम रुपये ६१,४४,७३२/- (अक्षरी रुपये एकसष्ठ लक्ष चव्वेचाळीस हजार सातशे बत्तीस मात्र) ला अंतिम प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

18/9/2020.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ६१९

विभाग :-वाहन
दिनांक :- १८/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पूरवठा विभागासाठी १ नग युटीलिटी वाहन जी.इ.एम (Government E-Marketplace) पोर्टलवरुन खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- पाणी पूरवठा विभागामार्फत सुर्या, उसगाव, पेल्हार व पापडखिंड या योजनेअंतर्गत २३१ द.ल.ली. प्रतिदिन पाणीपूरवठा होत आहे. सदर योजनांच्या पंपींग स्टेशनसाठी महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनीमार्फत विज पूरवठा होत असून विद्यूत पूरवठा खंडीत झाल्यास महानगरपालिकेने ठेवलेल्या विद्यूत जनित्रांमार्फत विज पूरवठा करुन पाणी पूरवठा सुरळीत ठेवण्यात येत असतो. वरील योजनांपैकी सुर्या टप्पा १ व ३ तसेच उसगाव हे प्रकल्प शहराच्या बाहेर आहेत. त्यामूळे विद्यूत जनित्रांना इंधन पुरविण्यासाठी स्वतंत्र वाहन नसल्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत.

योजना	उपांगे	अंतर	उपलब्ध जनित्र
सूर्या टप्पा १	मासवण उदचंन केंद्र	५३ कि.मी	
	धुकटन जलशुध्दीकरण केंद्र		
	काशिद कोपर BPT	२० कि.मी	
	चंदनसार MBR	३ कि.मी	
सुर्या टप्पा २	मासवण उदचंन केंद्र	५३ कि.मी	
	धुकटन जलशुध्दीकरण केंद्र		
उसगांव	उसगांव धरण	२६ कि.मी	२०० KVA
	शिरवली बंधरा	१९ कि.मी	२५० KVA
	पारोळ जलशुध्दीकरण केंद्र	१६ कि.मी	६५० KVA
पेल्हार	पेल्हार धरण	१४ कि.मी	--
	पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र	१३ कि.मी	१६५ KVA
पापडखिंड	पापडखिंड धरण	३ कि.मी	१२५ & २५० KVA Generator Van

वरील जनित्रांना इंधन पुरवठ्यासाठी स्वतंत्र असे वाहन उपलब्ध नसून आरोग्य विभागाकडील १७ वर्षे जुने वाहन सद्यस्थितीत वापरण्यात येत आहे. सदर वाहनांची स्थिती पाहता ते वाहतूक करण्यास सक्षम नसल्याचे निदर्शनास येते. तसेच प्रकल्पस्थळी किंवा जलवाहिन्यांची गळती झाल्यास ते दुरुस्तीचे काम संबंधित ठेकेदारांकडून व्यवस्थितरित्या पूर्ण

करुन घेणेसाठी कनिष्ठ अभियंता यांना रात्री - अपरात्री जावे लागते. पाणी पुरवठा विभागाकडे वाहन उपलब्ध नसल्याने इंधन पुरवठा करण्यास किंवा प्रकल्पस्थळी / दुरुस्तीच्या ठिकाणी जाण्या-येण्यास गैरसोय निर्माण होत आहे.

पाणीपूरवठा विभागासाठी युटिलिटी वाहन खरेदी केल्यास वरीलप्रमाणे होणारी गैरसोय टाळण्यास मदत होणार आहे. सदर नवीन युटिलिटी वाहन खरेदीसाठी येणारा अपेक्षित खर्च सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील सूर्या योजना व इतर भांडवली कामे तरतुद रु. १५ कोटी मधुन भागविणे शक्य आहे.

पाणीपूरवठा विभागासाठी युटिलिटी वाहन विकत घेणेबाबत मा. आयुक्त साहेब यांनी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार GEM पोर्टलवर वाहन खरेदी निविदा करता येईल. GEM पोर्टलवरुन वाहन खरेदी करावयाचे असल्यास रु. ७,१७,०००/- महिंद्रा कॅम्पर २ डब्लु डी BS-VI PS हे वाहन विकत घेता येईल. मा. आयुक्त महोदय यांनी दि. ०१/०६/२०२० रोजी सदर वाहन खरेदी करणेबाबत मान्यता दिलेली आहे.

तरी महिंद्रा कंपनीची कॅम्पर २ डब्लु डी BS-VI PS या प्रकारचे वाहन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) व अनुसूचि ड प्रकरण ५ (२) (२) खाली GEM पोर्टलवरुन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास प्रशासकिय व वित्तीय कार्योत्तर मंजूरीस्तव प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पूरवठा विभागामार्फत सुर्या, उसगाव, पेल्हार व पापडखिंड या योजनेअंतर्गत पाणीपूरवठा करणेस पंपींग स्टेशनसाठी महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनीमार्फत विज पूरवठा होत असून विद्यूत पूरवठा खंडीत झाल्यास महानगरपालिकेने ठेवलेल्या विद्यूत जनित्रांमार्फत विज पूरवठा करावा लागतो. त्या विद्यूत जनित्रांना इंधन पुरविण्यासाठी स्वतंत्र वाहन नसल्यामुळे अडचणी निर्माण होत असल्यामुळे (Government E-Marketplace) पोर्टलवरुन १ नग युटीलिटी महिंद्रा (कॅम्पर २ डब्लु डी BS-VI PS) प्रकारचे वाहन खरेदी करणेकामी मा. आयुक्त यांचेकडून दि. ०१/०६/२०२० रोजी अंदाजित र. रु. ७,१७,०००/- रकमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) व अनुसूचि ड प्रकरण ५ (२) (२) खाली मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार खरेदी केलेल्या वाहनांस, वाहनाचा प्रत्यक्षात आलेल्या खर्च र. रु. ७,२६,८८८/- व वाहनांवर मनपा स्टिकर लावणे, नंबर प्लेट लावणे आणि आर.टी.ओ. नोंदणीकामी येणाऱ्या अपेक्षित खर्च र. रु. ४५००/- अशा एकूण र. रु. ७,३१,३८८/- (अक्षरी रुपये सात लक्ष एकतीस हजार तिनशे अठ्ठ्याऐंशी मात्र) ला अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पुर्व)
ता.वसई, जि.पालघर

प्रशासकीय ठराव क्र. ९२०

विभाग :- सार्व. वाचनालय
दिनांक :- २२/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय:- सन २०२०-२१ या सालाकरीता दैनंदिन वृत्तपत्रे, मासिके, पाक्षिके, साप्ताहीके व दिवाळीअंक पुरविणेकामी आलेल्या दरपत्रकांपैकी जास्त सुट देणारे व योग्य दराचे दरपत्रक मंजुर करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'आय' वसई येथील कै. डॉ. धोंडो गोविंद अभ्यंकर स्मृती ग्रंथालय व वाचनालयासाठी सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता लागणारी दैनंदिन वृत्तपत्रे, मासिके, पाक्षिके, साप्ताहीके व दिवाळीअंक पुरवठा करणेकामी प्रभाग समिती 'आय' वसई येथील कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जा.क्र./४४०/ग्रंथा/२०-२१ अन्वये दिनांक १८/०८/२०२० रोजी दरपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदर दरपत्रक सादर करण्याची मुदत दिनांक ३१/०८/२०२० दुपारी १२.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके सोमवार दिनांक ३१/०८/२०२० रोजी संध्या ५.१५ वा. मा. सहा. आयुक्त यांच्या दालनात उघडण्यांत आली. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे ...

अ. क्र	तपशिल	सवलतीचे दर		
		व्ही. जे. राणे.	किशोर जयवंत राणे	रमेश मोहन चौगुले
१	वृत्तपत्रे	३ % सवलतीचे दर	५ % सवलतीचे दर	४ % सवलतीचे दर
२	मासिके	३ % सवलतीचे दर	५ % सवलतीचे दर	४ % सवलतीचे दर
३	साप्ताहिके	३ % सवलतीचे दर	५ % सवलतीचे दर	४ % सवलतीचे दर
४	पाक्षिके	३ % सवलतीचे दर	५ % सवलतीचे दर	४ % सवलतीचे दर
५	दिवाळीअंक	३ % सवलतीचे दर	५ % सवलतीचे दर	४ % सवलतीचे दर

प्रत्यक्षात आलेली दरपत्रके उघडल्यानंतर तुलनात्मक तक्त्याची पडताळणी केली असता सर्वात जास्त सवलत देणारे व योग्य दराचे दरपत्रक मे. किशोर जयवंत राणे.(सर्व घटकांसाठी ५ %) यांचे आहे. तरी या दरपत्रकाच्या मंजूरीसाठी मा.आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका समोर ठेवण्यास शिफारस असे.

ठराव:-

वरील विषयावर मा.आयुक्त साहेब प्रशासक व.वि.श.म.यांचे सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता व.वि.श.म. च्या प्रभाग समिती 'आय' वसई येथील कै.डॉ.धोंडो गोविंद स्मृती ग्रंथालय व वाचनालयाकरीता लागणारी वर्तमानपत्र/ मासिके/ साप्ताहिके/ पाक्षिके व दिवाळीअंक खरेदी करणेकामी प्रभाग समिती 'आय' वसई येथील कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जा.क्र./४४०/ग्रंथा/२०-२१ अन्वये दिनांक १८/०८/२०२० रोजी दरपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदर दरपत्रक सादर करण्याची मुदत दिनांक ३१/०८/२०२० दुपारी १२.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके सोमवार दिनांक ३१/०८/२०२० रोजी संध्या ५.१५ वा. मा. सहा. आयुक्त यांच्या दालनात उघडण्यांत आली. प्रत्यक्षात आलेली दरपत्रके उघडल्यानंतर तुलनात्मक तक्त्याची पडताळणी केली असता सर्वात जास्त सवलत देणारे व योग्य दराचे दरपत्रक मे. किशोर जयवंत राणे.(सर्व घटकांसाठी ५ %) यांचे आहे. जास्त सवलत देणा-या मे. किशोर जयवंत राणे. या मंजूर दरपत्रकधारकाकडून प्रभाग समिती 'आय' वसई येथील कै.डॉ.धोंडो गोविंद स्मृती ग्रंथालय व वाचनालयाकरीता लागणारी वर्तमानपत्र /मासिके/ साप्ताहिके/ पाक्षिके व दिवाळीअंक खरेदी करणेकामी प्रशासकीय मंजूरी देत आहे.

प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती डी आचोळे नालासोपारा पूर्व

वाचनालय विभाग

प्रशासकीय ठराव क्र. ३२१ विभाग :- सार्व.वाचनालय

दिनांक :- २२/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता दैनंदिन वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहीके, नियतकालिके, पाक्षीके व दिवाळीअंक पुरविणे कामी आलेल्या दरपत्रकापैकी जास्त सुट देणारे व योग्य दराचे दरपत्रक मंजुर करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकुर - वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (डी) येथील खुले रंगमंच मजेठिया पार्क सार्वजनिक वाचनालयासाठी सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता लागणारी दैनंदिन वृत्तपत्रे/ मासिके /साप्ताहिके/ पाक्षिके/ दिवाळी अंक पुरवठा करणेकामी प्रभाग समिती (डी) नालासोपारा येथिल सुचना फलकावर तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जा.क्र. वाच/६२७/२०२०-२१ अन्वये दि. २९/०८/२०२०रोजी दरपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते सदर दरपत्रक सादर करण्याची मुदत दि.०९/०९/२०२० पर्यंत दुपारी १२.०० ठेवण्यांत आलेली होती. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके बुधवार --- दि.१६/०९/२० रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सहा. आयुक्त साहेब यांच्या दालनात उघण्यांत आली. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

अ.क्र.	तपशिल	सवलतीचे दर		
		विजय सरवणकर न्यूज पेपर एजन्सी	जान्हवी न्यूज पेपर एजन्सी	मंगल न्युज पेपर एजन्सी
१	वृत्तपत्रे	५% सवलतीचे दर	४% सवलतीचे दर	३% सवलतीचे दर
२	मासिके	५% सवलतीचे दर	४% सवलतीचे दर	३% सवलतीचे दर
३	साप्ताहिके	५% सवलतीचे दर	४% सवलतीचे दर	३% सवलतीचे दर
४	पाक्षिके	५% सवलतीचे दर	४% सवलतीचे दर	३% सवलतीचे दर
५.	दिवाळी अंक	५% सवलतीचे दर	४% सवलतीचे दर	३% सवलतीचे दर

प्रत्यक्षात आलेले दरपत्रके उघडल्यानंतर तुलनात्मक तक्त्याची पडताळणी केली असता सर्वात जास्त सवलत देणारे व योग्य दराचे दरपत्रक मे. विजय सरवणकर यांचे (सर्व घटकांसाठी ५%) आहेत. तरी या दरपत्रकांच्या मंजूरीसाठी मा. आयुक्त सो., वसई - विरार शहर महानगरपालिका समोर ठेवण्यास शिफारस असे.

E:\Jo\Vachnalay\tharav.docx6

ठराव :-

वरील विषयावर मा. आयुक्त साहेब प्रशासक व.वि.श.म. यांचे सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली त्यानुसार सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता वसई - विरार शहर महानगरपालिकेचे प्रभाग समिती (डी) नालासोपारा येथील खुले रंगमंच मजेठिया पार्क सार्वजनिक वाचनालया करिता लागणारी दैनंदिन वृत्तपत्रे/ मासिके /साप्ताहिके/ पाक्षिके/ दिवाळी अंक खरेदी करणेकामी प्रभाग समिती (डी) आचोळे येथील कार्यालयाच्या सुचनाफलकावर तसेच वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जा.क्र. प्र.स.ड/६२७/२०२१ अन्वये दि. २९/०८/२०२० रोजी दरपत्रक प्रसिद्ध करण्यांत आलेले होते. सदर दरपत्रकाची सादर करण्यांची मुदत दि. ९/०९/२०२० रोजी पर्यंत दुपारी १२.०० ठेवण्यांत आलेली होती. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.१६/०९/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सहा. आयुक्त साहेब यांच्या दालनात उघडण्यांत आली. प्रत्यक्षात आलेली दरपत्रके उघडल्यानंतर तुलनात्मक तक्त्याची पडताळणी केली असता सर्वांत जास्त सवलत देणारे व योग्य दराचे दरपत्रक मे. विजय सरवणकर यांचे(सर्व घटकांसाठी ५%) आहेत. जास्त सवलत देणाऱ्या मे. विजय सरवणकर या मंजुर दरपत्रकाधारकांकडुन प्रभाग समिती (डी) नालासोपारा येथील खुले रंगमंच मजेठिया पार्क सार्वजनिक वाचनालयाकरिता लागणारे दैनंदिन वृत्तपत्रे/ मासिके/ साप्ताहीके/ नियतकालिके/ पाक्षिके व दिवाळीअंक खरेदी करणेकामी प्रशासकीय मंजुरी देत आहेत.

प्रशासक २४/९

वसई विरार शहर महानगरपालिका

E:\Jo\Vachnalay\tharav.docx8

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पुर्व)
ता. वसई, जि.पालघर

प्रशासकीय ठराव क्र. ९२२ विभाग:- सार्व. वाचनालय

दि.:२२/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- सन २०२०-२१ या सालाकरीता दैनंदिन वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळीअंक पुरविणेकामी आलेल्या दरपत्रकांपैकी जास्त सुट देणारे व योग्य दराचे दरपत्रक मंजूर करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथील सार्व.वाचनालयासाठी सन २०२०-२१ या वित्तिय वर्षाकरीता लागणारी दैनंदिन वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक पुरवठा करणेकामी प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथील कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जा.क्र. / प्रससी /८३७ /२०-२१ अन्वये दि. २९/०८/२०२० रोजी दरपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदर दरपत्रक सादर करण्याची मुदत दि. ०९/०९/२०२० पर्यंत दुपारी १२.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके मंगळवार दि.१५/०९/२०२० रोजी दुपारी१२.०० वा. मा.सहा.आयुक्त साहेब यांच्या दालनात उघडण्यांत आली . त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे...

अ.क्र.	तपशिल	सवलतीचे दर		
		जन्मजय प्रजापती	जितेंद्र गौर	विकास गौर
१)	वृत्तपत्रे	४% सवलतीचे दर	५% सवलतीचे दर	३% सवलतीचे दर
२)	मासिके	४% सवलतीचे दर	५% सवलतीचे दर	३% सवलतीचे दर
३)	साप्ताहिके	४% सवलतीचे दर	५% सवलतीचे दर	३%सवलतीचे दर
४)	पाक्षिके	४% सवलतीचे दर	५% सवलतीचे दर	३% सवलतीचे दर
५)	दिवाळी अंक	४% सवलतीचे दर	५% सवलतीचे दर	३% सवलतीचे दर

प्रत्यक्षात आलेली दरपत्रके उघडल्यानंतर तुलनात्मक तक्त्याची पडताळणी केली असता सर्वात जास्त सवलत देणारे व योग्य दराचे दरपत्रक मे. जितेंद्र गौर यांचे (सर्व घटकांसाठी ५%) आहेत. तरी या दरपत्रकाच्या मंजूरीसाठी मा.आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका समोर ठेवण्यास शिफारस असे.

ठराव :-

वरील विषयावर मा.आयुक्त साहेब प्रशासक व.वि.श.म. यांचे सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सन २०२०-२१ या वित्तीय वर्षा करीता व.वि.श.म.च्या प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथील सार्व. वाचनालयाकरीता लागणारी वृत्तपत्रे / मासिके / साप्ताहिके / पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथील कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच वृत्तपत्रात जाहीर दरपत्रक सूचना प्रसिध्द करुन तसेच वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जा.क्र. / प्रससी /९२८ /२०-२१ अन्वये दि. २९/०८/२०२० रोजी दरपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदर दरपत्रक सादर करण्याची मुदत दि. ०९/०९/२०२० पर्यंत दुपारी १२.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. सदर दरपत्रक सादर करण्याची मुदत दि.१०/०८/२०२० पर्यंत दुपारी १२.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.१५ /०९ /२०२० रोजी दुपारी १३.०० वा. मा.सहा.आयुक्त साहेब यांच्या दालनात उघडण्यांत आली . प्रत्यक्षात आलेली दरपत्रके उघडल्यानंतर तुलनात्मक तक्त्याची पडताळणी केली असता सर्वात जास्त सवलत देणारे व योग्य दराचे दरपत्रक मे. जितेंद्र गौर यांचे (सर्व घटकांसाठी ५%) आहेत. जास्त सवलत देणा-या मे. जितेंद्र गौर या मंजूर दरपत्रकधारकाकडून प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथील सार्व. वाचनालयाकरीता लागणारी वृत्तपत्रे / मासिके / साप्ताहिके / पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी प्रशासकीय मंजूरी देत आहे,

प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १२३

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक २२/०९/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.)वर्गाची सेवा समाप्त होत असल्याने कोव्हीड-१९ ची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता एम.बी.बी.एस. या कंत्राटी तत्वाने पदावरील वैद्यकीय अधिकारी यांची सेवा समाप्ती करणे व त्यांना पुढील ६ महिन्यासाठी मुदतवाढ देणेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे सर.डी.एम.पेटीट रुग्णालय वसई व विजयनगर तुळींज रुग्णालय नालसोपारा अशी २ रुग्णालये कार्यरत आहेत. तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माता बाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयाचे/ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे व दवाखान्याचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. महानगरपालिकेने वैद्यकीय आरोग्य विभागाचे कामकाजासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालवधी साठी कंत्राटी पध्दतीने आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग दरमहा मानधनावर नियुक्त करणे कामी आवश्यक पद निर्मिती करणेस व आवश्यक ती प्रक्रिया करुन पुढील कार्यवाही करणेस तसेच महानगरपालिकेमध्ये पुर्वी पासुन कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना या पदावर नियुक्ती कामी विहित केलेली वयोमर्यादेची अट न ठेवणेस मा. सर्वसाधारण सभा दि.१३/१२/२०१९ ठराव क्र.११ अन्वये मान्यता दिलेनुसार सदरच्या पदावर आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दि.२६/०२/२०२० ते २८/०२/२०२० रोजी थेट मुलाखती घेण्यांत आलेल्या होत्या तथापी याच दरम्यान कोव्हीड-१९ चा उद्रेक सुरु झाल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजनेची तातडीने अमलबजावणीचे वैद्यकीय आरोग्य विभागाकडील अतितात्काळ महत्वाचे कामकाज सुरु असल्याने सर्व कर्मचारी वर्ग याकामी कार्यरत आहे. त्यामुळे महानगरपालिकेने माहे फेब्रुवारी २०२० मध्ये घेतलेल्या थेट मुलाखतीचे निकालाचे कामकाज स्थगित करुन कोरोना विषाणुवर प्रादुर्भाव रोखण्याच्या उपाय योजनावंर त्याचा परिणाम होऊ नये म्हणून वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत असलेले सर्व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास ६ महिन्याचा सेवा कालावधी संपुष्टात आल्याने १ दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील ६ महिन्यासाठी कार्यरत सर्व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या कंत्राटी पध्दतीच्या नेमणूका पुढे सुरु ठेवणेस मा. सर्वसाधारण सभा दि.१६/०३/२०२० ठराव क्र.१९ अन्वये मंजूरी दिलेली आहे. तथापी कोव्हीड-१९ चे कामकाजासाठी वैद्यकीय अधिकारी आवश्यक असल्याने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दि.१६/०३/२०२० अन्वये माहे फेब्रुवारी २०२० चे मुलाखती मधील फक्त एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी यांचे निकालाचे घेऊन कामका करुन निवड समितीने निवड केलेले वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) वर्ग दि.२४/०३/२०२० रोजीच्या आदेशान्वये ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेले आहेत.

१) यानुसार वरील परिच्छेदात नमुद दि.२४/०३/२०२० रोजी नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस) वर्गाचा ६ महिन्यांचा कंत्राटी पध्दतीचा सेवा कालावधी हा विविध दिनांकास हजर झालेनुसार विविध दिनांकास ६ महिन्याचा कालावधी संपणार असल्याने या सर्वाचा साधारणतः माहे

२३ सप्टेंबर २०२० रोजी या एकाच दिवशी कोव्हीड-१९ चे अत्यावश्यक कामकाज सुरु असल्याने समाप्त करणे आवश्यक आहे. व तसा आदेश निर्गमित करणे योग्य होईल.

२) तसचे या सर्व वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस) वर्गाची दि.२४/०९/२०२० रोजी एक दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.२५/०९/२०२० रोजी पासून ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने सेवेची कोव्हीड-१९ चे अत्यावश्यक कामाची गरज लक्षात घेऊन पुढील ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. व तसा आदेश निर्गमित करणे योग्य होईल.

३) मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दि.१६/०३/२०२० अन्वये माहे फेब्रुवारी २०२० मध्ये घेतलेल्या मुलाखती मधील फक्त एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी वर्गाची कंत्राटी पध्दतीची ६ महिन्याची सेवा आवश्यक असल्याने एम.बी.बी.एस.पदावरील वैद्यकीय अधिकारी यांना अ.क्र.२ मध्ये मुदतवाढ देणेची कार्यवाही प्रस्तावित केलेली असल्याने या पदावरील मुलाखती वगळता उर्वरीत पदांच्या मुलाखतीचा स्थगीत केलेली प्रक्रिया स्थगिती उठवून मुलाखती घेतलेनंतर पुढील सर्व कामकाजाची संपुर्ण प्रक्रिया रद्द करणे योग्य होईल.

यानुसार वरील अ.क्र.१ ते ३ च्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत दि.२४/०३/२०२० रोजी नियुक्त केलेले वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) वर्गाचा ६ महिन्याचा सेवा कालावधी दि.२३/०९/२०२० या एकाच दिवशी समाप्त करुन यानंतर या वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) यांना दि.२४/०९/२०२० रोजी १ दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात यावा. तसेच वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा व कोव्हिड-१९ चे कामकाज लक्षात घेवून या वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) यांना दि.२५/०९/२०२० पासून पुढील ६ महिन्याच्या कालावधी करीता कंत्राटी पध्दतीच्या सेवासुरु ठेवणेस मुदतवाढ देणेत येत आहे व मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दि.१६/०३/२०२० अन्वये माहे फेब्रुवारी २०२० मध्ये घेतलेल्या मुलाखती मधील फक्त एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी पदांचा वरील प्रमाणे पुढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ देण्यांत आल्याने उर्वरीत सर्व पदांच्या मुलाखतीच्या निकालाची स्थगीत केलेली प्रक्रियेची स्थगिती उठवून या उर्वरीत सर्व पदांच्या मुलाखती घेतलेनंतरच्या पुढील सर्व कामकाजाची संपुर्ण प्रक्रिया रद्द करणेत येत आहे. वरील सर्व कामकाजासाठी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.- ९२४

विभाग- पाणीपुरवठा
दिनांक २३/०९/२०२०

प्रस्तवाचा विषय - वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (जी) वालीव मधील वरूण इंण्डस्ट्रीयल कोरोना (Covid-19) हॉस्पीटल येथे ५ एच.पी. क्षमतेचे समर्शिबल पंप, जलशुध्दीकरण यंत्रणा पुरविणे बसविणे व इतर सलग्न किरकोळ कामे करणेबाबत.

प्रस्तवाच मजकूर - देशभरात कोरोना (Covid-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. याकरीता, प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रामध्ये कोरोना बाधित व संशयीत रुग्णांच्या प्रथमोपचारासाठी/उपचारासाठी वालीव येथील वरूण इंण्डस्ट्रीयल कोरोना (Covid-19) हॉस्पीटल मध्ये अनुक्रमे विलगीकरण कक्ष व अलगीकरण कक्षाचा वापर करण्यात येत आहे. सदर इमारतीमध्ये पाणीपुरवठयाची सुविधा उपलब्ध नसल्याने उपचाराकरीता येणाऱ्या रुग्णांना अडचणी येत आहेत. याकरीता वरूण इंण्डस्ट्रीयल कोरोना (Covid-19) हॉस्पीटल मध्ये तातडीने पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे.

अ. क्र.	कामाचे नांव	कामाचे स्वरूप	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (जी) वालीव मधील वरूण इंण्डस्ट्रीयल कोरोना (Covid-19) हॉस्पीटल येथे ५ एच.पी. क्षमतेचे समर्शिबल पंप, जलशुध्दीकरण यंत्रणा पुरविणे बसविणे व इतर सलग्न किरकोळ कामे करणे.	पाणीपुरवठा कामी ५ एच. पी. क्षमतेचे समर्शिबल पंप जलशुध्दीकरण यंत्रणा पुरविणे बसविणे व इतर सलग्न किरकोळ कामे.	रू.९,८७,८१२/-

याकरीता वर नमुद इमारतीत करावयाच्या पाणीपुरवठा संबंधीत कामांचे सन. २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जिवन प्राधिकरण संबंधीत कामांचे सन. २०१९-२० या वित्तीय वर्षाच्या जिल्हा दर सुचीनुसार आवश्यक कामाचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

सबब उपरोक्त वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (जी) वालीव मधील वरुण इंण्डस्ट्रीयल कोरोना (Covid-19) हॉस्पीटल येथे ५ एच.पी. क्षमतेचे समर्शिबल पंप, जलशुध्दीकरण यंत्रणा पुरविणे बसविणे व इतर सलग्न किरकोळ कामे करणेकरीता कामांच्या होणाऱ्या रक्कम रु.९,८७,८१२/-अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळावी.

ठराव - सबब उपरोक्त वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (जी) वालीव मधील वरुण इंण्डस्ट्रीयल कोरोना (Covid-19) हॉस्पीटल येथे ५ एच.पी. क्षमतेचे समर्शिबल पंप, जलशुध्दीकरण यंत्रणा पुरविणे बसविणे व इतर सलग्न करणेकामी रक्कम रु.९,८७,८१२/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची - ड, प्रकरण - ५ संविदा २ (२) नुसार मे.रोहन नाईक यांच्या समवेत संविदा करुन कार्यादेश देण्यास मंजुरी असे.

प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १२५ विभाग : बांध / ३६४
दिनांक : २३ / ०९ / २०२०

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील सर डि. एम. पेटीट रुग्णालयाच्या मागील बाजूस पाण्याच्या टाकीलगत रुग्णालय बांधणेकामी प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.४,९०,७४,६६१/-

३) प्रस्तावाची गरज :- प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रात सर डी.एम.पेटीट रुग्णालय असून मोठया प्रमाणात नागरीक उपचारासाठी रुग्णालयात येत असतात. वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता सद्यस्थित असलेल्या सर डी.एम.पेटीट रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांकरीता बेडची संख्या अपूरी पडत आहे. सद्यस्थित रुग्णालयात आय.सी.यू., मॅटर्निटी वॉर्ड, एन.आय.सी.यू. बालरोग वॉर्डची कमतरता भासत आहे. सद्यस्थित महानगरपालिकेच्या पाण्याच्या टाकीलगत सि.स.नं.५२ व ५३ अ येथे मोकळी जागा असून मा. आयुक्त सो. यांनी सदर जागेवर मा. शहर अभियंता तथा कार्यकारी अभियंता यांचे समवेत पाहणी करुन रुग्णालयासंबंधी विस्तृत माहिती घेतली. या अनुषंगाने सदर ठिकाणी वार्डाची वाढती मागणी लक्षात घेऊन या ठिकाणी रुग्णालयाचे बांधकाम करणेसंबंधी सूचना केलेल्या आहेत. तरीही सदर ठिकाणी इमारत बांधणे गरजेचे आहे.

याकामी रक्कम रक्कम रु.४,९०,७४,६६१/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

४) कामाचे स्वरुप :- G+३ इमारत एकूण क्षेत्रफळ १७७० चौ.मी.

अंतर्गत कामे :- आर.सी.सी. स्ट्रक्चर, वीट बांधकाम, प्लास्टर, रंगकाम, फॉल सिलिंग, ग्रेनाईट, लिफ्ट, दरवाजे, खिडक्या, पार्टीशन, प्लंबिंग, इलेक्ट्रीक व इतर अंतर्गत कामे.

परिमाण :- आर.सी.सी स्ट्रक्चर (G+३) १७७० चौ.मी
वीट बांधकाम ४०२.८५ घन. मी
प्लास्टर आतील व बाहेरील ६६३७.२३ चौ.मी
रंगकाम आतील व बाहेरील ३१०१.१६ चौ.मी
फॉल सिलिंग ११९५.४८ चौ.मी
ग्रेनाईट २३०.३० चौ.मी
दरवाजे ३७ नग
खिडक्या ८० नग
पार्टीशन २२७.८५चौ.मी

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी :- व.वि.श.म

७) विकास आराखडयातील आरक्षण :- रुग्णालय

८) अर्थसंकल्पीय तरतुद :- अ) लेखाशिर्ष :- विकास निधी अतंर्गत रुग्णालय बांधकामा संबंधित काम

९) स्थावर मालमता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. १० अ.क्र.२५४२ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील सर डि. एम. पेटीट रुग्णालयाच्या मागील बाजूस पाण्याच्या टाकीलगत रुग्णालय बांधणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९०,७४,६६१/-इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

23/9/2020

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५

दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९२६

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २३/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील स्थालांतरीत होणाऱ्या प्रभाग समिती 'ई' तसेच प्रभाग समिती 'बी' कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी यु.पी.एस GEM पोर्टलवरुन खरेदी करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेत मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती, २ रुग्णालय, २१ नागरी सुविधा केंद्रे व ६ अग्निशमन कार्यालये कार्यरत आहेत. सद्यस्थितीत प्रभाग समिती 'बी' व 'ई' या दोन्ही कार्यालयाचे कामकाज एकाच कार्यालयात एकत्रितपणे केले जात आहे. तरी प्रभाग समिती 'ई' कार्यालय वृंदावन गार्डन नालासोपारा (प.) या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येत आहे. सबब कार्यालयाच्या कार्यालयीन कामकाजाकरीता यु.पि.एस खरेदी करणे कामी मा. आयुक्त सो! यांची दि. ११/०७/२०२० रोजीच्या टिपणी अन्वये मंजूरी घेण्यात आली आहे.

शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४ दि.२४ ऑगस्ट २०१७ अन्वये GEM पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तूची खरेदी किंमत रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त व रुपये ३,००,०००/- लाखा पर्यंत असेल तेव्हा अशा वस्तू व सेवांची खरेदी पुरवठादारांची तुलना करुन योग्य दर्जा विनिर्देश व पुरवठाकालावधीची पुर्तता करणाऱ्या निम्नतम (L१) पुरवठादाराकडून खरेदी करण्यास मुभा आहे. त्यानुसार GEM पोर्टलवरील पुरवठादारांची तुलना केली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे.

यु.पी.एस (UPS ६००VA)			
पुरवठादार	नग	प्रति नग रक्कम	एकूण
L१	**२५**	**रु. १८५०/-**	**रु.४६,२५०/-**
L२	२५	रु.२५००/-	रु.६२,५००/-
L३	२५	रु.२०२५.९९/-	रु.५०,६४९/-

वरील प्रमाणे GEM पोर्टलवरील उपलब्ध दरानुसार L१ पुरवठाधारकाकडून यु.पी.एस खरेदी करणे कामी एकूण रक्कम रु. ४६,२५०/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च लेखासांकेतांक ०४१-४१७२-१ 'माहिती व तंत्रज्ञान विभाग संगणकीय साहीत्य खरेदी' या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी GEM पोर्टलवरील उपलब्ध दरानुसार L१ पुरवठाधारकास कार्यादेश देऊन साहित्य खरेदी करण्यास मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील स्थालांतरीत होणाऱ्या प्रभाग समिती 'ई' तसेच प्रभाग समिती 'बी' कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी यु.पी.एस GEM पोर्टलवरील उपलब्ध दरानुसार L१ पुरवठाधारकास कार्यादेश देऊन खरेदी करणे कामी L१ पुरवठाधारका सोबत संविदा करणेस व कार्यादेश देणेस वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)

प्रशासक तथा आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५

दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १२५

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २३/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील विविध विभागासाठी मॉनिटर (Display) GEM पोर्टलवरुन खरेदी करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेत विविध विभाग कार्यरत असून या विभागांअंतर्गत ई-मेलचा आढावा घेणे, प्रस्ताव Geo Tagging करणे, ऑनलाईन आलेल्या तक्रारींचे निवारण करणे तसेच ई- निविदा संबधित अनेक प्रकारची कामे ही संगणक प्रणाली मार्फत केली जातात. सदर कामे करण्यासाठी विभागांना संगणक संच देण्यात आले असून काही संचामधील मॉनिटर खराब झाल्यामुळे विभागात होणाऱ्या दैनंदिन कामकजांमध्ये अडचणी निर्माण होत आहेत . तसेच सदर मॉनिटर अतिशय जुने असल्यामुळे खराब झालेले असून दुरुस्तीसाठी येणारा खर्च जास्त आहे. तसेच दुरुस्ती केल्यानंतर त्यावर मिळणारी वॉरंटी १ महिन्यासाठी असून दुरुस्त न करता नव्याने मॉनिटर खरेदी करणे उचित राहील.

त्याअनुषंगाने विभागातील दैनंदिन कामकाजामध्ये अडथळे निर्माण होऊ नये याकरीता मा.आयुक्त सो! यांच्या दि. ०२/११/२०१९ रोजीच्या मंजूरी अन्वये दरपत्रके मागवून एकूण ३० नग मॉनिटर खरेदी करणेकामी मंजूरी घेण्यात आली. त्यानुसार दरपत्रके मागविण्यात आले असून प्राप्त झालेल्या दरपत्राकातील दरांची खातरजमा करण्यासाठी GEM पोर्टलवर दरांची तपासणी केली असता GEM पोर्टलवरील दर तुलनात्मकरीत्या कमी असल्याने मा. आयुक्त सो! यांनी संदर्भिय क्र. १ अन्वये GEM पोर्टलवरुन खरेदी करण्याचे निर्देश दिले.

संदर्भ क्र. २ अन्वये GEM पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तूची खरेदी किंमत रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त व रुपये ३,००,०००/- लाखा पर्यंत असेल तेव्हा अशा वस्तू व सेवांची खरेदी पुरवठादारांची तुलना करुन योग्य दर्जा विनिर्देश व पुरवठाकालावधीची पुर्तता करणाऱ्या निम्नतम (L१) पुरवठादाराकडून खरेदी करण्यास मुभा आहे. त्यानुसार GEM पोर्टलवरील पुरवठादारांची तुलना केली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे.

१९.५" LED MONITOR			
पुरवठादार	नग	प्रति नग रक्कम	एकूण
L१	३०	रु. ४,९९९/-	रु.१,४९,९७०/-
L२	३०	रु.५,५९७/-	रु.१,६७,९१०/-
L३	३०	रु.१५,०९५/-	रु.४,५२,८५०/-

वरील प्रमाणे GEM पोर्टलवरील उपलब्ध दरानुसार L१ पुरवठाधारकाकडून एकूण ३० नग मॉनिटर खरेदी करणे कामी एकूण रक्कम रु. १,४९,९७०/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च लेखासांकेतांक ०४१-४१७२-१ 'माहिती व तंत्रज्ञान विभाग संगणकीय साहीत्य खरेदी' या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी GEM पोर्टलवरील उपलब्ध दरानुसार L१ पुरवठाधारकास कार्यादेश देऊन साहित्य खरेदी करण्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सो! यांची वित्तीय मान्यता मिळणेस मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील विविध विभागासाठी मॉनिटर (Display)GEM पोर्टलवरुन उपलब्ध दरानुसार L१ पुरवठाधारकास कार्यादेश देऊन खरेदी करणे करण्यास व रक्कम रु. १,४९,९७०/- इतक्या खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील 'माहिती व तंत्रज्ञान विभाग संगणकीय साहीत्य खरेदी' या लेखाशिर्षा अंगतर्गत करता येईल.

(गंगाथरन डी.) 23/4

प्रशासक तथा आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १२६ विभाग :- पाणी पुरवठा, मुख्या
दिनांक :- २४/०९/ २०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई - विरार शहर महानगरपालिका शहरांतर्गत पाणीपुरवठा वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्तीची कामे पाणी पुरवठा विभागामार्फत करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्राची सद्याची लोकसंख्या अंदाजे २१ लक्ष इतकी झाली आहे. महापालिकेस सर्व स्त्रोतांतून मिळून २३१ द.ल.ली. दैनंदिन पाणी पुरवठा उपलब्ध होत असून गळती वजा करता महापालिका १९६.३६ द.ल.ली. पाणी नागरीकांपर्यंत पोहचवत आहे. महापालिकेने आत्तापर्यंत शहरात सुमारे ५५,५३८ इतक्या नळजोडण्या दिल्या आहेत. महापालिका क्षेत्राचा विस्तार ९ प्रभाग समिती मध्ये विभागला असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ६९ गावांच्या पाणी पुरवठा योजनेतील ५३ गावांचा महापालिकेत समावेश असल्याने सदर गावांना आवश्यक २१ द.ल.ली. पाणी पुरवठा ही महापालिकेमार्फत होत आहे. महापालिका क्षेत्रात उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे नियोजन करण्याच्या दृष्टीने A/C, B/E, D/F, G/H व I हे ५ झोन तयार करण्यात आले असून प्रत्येक झोन मध्ये खालील प्रमाणे पाण्याची मागणी आहे.

अ.क्र.	प्रभाग निहाय झोन	पाण्याची मागणी (द.ल.ली.)
१	A/C विरार/ चंदनसार	७१
२	B/E नालासोपारा पुर्व/पश्चिम	३०
३	D/F आचोळे/ पेल्हार	३२
४	G/H वालीव / नवघर, माणीकपुर	५६
५	I वसई गांव	७
	एकूण	१९६

सदर उपलब्ध होणारे पाणी वरील ५ झोन मधील नळ जोडणी धारकांपर्यंत पोहचविण्यासाठी तसेच नागरीकांच्या पाण्याविषयी येणाऱ्या तक्रारी व देखभाल दुरुस्तीसाठी यापुर्वी ५ पाणी व्यवस्थापनाचे वार्षिक निविदा काढण्यात आली असून त्यांची मुदत मार्च २०२२ पर्यंत आहे. सदर ठेक्यामार्फत याकामी आवश्यक मनुष्यबळ, वाहने व साहित्य ठेकेदाराने पुरवठा करुन शहरातील पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्याचे काम करावयाचे आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.२२/०७/२०२० रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत शहरांतर्गत पाणी पुरवठा देखभाल दुरुस्तीची कामे दि.१/१०/२०२० पासून खात्यामार्फत करण्याचे निर्देश

दिले आहेत. पाणी पुरवठा विभागामार्फत शहरातील जलवाहिन्या देखभाल दुरुस्ती व यंत्रणा चालविण्यासाठी मनुष्यबळ, वाहने, डिझेल, गोडाऊन व दुरुस्ती सहित्य/जोडसाहित्य यांची खालीलप्रामणे आवश्यकता आहे.

A. मनुष्यबळ

झोन	पंप ऑपरेटर	वॉलमन	मजूर	वॉचमन		स्टोअर किपर	वेल्डर
A & C	२	४०	१५	४	३	१	0
B & E	३	२५	१०	३	३	१	0
D & F	२	२४	१०	३	०	०	0
G & H	६	३६	२०	०	०	१	0
I	३	१२	७	२	३	१	0
मुख्यालय	०	०	०	०	०	१	१
एकूण	१६	१३७	६२	१२	९	५	१

वरील प्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करणेकामी आस्थापना विभागास आदेश होणे आवश्यक आहे.

B. वाहने

वरील प्रमाणे पाणी पुरवठा ५ झोन असून यापुर्वी खालील प्रमाणे ३ वाहने उपलब्ध करुन दिली आहेत.

अ.क्र.	झोन	वाहन क्रमांक	शेरा
१	A/C	MH48 BM 6894	दि. ११/०८/२०२० पासून वाहन विभागामार्फत वाहन उपलब्ध
२	B/E	MH48 BM 6895	
३	D/F	-	वाहन अद्याप उपलब्ध नाही.
४	G/H	MH48 BM 6893	दि. ११/०८/२०२० पासून वाहन विभागामार्फत वाहन उपलब्ध
५	I	-	वाहन अद्याप उपलब्ध नाही.
६	मुख्यालय	J.C.B.	वाहन अद्याप उपलब्ध नाही.

वरील प्रमाणे ३ झोन करीता ३ Pick-Up वाहने उपलब्ध झाली असून D/F व I या २ झोन साठी २ Pick-Up वाहने आवश्यक आहेत. सदर २ Pick-Up वाहने चालकासह उपलब्ध करुन देणेकामी वाहन विभागास आदेश होणे आवश्यक आहे. तसेच जलवाहिनीतील गळती काढण्यासाठी जलवाहिन्या काही ठिकाणी खोलवर असल्यामुळे सदर ठिकाणी JCB लावून खोदकाम करणे आवश्यक असते त्यामुळे वाहन विभागामार्फत मंजूर दराने JCB भाडेतत्वावर आवश्यकतेनुसार उपलब्ध होणे बाबत वाहन विभागास आदेश व्हावेत ही विनंती.

C. डिझेल

वरील प्रमाणे ५ Pick-Up वाहने व वेल्डिंग मशीन विथ जनरेटर वाहन या वाहनांसाठी आवश्यक डिझेल प्रभाग समिती सी, ई, एफ, एच व आय च्या

पाणी पुरवठा विभागांच्या अर्थसंकल्पात "इंधन व वंगणखरेदी " या लेखाशिर्षावर पुरेशी तरतूद करुन त्यातून सदर खर्च भागविणे शक्य आहे. सदर कामी सदर लेखाशिर्षावर तरतूद अपूरी असल्यास तरतूद पुर्नविनीयोजनाचे प्रस्ताव सादर करण्यास सबंधीत प्रभाग समितींना कळविणे आवश्यक आहे.

D. गोडाऊन

वरील प्रमाणे ५ झोनसाठी व १ मुख्यालयासाठी असे ५ गोडाऊन आवश्यक आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे गोडाऊनची जागा निश्चित करण्यात येत आहे.

अ.क्र.	झोन	गोडाऊन	सद्य:स्थिती
१	A/C विरार/ चंदनसार	विराटनगर पाण्याच्या टाकीजवळ उपलब्ध असलेले गाळे	सदर गाळ्यांमधील गाळा
२	B/E नालासोपारा पुर्व/पश्चिम	मनपाच्या मालकीच्या मोकळ्या जागेचा शोध घेणे आवश्यक आहे.	बांधकाम विभागाकडून उपलब्ध होणाऱ्या जागेच्या ठिकाणी गोडाऊन बांधून घेणे आवश्यक आहे.
३	D/F आचोळे/ पेल्हार		
४	G/H वालीव / नवघर, माणीकपुर	उपलब्ध आहे.	माणिकपुर टाकी शेजारील ईमारतीमधील तळमजल्याची खोली
५	I वसई गांव	मनपाच्या मालकीच्या मोकळ्या जागेचा शोध घेणे आवश्यक आहे.	सद्या हॉस्पिटलच्या जवळील टाकीखाली आहे. परंतू त्याशेजारी हॉस्पिटलचे बांधकाम होणार असल्याने नवीन जागी नव्याने बांधायला लागेल.
६	मुख्यालय	विराटनगर पाण्याच्या टाकीजवळ उपलब्ध असलेले गाळे	सदर गाळ्यांमधील गाळा

वरील प्रमाणे प्रभाग समिती B/E व D/F करीता एक तसेच I करिता आवश्यक गोडाऊन नव्याने बांधकाम करणे कामी प्रभाग समिती "डी" व प्रभाग समिती "आय" बांधकाम विभागास आदेश होणे आवश्यक आहे.

E. अवजारे व यंत्र खरेदी

वेल्डींग मशीन व वेल्डींग किट, गॅस कटर, ईलेक्ट्रिकल ब्रेकर, कटींग साठी (Cutting Set) ऑक्सिजन सिलेंडर व गॅस सिलेंडर, ईलेक्ट्रीक ग्राईंडर, जनरेटर (ट्रॉली वर बसविलेले) इत्यादी अवजारे व यंत्र विभागाकडे देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी असणे आवश्यक आहे. सदर अवजारे व यंत्र खरेदी कामी दरपत्रक मागवून अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. किंवा शासनाच्या मंजूर दरपत्रकानुसार खरेदी करावी लागणार आहे.

सदर अवजारे व यंत्रे खरेदीकामी दरपत्रके मागविण्यास व प्राप्त दरानुसार अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविणेबाबत स्वतंत्र प्रस्ताव ठेवण्यात येईल. किंवा शासनाच्या मंजूर दरपत्रकानुसार खरेदी करणे शक्य असल्यास तसा प्रस्ताव विभागामार्फत सादर करण्यांत येईल.

F. दुरुस्ती सहित्य/जोडसाहित्य

महापालिका क्षेत्रात विविध व्यासाच्या मुख्य व वितरण वाहिन्या अंथरल्या असून त्यावरुन नागरीकांना नळ जोडण्या देऊन पाणी पुरवठा केला जात आहे. सदर जलवाहिन्या अटकाव (चोकअप) तोट्या ह्या जीर्ण, नादुरुस्त, खराब होत असल्याने, चोकअप होत असल्याने नागरीकांच्या पाणी पुरवठा न होणे बाबत तक्रारी प्राप्त होत असतात. त्याच प्रमाणे जलवाहिनीला गळती होत असते प्राप्त झालेल्या तक्रारींनुसार दुरुस्तीकामी आवश्यक साहित्य व जोडसाहित्य विभागाकडे उपलब्ध असणे आवश्यक असून सदर साहित्य उपलब्ध मनुष्यबळास पुरवठा करुन कामे करावयाची असल्याने सोबत जोडलेल्या परिषीष्ट "अ" मधील साहित्याचे दर मंजूर करुन मंजूर पुरवठादाराकडून वेळोवेळी आवश्यकतेनुसार खरेदी करणे गरजेचे आहे.

याकामी परिषीष्ट "अ" मधील साहित्याचे काही दर हे म.जी.प्रा.च्या दरसूचीत उपलब्ध आहेत परंतू काही दर हे दरसूचीत नसल्यामुळे बाजारभावानूसार घ्यावे लागतात त्यामुळे सर्व साहित्यासाठी B-२ प्रकारची निविदा मागविल्यास मंजूर पुरवठादाराकडून वेळेत साहित्य उपलब्ध करुन वेळच्यावेळी कामे पुर्ण करता येतील. याकामी या आर्थिक वर्षात अंदाजे रु. ५ कोटी खर्च अपेक्षित असून सदर खर्च सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील "शहरांतर्गत योजना दुरुस्ती देखभाल" या लेखाशिर्षावरील तरतूद रु. २० कोटी पैकी शिल्लक रक्कमेमधून भागविणे शक्य आहे. याकामी B-२ प्रकारची निविदा मागविण्यास व खर्चास मान्यता आवश्यक आहे.

१) मुद्दा क्र. A मधील आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेकामी आस्थापना विभागास आदेश होणे आवश्यक आहे.

२) मुद्दा क्र. B मधील उर्वरीत २ Pick-up वाहने उपलब्ध करुन देण्यास वाहन विभागास आदेश होणे आवश्यक आहे. तसेच पाणी पुरवठा विभागाच्या मागणीनुसार भाडेतत्वावर JCB वाहन विभागामार्फत उपलब्ध होणेसाठी आदेश होणे आवश्यक आहे.

३) मुद्दा क्र. C नूसार प्रभाग समिती सी, ई, एफ, एच व आय च्या पाणी पुरवठा विभागांमार्फत सर्व Pick-up वाहने व अन्य मशीनरी व यंत्रे यांना आवश्यक डिझेल पुरवठा करणेबाबत आदेश होणे आवश्यक आहे.

४) मुद्दा क्र. D मधील गोडाऊनची जागा "ए/सी व मुख्यालयासाठी विराट नगर पाण्याच्या टाकीजवळील जागेतील" दोन गाळे उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्यालय बांधकाम विभास तसेच "प्रभाग समिती बी/ई, डी/एफ व आय साठी" मनपाच्या मालकीची मोकळ्या जागेचा शोध घेऊन २ गोडाऊनचे बांधकाम करुन देणेबाबत प्रभाग समिती "डी" व "आय" च्या बांधकाम विभागास आदेश होणेस आवश्यक आहे.

५) मुद्दा क्र. E मधील अवजारे व यंत्र खरेदीकामी दरपत्रके मागवून अंदाजपत्रक तयार करणेस मान्यता मिळावी. किंवा शासनाच्या मंजूर दरकरारानुसार खरेदी

करणे शक्य असल्यास तशी खात्री करुन प्रस्ताव सादर करण्यास आदेशास्तव सादर.

६) मुद्दा क्र. F मधील दुरुस्ती साहित्य/जोडसाहित्य उपलब्ध होणेकामी B-२ प्रकारची निविदा मागविण्यास तसेच याकामी अपेक्षीत खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा.महासभेस आहेत परंतू सद्य:स्थितीत शासनाने वसई-विरार शहर महानगरपालिकेवर मा.प्रशासकाची नेमणूक केली असून मा.आयुक्त तथा प्रशासक यांना मंजूरी देण्याचे अधिकार निहित आहेत.

तरी वरील १ ते ६ प्रमाणे कार्यवाही करण्यास तसेच याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

ठराव :- १) शहरांतर्गत देखभाल दुरुस्ती कामे करण्यासाठी विभागाने प्रस्तावत नमूद A ते F प्रमाणे कार्यवाही होणे आवशक आहे.

२) त्या अनुषंगाने वरील अ.क्र. १ ते ३ नुसार संबंधहत विभागांना आवश्यक कार्यवाही करण्यासाठी विभागामार्फत कळविण्यात यावे.

३) अ.क्र. ४ मधील नमूद नुसार महापालिकेच्या मालकीच्या उपलब्ध जागांचा बांधकाम विभागाने त्वरीत शोध घेवून गोडावून बांधकाम करणे कामी आवश्यक्त प्रस्ताव सादर करावा.

४) अ.क्र. ५ मधील नमूद नुसार आवश्यक अवजारे , यंत्र खरेदीकामी दरपत्रके मागविण्यास मान्यता देण्यात येत असून सदर अवजारे , यंत्र शासनाच्या मंजूर दरकरारानुसार खरेदी करणे शक्य असल्यास तसा प्रस्ताव त्वरीत सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे

५) अ.क्र. ६ मधील नमूद आवश्यक साहित्य/जोड साहित्य उपलब्ध होणे कामी B-२ प्रकारची निविदा मागविण्यास व याकामी येणा-या वार्षीक अंदाजे रु.५ कोटी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

24/9/2020

(गंगाथरन डी.)

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ९२९

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-24/09/2020

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील सर.डी.एम. पेटीट रुग्णालयातील नविन इमारतीत विद्युतीकरण करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- 1) प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील सर.डी.एम. पेटीट रुग्णालयातील नविन इमारतीत विद्युतीकरणे करणे.

2) अंदाजपत्रकिय रक्कम :- रु.14,72,585/-

3) प्रस्तावाची गरज :- प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील सर.डी.एम. पेटीट रुग्णालयातील नविन इमारतीत स्ट्रक्चर ऑडिट यांच्या सल्यानुसार इमारतीचे मजबुतीकरण व दुरुस्ती करण्याचे काम सुरु आहे. सदर नुतनीकरणाचे काम सुरु असतांना जुन्या झालेल्या इलेक्ट्रीक केबल्स, वायरिंग इ. नादुरुस्त झालेले आहेत. तसेच नविन बांधकाम करतेवळी विद्युतीकरणाचे काम गरजेचे आहे. तरी इमारतीचे विद्युतीकरण करणेकामी सन 2019-20 चे सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत जिल्हा दरसुचीनुसार रक्कम 14,72,585/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्राक तयार केले आहे.

4) कामाचे स्वरुप :-

अंतर्गत कामे :- विद्युतीकरण

परिमाण :- केसिंग केपिंग पटटी-255 मीटर बॉक्स टंकिंग- 105 मीटर, 2x2.5 स्के.एम.एम.वायर-255 मीटर, 2x4 स्के.एम.एम.वायर-665 मीटर, मॉडयुलर स्विच-133 नग, सॉकेट-137 नग, इंडिकेटर लॅम्प-30 नग, रेग्युलेटर-59 नग, कंसिल पॉईंट वायरिंग -60 नग, प्लग ऑन बोर्ड वायरिंग -29 नग, पॉईंट वायरींग -118 नग, स्वतंत्र प्लग-46 नग, सरफेस एल.ई.डी पॅनल-15 नग, स्क्वेअर सरफेज एल.ई.डी पॅनल -18 नग, टयुब लाईट -83 नग, फ्लड लाईट – 10 नग, फॅन – 65 नग, एग्झॉस्ट फॅन – 8 नग, गिझर – 7 नग, 1.5 टन ए.सी.-6 नग, 1 टन ए.सी. 3 नग, एस.पी.एम.सी.बी-71 नग, डी.पी.एम.सी.बी-8 नग, एफ.पी.एम.सी.बी – 14 नग, टी.पी.एम.डी.बी-9 नग, एनक्लोझर – 21 नग, आर.सी.सी.बी-3 नग, केबल 2 कोर 4 स्क्वेअर एम.एम-90 मीटर, केबल 4 कोर 4 स्क्वेअर एम.एम-125 मीटर, अर्थींग-4 नग इत्यादी.

5) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

6) जागेची मालकी :- व.वि.श.म

7) विकास आराखडयातील आरक्षण :- रुग्णालय

8) अर्थसंकल्पीय तरतुद :- विकास निधी अंतर्गत रुग्णालय बांधकाम संबंधित कामे.

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 67(3) (क) नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक हयांच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (आय) कार्यक्षेत्रातील सर.डी.एम. पेटीट रुग्णालयातील नविन इमारतीचे नव्याने विद्युतीकरण करणेकामी तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकिय रक्कम 14,72,525/- रुपये पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ९३०

विभाग :- आरोग्य विभाग
दिनांक :३० /०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- **कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगावर नियंत्रण मिळविणेकामी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत बनविण्यात आलेल्या विलगीकरण कक्षामध्ये सोडीयम हायपोक्लोराईड फवारणी करणेकरिता कोल्ड फ्लोगर्स/मिस्टर्स पंप खरेदी करणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- जगभरात कोरोना (कोव्हिड-१९) या संसर्गजन्य रोगची लागण झाली आहे. कोव्हिड-१९ हा संसर्गजन्य रोग असल्यामुळे एका मनुष्याच्या शरीरातुन दुसऱ्या मनुष्याच्या शरीरात पसरत असल्याने महाराष्ट्रात आजतागायत १ लक्ष नागरिकांना कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाची लागण झाली आहे. त्यामध्ये वसई विरार शहर महानगरपालिका परिक्षेत्रात आजपर्यंत १३,५२३ कोव्हिड -१९ पॉझीटिव्ह रुग्ण आढळून आले आहेत. कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाची लागण झालेल्या रुग्णांसाठी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील जी.जी.कॉलेज मध्ये विलगीकरण कक्ष बनविण्यात आले आहेत. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाची लागण झालेल्या रुग्णांना वरीलप्रमाणे असणाऱ्या विलगीकरण कक्षामध्ये ठेवण्यात येते. सदरील विलगीरण कक्षामध्ये हायपोक्लोराईडची फवारणी करणे आवश्यक असल्याने कोल्ड फ्लोगर्स/मिस्टर्स पंप खरेदीसाठी बाजार भावाचे दर मागविण्यात आले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	अभिकर्त्याचे नाव	साहित्याचे नाव	नग संख्या	बाजार भावाचे प्राप्त दर	एकुण खर्च
१	मे.के.के.ब्रदर्स	कोल्ड फ्लोगर्स/मिस्टर्स पंप	२	रु.१४,२००/-	रु.२८,४००/-
२	[redacted]			[redacted]	[redacted]
३	मे.आदीनाथ इंटरप्रायजेस			रु.१४,५००/-	रु.२९,०००/-

तरी वरीलप्रमाणे मागविण्यात आलेल्या बाजारभावा मध्ये मे.एम.के.इंटरप्रायजेस यांचे दर सर्वात कमी **रक्कम रु.१३,९००/-** असल्याने दोन कॉल्ड फ्लोगर्स/मिस्टर्स पंप खरेदीसाठी **रक्कम रु.२७,८००/- (अक्षरी रक्कम रु.सत्तावीस हजार आठशे मात्र)** एवढा खर्च अपेक्षीत आहे.

सदरील खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील **साफसफाई साहित्य खरेदी** या लेखाशिर्षावरील तरतुद **५ कोटी** मधुन भागविणे शक्य आहे. परंतु जागतिक महामारीच्या पार्श्वभुमीवर भारत बंद असल्यामुळे सदरील साहित्यासाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणे शक्य नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) मधील प्रकरण ५ चे कलम (२), (२) अन्वये विना निविदा खरेदी करणे शक्य आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) (क) अन्वये व महाराष्ट्र शासनाचे दि.१८ मार्च २०२० रोजीच्या परिपत्रकानुसार विना निविदा खरेदी करणे शक्य आहे.

तरी कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगावर नियंत्रण मिळविणेकामी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत बनविण्यात आलेल्या विलगीकरण कक्षामध्ये सोडीयम हायपोक्लोराईड फवारणी करणेकरिता कॉल्ड फ्लोगर्स/मिस्टर्स पंप खरेदी करणेकामी **रक्कम रु.२८,०००/-** एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :- कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगावर नियंत्रण मिळविणेकामी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत बनविण्यात आलेल्या विलगीकरण कक्षामध्ये सोडीयम हायपोक्लोराईड फवारणी करणेकरिता कोल्ड फ्लोगर्स/मिस्टर्स पंप खरेदी करणेकामी **रक्कम रु.२८,०००/-(अक्षरी रक्कम रु.सत्तावीस हजार आठशे मात्र)** एवढया अंदाजीत खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. १३१

विभाग :- आरोग्य विभाग
दिनांक :३०/०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या व जखमी कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी कुत्र्यांवर औषध उपचार करणाऱ्या मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांच्या निविदेस द्वितीय मुदतवाढ देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोठया प्रमाणात भटकी कुत्री आहेत. सदरील कुत्र्यांमुळे महानपालिका हद्दीत राहणारे नागरिक तसेच लहान मुले यांना या भटक्या कुत्र्यांचा मोठया प्रमाणात सामना करावा लागत आहे. कुत्रा चावल्याने रॅबीज सारखा गंभीर स्वरुपाचा आजार होण्याची दाट शक्यता आहे. तरी भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवास आळा घालणेसाठी केंद्र शासनाने प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक केले आहे. सदरील कायद्याच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र शासनाच्या संकिर्ण १०२००४/प्र.क्र.४२/नवि.२०, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२ दि. २४/०८/२००७ आदेशान्वये भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर उपाययोजना करणेबाबत मा.उच्च न्यायालय यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्यानुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेने भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रणासाठी आजतागायत महानगरपालिकेकडून २८९०८ एवढया भटक्या कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व रॅबीज लस देण्यात आली आहे. तसेच सन २०१९-२० या वित्तीय वर्षात मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांना कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणेकामी स्थायी समिती ठराव क्र.३२१ दि.११/०९/२०१९ अन्वये करारनामा करुन जा.क्र.वविशम/आरोग्य/८७/२०१९, दि.१३/०९/२०१९ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे. सदरील अभिकर्त्याने सन २०१९-२० या वित्तीय वर्षामध्ये खालीलप्रमाणे कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे तसेच रॅबीज प्रतिबंधक लस दिली आहे.

अ.क्र.	महिना	नर	मादी	एकुण संख्या
१	सप्टेंबर -२०१९	५९	५३	११२
२	ऑक्टोबर -२०१९	२१७	२०९	४२६
३	नोव्हेंबर -२०१९	१०९	११६	२२५
४	डिसेंबर -२०१९	५७	७५	१३२
५	जानेवारी-२०२०	१३९	१२९	२६८
६	फेब्रुवारी -२०२०	२१४	२२२	४३६
७	मार्च -२०२०	२०९	२५८	४६७
एकुण		१००४	१०६२	२०६६

तरी वरीलप्रमाणे सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांनी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात १३ सप्टेंबर २०१९ पासुन आजतागायत एकुण २०६६ एवढया भटक्या कुत्र्यांवर निर्बिजीकरण व रॅबीज लस दिली आहे. प्रति नर व मादी यांच्यावर शस्त्रक्रिया करणेकामी रक्कम रु.१६००/- प्रमाणे आजतागायत रक्कम रु.३३,०५,६००/- (अक्षरी रक्कम रु.तेहतीस लक्ष पाच हजार सहाशे मात्र) एवढा खर्च झालेला आहे.

परंतु मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी या कुत्र्यांवर निर्बिजीकरण व रॅबीज लस देणाऱ्या अभिकर्त्याची मुदत वित्तीय वर्ष सन २०१९-२० मधील ३१ मार्च २०२० रोजी संपली असल्याने व कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव भारता सोबत जगभरात झाल्याने मा.पंतप्रधनानी भारतात लॉकडाऊनची घोषणा केल्याने नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणे शक्य नव्हते. त्यामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांना सदरील कामासाठी प्रशासकीय ठराव क्र.४५ दि.०७/०८/२०२० अन्वये दि.०१ एप्रिल २०२० ते दि.३० सप्टेंबर २०२० या ६ महिन्या करिता प्रथम मुदतवाढ देण्यात आली असून वविशम/आरोग्य/४९/२०२० दि.०७/०८/२०२० अन्वये मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांना कार्यादेश देऊन मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांनी माहे एप्रिल-२०२० ते ऑगस्ट -२०२०

या काळावधीमध्ये भटक्या कुत्र्यांवर खालील प्रमाणे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस दिली आहे.

अ.क्र.	महिना	नर	मादी	एकुण संख्या
१	एप्रिल-२०२०	२४९	२४८	४९७
२	मे-२०२०	२४४	२८०	५२४
३	जून-२०२०	१९८	२१९	४१७
४	जूलै-२०२०	२५४	२५९	५१३
५	ऑगस्ट-२०२०	१५२	१८४	३३६
एकुण		१,०९७	१,१९०	२,२८७

तरी मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांनी एकूण २,२८७ एवढया भटक्या कुत्र्यांवर शस्त्रक्रिया केली असून दि.३०/०९/२०२० रोजी मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांची प्रथम मुदतवाढीची मुदत संपत आहे. तसेच वसई विरार शहर महानगरपलिका कार्यक्षेत्रातील भटक्या व जखमी कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी कुत्र्यांवर औषध उपचार करणे या कामासाठी प्रशासकीय ठराव क्र.८४ दि.२४/०८/२०२० अन्वये सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता सदरील कामासाठी वविशम/आरोग्य/१६९/२०२० दि.२९/०८/२०२० रोजी जाहिर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

परंतु सदरील ई-निविदेमध्ये एकाच अभिकर्त्याने प्रतिसाद दिला आहे. परंतु नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणेसाठी अधिक काळावधी लागणार असल्याने भटक्या व जखम कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी कुत्र्यांवर औषध उपचार करणे हे काम करीत असलेल्या मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांना संपूर्ण ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन अभिकर्त्याची

नेमणूक होईपर्यंत मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांना द्वितीय मुदतवाढ देणे आवश्यक व गरजेचे आहे.

तरी सदरील कामी होणारा खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष **"मोकाट आणि पिसाळलेल्या जनावरांचा बंदोबस्त व मादी श्वान निर्बिजीकरण करण्यावरील खर्च"** या लेखाशिर्षच्या अंतर्गत तरतुद **रक्कम रु.६०** लक्ष मधुन भागविता येईल.

तरी मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांना सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या व जखमी कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी कुत्र्यांवर औषध उपचार करणाऱ्या मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांच्या निविदेस द्वितीय मुदतवाढ देणेकामी व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :- सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांना वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या व जखमी कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी कुत्र्यांवर औषध उपचार करणे या कामाची संपूर्ण ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन अभिकर्त्याची नेमणूक होईपर्यंत द्वितीय मुदतवाढ देऊन होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

D/AArogy/Dog/Prashaskiy tharav

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९३२

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक ३० /०९ /२०२०

प्रस्तावाचा विषय :- विसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई, अग्रवाल रुग्णालय व चंदनसार येथिल श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे फुल्ली ऑटोमॅटिक ऑटोक्लेव मशिन विनानिवीदा खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ माताबाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या वाढता संसर्ग लक्षात घेता सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये करोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. सदर रुग्णालयात वैद्यकीय कर्मचारी व रुग्णांना वैद्यकीय सुविधा देताना वापरत असलेले सर्जिकल साहित्य, उपकरणे व कापड प्रकार जंतू संसर्ग टाळणेकामी निर्जंतुकीकरण करुन वापरावे लागतात. सदर कामी ऑटोक्लेव उपकरणाची गरज लागत असून वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे मागविण्यात आलेल्या वित्तिय वर्ष २०१७-२०२० करीता मंजूर असलेल्या ई-निविदेत समावेश करण्यात आलेला होता. परंतू संदर्भिय क्र.१ वर नमुद केल्याप्रमाणे मंजूर निविदाधारक मे.जिनोवा बायोटेक यांनी सदर मशिन पुरवठा करणेकामी असमर्थ असल्याचे कळविले आहे. सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई, अग्रवाल रुग्णालय, वसई व चंदनसार येथील श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे वैद्यकीय उपकरणे निर्जंतुकीकरण करणेकामी ऑटोक्लेवची आवश्यकता असल्यामुळे फुल्ली ऑटोमॅटिक ऑटोक्लेव मशिन खरेदी करणे योग्य होईल. यानुसार विविध कंपनीकडून / वितरकांकडून दरपत्रक ई-मेलद्वारे मागविण्यात आले होते. सदर प्राप्त दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे

अ.क्र.	वितरकाचे नाव	मशिनचा तपशील	सर्व करांसहीत किंमत (प्रति नग)	शेरा
१.	डॉ. सिद्धी लॅबोरेटरीज	Fully Automatic Vertical AutoClave size 18" x 30" with S.S Basket 18" x 30"	८२,६००/-	16" x 24" without Basket
२.	मे.जिनोवा बायोटेक		५८,०००/-	16" x 24" without Basket
३.	मे.लॅबलाईन स्टॉक सेंटर		६८,३९२.८०/-	18" x 30" with S.S Basket

वरिल दरांची तुलना करुन पाहिली असता उत्पादीत कंपनी, मे.लॅबलाईन स्टॉक सेंटर, मुंबई यांचेकडून Fully Automatic Vertical AutoClave size 18" x 30" with S.S Basket 18" x 30" करिता प्राप्त दर हे १ वर्ष वॉरंटीसह आहे तसेच सदर कंपनी स्वत: मशिनचे उत्पादन करीत असल्यामुळे व वसई येथेच संबंधित युनिट असल्यामुळे मशिन कार्यान्वित झाल्यानंतरची देखभाल दुरुस्ती सेवा तातडीने पुरवू शकते. अ.क्र.२ वरील नमुद वितरकाने नमुद केलेले दर हे कमी असले तरी आवश्यक तपशिलाप्रमाणे नसल्यामुळे मागविणे योग्य होणार नाही.

सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई, अग्रवाल रुग्णालय, वसई व चंदनसार येथील श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे प्रत्येकी १ नग फुल्ली ऑटोमॅटिक ऑटोक्लेव मशिनची आवश्यकता असल्याने असे एकूण ३ नग फुल्ली ऑटोमॅटिक ऑटोक्लेव मशिन खरेदी करणेकामी होणारा खर्च रक्कम रु.२,०५,१७८.४/- असून सदरचा खर्च "रुग्णालयीन यंत्रे व इतर साधने" या लेखाशिर्षाखालील नमुद तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे. तरी Fully Automatic Vertical AutoClave size 18" x 30" with S.S Basket 18" x 30" विनानिविदा खरेदी करणेस व याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ कलम (क्र.५९) अनुसूची (ड) प्रकरण ५.२.२ व ६७ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये उपरोक्त ३ नग फुल्ली ऑटोमॅटिक ऑटोक्लेव मशिन मे.लॅबलाईन स्टॉक सेंटर, मुंबई यांच्यामार्फत खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२,०५,१७८.४/- (अक्षरी – दोन लाख पाच हजार एकशे अठ्याहत्तर रुपये व चाळीस पैसे मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी) 30/9
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६३३

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक :३० /०९ /2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास Tab. Favipiriavir 200 mg विनानिविदा खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चाचे प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ माताबाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी रिध्दी विनायक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, गोन्सालो गार्सिया कॉलेज, वसई येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, अग्रवाल हॉस्पिटल-वसई पुर्व येथे विलगलीकरण कक्ष व म्हाडा बिल्डींग नं.१० येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले असून वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय स्थापन करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये करोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देतात. परंतु काही वेळा जीवनावश्यक असलेल्या औषधांचे दर ई-निविदेत मंजुर नसल्याने खरेदी करणे गैरसोयीचे होते. कोवीड रुग्णांकरीता जीवनावश्यक असणारे Tab.Favipiriavir 200 mg ची आवश्यकता आहे. वैद्यकीय उपचार देणेकामी प्रति रुग्णांस ३४ गोळयांची आवश्यकता भासत असून तुर्तास १००० रुग्णांकरीता सदरचे औषध मे.ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि., मुंबई यांच्याकडून उपलब्ध करुन घेणे गरजेचे आहे. याबाबतच्या दराचा व मागणीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	औषधाचे नाव	दर निश्चिती किंमत (प्रति गोळया)	मागणी	एकूण रक्कम (सर्व करासहित)
1	Tab. Favipiriavir 200 mg	24.94	1 x 34000	847960
			Total	8,47,960/-

सद्यस्थितीत मे.ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि., मुंबई त्यांच्याकडे उपलब्ध असून कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता सदर औषधे त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास तुर्तास 34000 नग Tab. Favipiriavir 200 mg खरेदी करणे कामी रू.८,४७,९६०/- इतका खर्च अपेक्षित असून "रूग्णालय औषधी खरेदी" या लेखाशिर्षाखालील नमुद शिल्लक रक्कम रू.३,५४,५३,९३४/- या तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे. तरी सदरची औषधे विनानिविदा खरेदी करणेकामी मे.ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि., मुंबई यांना पुरवठा आदेश देणेस व येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबतच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम क्र.५९ ५.२.२ व ६७ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त 34000 नग Tab. Favipiriavir 200 mg खरेदी करण्यास येणाऱ्या रक्कम रू.८,४७,९६०/- (अक्षरी- आठ लाख सत्तेचाळीस हजार नऊशे साठ रुपये मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९३४

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक ३०/०९ /2020

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महान ारपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोवीड-१९ टेस्ट करणेकामी स्वतंत्र RT-PCR लॅबमध्ये लागणारी प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य ही प्राप्त दरपत्रकानुसार विनानिविदा खरेदी करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, दवाखाने, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच या व्यतिरिक्त कोवीड-१९ चे प्रादुर्भाव रोखण्याकरीता महापालिका कार्यक्षेत्रात अलगीकरण कक्ष, विलगीकरण कक्ष, कोवीड हेल्थ सेंटर, समर्पित कोवीड हेल्थ सेंटर व अधिग्रहीत केलेले रुग्णालय नव्याने सुरु करण्यात आलेले असून कोवीड-१९ रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता सदर चाचणीची क्षमता वाढविण्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत कार्यक्षेत्रातील कोवीड -१९ संशयित रुग्णांचे स्वॉब नमुना चाचणी करीता जे.जे रुग्णालय, हायकिन बायोफार्मास्युटिकल्स, मुबई येथे नियमितपणे पाठवावे लागतात. परंतू त्याठिकाणी कामाचा ताण अधिक असल्याकारणाने कोवीड संशयित रुग्णांचे चाचणी अहवाल विलंबाने प्राप्त होतात. सबब वैद्यकीय सेवा देणेकामी गैरसोय होत असल्यामुळे श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार येथे RT-PCR लॅब सुरु करण्यात आलेली आहे.

कोविड-१९ संशयित रुग्णांची चाचणी करणेकामी प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. M/s SCI-FI Biologicals, Pune यांच्यामार्फत सदर प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्याचे दरपत्रक प्राप्त झाले असून त्याचा तपशिल व मागणी खाली नमुद केलेली आहे. तरी सदर प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी करणे योग्य होईल.

अ.क्र.	नाव	उत्पादीत कंपनीच नाव कॅट नं	पॅकिंग	मागणी	प्राप्त दर	एकूण रक्कम
1	Spinwin MC-00 Microcentr 6 Places rotor for 1.5 ml Tube	Tarson – 1010	Each	1	9154	9154
2	Conical Centrifuge Rube Rack	Tarson – 241080	1 Pack	1	2941	2941
3	CRYOCHILL TM 0^0 C Mini Cooler	Tarson – 525010	Each	1	3467	3467
4	15 ml, Conical Bottomed Tube with Cap	Geenaxy – GEN-CT-15 ml	500/ PK	1	3755	3755

5	Barrier Tips Max Capacity 1000UL Sterile	Himedia – LA859 -6x96NO	1000 Tips	1	2575	2575
6	TRUPCR SARS- COV-2 Rt qPCR Kit	3B Black Bio Biotech – 38304	100 RXN	20	30000	600000
					Total	6,21,892.00
					GST 18%	1,11,940.56
					Net Amount	7,33,832.56

प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य विना निविदा M/s SCI-FI Biologicals, Pune यांच्याकडून खरेदी करण्यास रक्कम रू.७,३३,८३३/- इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०२०-२१ या वर्षाकरीता "रूग्णालयासाठी यंत्रे व इतर साधने" या भांडवली खर्चातील लेखाशिर्षाखाली तरतुदीमध्ये शिल्लक रक्कम रू.५७,३५,२०९/- मधून भागविता येणे शक्य होणार आहे. तरी मा.आयुक्त यांच्या निर्देशानुसार सदरची प्रयोगशाळा रसायने विनानिविदा खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेकामी मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे ५.२.२ कलम ६७ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य खरेदी करण्यास येणाऱ्या रक्कम रू७,३३,८३३/- (अक्षरी- रूपये सात लाख तेहतीस हजार आठशे तेहतीस रूपये व छपन्न पैसे मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी) 30/9
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९३५

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ३०/०९/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास Inj.Remdesivir 100 mg विनानिविदा खरेदी करणेस आदेश देणेकामी व त्याकामी येणाऱ्या खर्चाचे अग्रीम देयक अदा करणेकामी प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ माताबाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी रिध्दी विनायक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, गोन्सालो गार्सिया कॉलेज, वसई येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, अग्रवाल हॉस्पिटल-वसई पुर्व येथे विलगलीकरण कक्ष व म्हाडा बिल्डींग नं.१० येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले असून वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय स्थापन करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये करोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देतात. परंतु काही वेळा जीवनावश्यक असलेल्या औषधांचे दर ई-निविदेत मंजुर नसल्याने खरेदी करणे गैरसोयीचे होते. कोवीड रुग्णांकरीता जीवनावश्यक असणारे Inj.Remdesivir 100 mg ची आवश्यकता आहे. सदरचे औषध मे.सिपला लिमिटेड, मुंबई यांच्याकडे उपलब्ध असून याबाबतच्या दराचा व मागणीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	औषधाचे नाव	मुळ किंमत	सुधारित दर निश्चिती किंमत	मागणी	एकूण रक्कम (सर्व करासहित)
1	Remdesivir 100 mg	4,000	2182.88	1 x 1000	2182880
				Total	21,82,880/-

तरी मे.सिपला लिमिटेड, लोअर परेल, मुंबई यांनी १०० % अग्रीम देयकाची मागणी केली आहे. सद्यस्थितीत त्यांच्याकडे उपलब्ध असलेला इंजेक्शनचा साठा कमी प्रमाणात

असून कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता सदर इंजेक्शन त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास तुर्तास 1000 नग Inj.Remdesivir 100 mg खरेदी करणे कामी रु.२१,८२,८८०/- इतका खर्च अपेक्षित असून "रुग्णालय औषधी खरेदी" या लेखाशिर्षाखालील नमुद शिल्लक रक्कम रु.३,७६,३६,८१४/- या तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे. तरी सदरची औषधे विनानिविदा खरेदी करणे कामी मे.सिपला लिमिटेड, मुंबई यांना पुरवठा आदेश देणेस व येणाऱ्या खर्चाचे अग्रीम देयक अदा करणेकामी प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबतच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम क्र.५९ ५.२.२ व ६७ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त 1000 नग Inj.Remdesivir 100 mg खरेदी करण्यास येणाऱ्या रक्कम रु.२१,८२,८८०/- (अक्षरी-एकवीस लाख ब्याऐंशी हजार आठशे ऐंशी रुपये मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दूरध्वनी — ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स — ०२५०-२५२५१०७,

ई-मेल — vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १३६ विभाग :- मार्केट विभाग

दिनांक :- ३० /०९/२०२०

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या मार्केट/ बाजारपेठ सन २०२०-२१ व (माहे नोव्हेंबर २०२० ते मार्च २०२१ पर्यंत) एकूण ०५ महिन्याच्या कालावधीकरिता ई निविदा प्रक्रियने निविदा मागवून ठेका पध्दतीने बाजार कर वसुली करणेस मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'आय' अंतर्गत एकूण ९ बाजारपेठा असून त्यापैकी २ बाजारपेठा (उमेळा व वडवली) लहान स्वरुपाच्या असून अपंगासाठी राखीव आहेत. १ बाजारपेठ (तामतलाव) चे सुशोभिकरणाचे काम प्रस्तावित आहे. ३ बाजारपेठा (पापडी, होळी भाजी व होळी मासळी) मोठ्या स्वरुपाच्या आहेत. उर्वरीत ३ बाजारपेठा (नायगाव, गौळवाडा व कोळीवाडा) मध्यम स्वरुपाच्या आहेत. सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या तिन्ही वर्षाकरिता निविदा प्रक्रिया करुन देखिल ठेकेदाराकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे तसेच सन २०१९-२० मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणूक आचारसंहिता असल्याने निविदा प्रक्रिया प्रलंबित झाली. तथापि निविदेस मुदतवाढ देवून व फेर निविदा मागवून देखिल ठेकेदाराकडून अपेक्षित प्रतिसाद न लाभल्यामुळे मागिल वर्षाच्या मंजूर ठेकेदारास मंजूर रक्कमेवर १०% वाढ देऊन पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देण्यात आली होती. व उर्वरीत बाजारपेठांची कर वसुली महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात आली.

सद्यस्थितीत सदर ९ बाजारपेठांची वसुली करणे तसेच नव्याने सुरु झालेल्या खाऊगल्ली मध्ये बाजार कर वसुली करणेकरिता ई निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.

याकरिता सदर ९ मार्केटच्या मागील ३ वर्षाचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे —

अ.क्र	बाजारपेठांची नावे	वर्ष दिनांक पासुन ते पर्यंत	ठेकेदाराचे नाव	दरपत्रक निविदा रक्कम / रुपये	मनपा फंडात जमा रक्कम / रुपये	थकबाकी रक्कम / रुपये	शेरा
१	उमेळा अपंगासाठी राखीव	२०१७-१८	प्रविण वासुदेव पाटील	५५,०००/-	५५,०००/-	-	ठेका मंजूर
		२०१८-१९		६०,८५०/-	६०,८५०/- दंड ७००/- ए. ६१,५५०/-	-	ठेका मंजूर
		२०१९-२०		६७,७०४/-	६२,०६२/- दंड २,४००/- GST -११,१७६/- ए. ७५,६३८/-	मार्च २०२०चा मासिक हप्ता बाकी रक्कम ५,६४२/-	१०% वाढ करुन निविदा प्रक्रिया होईपर्यंत मुदतवाढ दिली.

२	वडवली अपंगासाठी राखीव	२०१७-१८	३ मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली	५६,२६५/- सन २०१७-१८ च्या कार्यालयीन निविदा टिपणी प्रमाणे	३७,३२०/-	-	निविदा प्रक्रिया करुन ठेकेदाराकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यामार्फत वसुली केली.
		२०१८-१९	प्रविण वासुदेव पाटील	५७,३७०/-	५७,३७०/-	-	ठेका मंजूर
		२०१९-२०	३ मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली	६३,१०७/-	४५,६००/-	-	निविदा प्रक्रिया करुन ठेकेदाराकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यामार्फत वसुली केली.
३	तामतलाव	२०१७-१८	३ मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली	-	२४,८६५/-	-	सुशोभिकरणाचे काम प्रस्तावित असल्याने मागील ३ वर्ष निविदा प्रक्रिया केलेली नाही. म्हणून कर्मचाऱ्यामार्फत वसुली केली.
		२०१८-१९		-	४४,६१०/-	-	
		२०१९-२०		-	३१,२५३/-	-	
४	पापडी	२०१७-१८	अर्श इंन्ट्रप्रायजेस	२२,१०,९२३/-	२३,९१,०००/-	-	मंजूर ठेका
		२०१८-१९		२६,३०,१००/-	२७,८२,८८०/-	-	१०% वाढ करुन निविदा प्रक्रिया होईपर्यंत मुदत वाढ दिली.
		२०१९-२०		२६,३०,१००/-	२४,१०,९२५/- दंड १७००/- GST - ४,३३,९७२/- २८,४६,४९७/-	मार्च २०२०चा मासिक हप्ता बाकी रक्कम २,१९,१७५	
५	होळी मासळी	२०१७-१८	३ मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली	६,७२,१००/-	४,७४,३५०/-	-	ठेकेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद नसल्याने निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. म्हणून कर्मचाऱ्यामार्फत वसुली केली.
		२०१८-१९		६,७२,१००/-	३,७१,३३०/-	-	
		२०१९-२०		६,७२,१००/-	२,६७,९४०/-	-	

६	होळी भाजी	२०१७-१८	३ मनपा कर्मचाऱ्या मार्फत वसुली	१०,९९,९९८/-	६,९५,०३०/-	-	ठेकेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद नसल्याने निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. म्हणून कर्मचाऱ्यामार्फत वसुली केली.
		२०१८-१९		१०,९९,९९८/-	६,२२,५३०/-	-	
		२०१९-२०		११,००,०००/-	४,८०,४००/-	-	
७	नायगाव	२०१७-१८	३ मनपा कर्मचाऱ्या मार्फत वसुली	४,३९,९९८/-	१,४१,०७०/-	-	ठेकेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद नसल्याने निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. म्हणून कर्मचाऱ्या मार्फत वसुली केली.
		२०१८-१९		४,३९,९९८/-	२,५४,४४०/-	-	
		२०१९-२०		४,४०,०००/-	१,९६,७१०/-	-	
८	गौळवाडा	२०१७-१८	३ मनपा कर्मचाऱ्या मार्फत वसुली	६,३८,६१०/-	४,७५,२६५/-	-	ठेकेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद नसल्याने निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. म्हणून कर्मचाऱ्या मार्फत वसुली केली.
		२०१८-१९		६,३८,६१०/-	४,१७,३७०/-	-	
		२०१९-२०		६,३८,०००/-	२,९८,७६०/-	-	
९	कोळीवाडा	२०१७-१८	राज कन्स्ट्रक्शन	६,१५,९७०/-	६,१५,९७०/-	-	मंजूर ठेका
		२०१८-१९	३ मनपा कर्मचाऱ्या मार्फत वसुली	६,७७,५६७/-	९६,०२०/-	-	ठेकेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद नसल्याने निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. म्हणून कर्मचाऱ्यामार्फत वसुली केली.
		२०१९-२०		१,०५,६२२/-	८४,८१०/-	-	

१०	खाऊ गल्ली	२०१७-१८	-	-	-	-	माहे फेब्रुवारी २०१९ पासून नव्याने सुरु झालेले खाऊ गल्ली करिता निविदा प्रक्रिया केली नाही.
		२०१८-१९	३ मनपा कर्मचाऱ्या मार्फत वसुली	-	१८,९९०/-	-	
		२०१९-२०		-	९४,२००/-	-	

<u>अ.क्र १.</u> **उमेळा बाजार (अपंगासाठी राखीव)** ठेकेदार श्री. प्रविण वासुदेव पाटील सन २०१९-२० फक्त माहे मार्च २०२० थकित रक्कम रु. ५,६४२/- वसुल करणे आवश्यक.

सन २०२०-२१ निविदा प्रसिध्दी माहे दि.०१/११/२०२० ते दि. ३१ /०३/ २०२१ या पाच महीन्याच्या कालावधी करीता करणे आवश्यक आहे. कारण निविदा प्रक्रिया करणेस अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असल्साने फक्त ५ महिन्याच्या कालावधी करिता निविदा रक्कम रु. २८,०००/- + रु. ५०४०/- एकुण रक्कम रुपये रु. ३३,०४०/- करिता ई निविदा प्रकिया करणे योग्य राहील. निविदा अंतिम होईपर्यंत मनपा कर्मचाऱ्यामार्फत दै. बाजार फी वसुली करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

<u>अ.क्र २.</u> **वडवली बाजार (अपंगासाठी राखीव)** सन २०१९-२० पासुन ठेकेदाराकडुन अपेक्षित प्रतिसाद मिळाले नसल्याने मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली सुरु आहे.

सन २०२०-२१ निविदा प्रसिध्दी माहे दि. ०१/११/२०२० ते दि. ३१ /०३/ २०२१ या ५ महीन्याच्या कालावधी करीता करणे आवश्यक आहे. कारण निविदा प्रक्रिया करणेस अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असल्साने फक्त ५ महिन्याच्या कालावधी करिता निविदा रक्कम रु. २०,०००/- + रु. ३६००/- एकुण रक्कम रु. २३,६००/- करिता ई निविदा प्रकिया करणे योग्य राहील. निविदा अंतिम होईपर्यंत मनपा कर्मचाऱ्यामार्फत दै. बाजार फी वसुली करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

<u>अ.क्र ३.</u> **तामतलाव बाजार** सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या कालावधीत मनपा कर्मचाऱ्यामर्फत दै. बाजार फी वसुल करण्यात आल्याचे दिसुन येते.

सन २०२०-२१ निविदा प्रसिध्दी माहे दि. ०१/११/२०२० ते दि. ३१ /०३/ २०२१ या ५ महीन्याच्या कालावधी करीता करणे आवश्यक आहे. कारण निविदा प्रक्रिया करणेस अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असल्साने फक्त ५ महिन्याच्या कालावधी करिता निविदा रक्कम रु. १५,५०० + रु. २७९०/- एकुण रक्कम रुपये रु. १८,२९० /-

करिता ई निविदा प्रकिया करणे योग्य राहील. निविदा अंतिम होईपर्यंत मनपा कर्मचाऱ्यामार्फत दै. बाजार फी वसुली करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

अ.क्र ४. **पापडी बाजार** ठेकेदार अर्श इंटरप्राईजेस ठेकेदाराकडुन माहे मार्च २०२० ची थकित रक्कम रु. २,१९,१७५/- वसुल करणे आवश्यक आहे.
सन २०२०-२१ निविदा प्रसिध्दी माहे दि. ०१/११/२०२० ते दि. ३१ /०३/ २०२१ या ५ महीन्याच्या कालावधी करीता करणे आवश्यक आहे. कारण निविदा प्रक्रिया करणेस अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असल्साने फक्त ५ महिन्याच्या कालावधी करिता निविदा रक्कम रु. ११,९३,०००/- + रु. २,१४,७४०/- एकुण रक्कम रुपये रु. १४,०७,७४०/- करिता ई निविदा प्रकिया करणे योग्य राहील. निविदा अंतिम होईपर्यंत मनपा कर्मचाऱ्यामार्फत दै. बाजार फी वसुली करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

अ.क्र ५. **होळी मासळी बाजार** सन २०१९-२० पासुन ठेकेदाराकडुन अपेक्षित प्रतिसाद मिळाले नसल्याने मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली सुरु आहे.

सन २०२०-२१ निविदा प्रसिध्दी माहे दि. ०१/११/२०२० ते दि. ३१ /०३/ २०२१ या ५ महीन्याच्या कालावधी करीता करणे आवश्यक आहे. कारण निविदा प्रक्रिया करणेस अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असल्साने फक्त ५ महिन्याच्या कालावधी करिता निविदा रक्कम रु. १,७०,५०० + रु. ३०६९०/- एकुण रक्कम रु. २,०१,१९०/- करिता ई निविदा प्रकिया करणे योग्य राहील. निविदा अंतिम होईपर्यंत मनपा कर्मचाऱ्यामार्फत दै. बाजार फी वसुली करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

अ.क्र ६. **होळी भाजी बाजार** सन २०१९-२० पासुन ठेकेदाराकडुन अपेक्षित प्रतिसाद मिळाले नसल्याने मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली सुरु आहे.

सन २०२०-२१ निविदा प्रसिध्दी माहे दि. ०१/११/२०२० ते दि. ३१ /०३/ २०२१ या ५ महीन्याच्या कालावधी करीता करणे आवश्यक आहे. कारण निविदा प्रक्रिया करणेस अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असल्साने फक्त ५ महिन्याच्या कालावधी करिता निविदा रक्कम रु. २,७५,०००/- + रु. ४९,५००/- एकुण रक्कम रु. ३,२४,५००/- करिता ई निविदा प्रकिया करणे योग्य राहील. निविदा अंतिम होईपर्यंत मनपा कर्मचाऱ्यामार्फत दै. बाजार फी वसुली करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

अ.क्र ७. **नायगाव बाजार** सन २०१९-२० पासुन ठेकेदाराकडुन अपेक्षित प्रतिसाद मिळाले नसल्याने मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली सुरु आहे.

सन २०२०-२१ निविदा प्रसिध्दी माहे दि. ०१/११/२०२० ते दि. ३१ /०३/ २०२१ या ५ महीन्याच्या कालावधी करीता करणे आवश्यक आहे. कारण निविदा प्रक्रिया करणेस

अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असल्साने फक्त ५ महिन्याच्या कालावधी करिता निविदा रक्कम रु. ९९,६०० + रु. १७,९२८/- एकुण रक्कम रु. १,१७,५२८/- करिता ई निविदा प्रकिया करणे योग्य राहील. निविदा अंतिम होईपर्यंत मनपा कर्मचाऱ्यामार्फत दै. बाजार फी वसुली करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

अ.क्र ८. गौळवाडा बाजार सन २०१९-२० पासुन ठेकेदाराकडुन अपेक्षित प्रतिसाद मिळाले नसल्याने मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली सुरु आहे.

सन २०२०-२१ निविदा प्रसिध्दी माहे दि. ०१/११/२०२० ते दि. ३१ /०३/ २०२१ या ५ महीन्याच्या कालावधी करीता करणे आवश्यक आहे. कारण निविदा प्रक्रिया करणेस अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असल्साने फक्त ५ महिन्याच्या कालावधी करिता निविदा रक्कम रु. १,८२,०५०/- + रु. ३२,७६९/-एकुण रक्कम रु. २,१४,८१९/- करिता ई निविदा प्रकिया करणे योग्य राहील. निविदा अंतिम होईपर्यंत मनपा कर्मचाऱ्यामार्फत दै. बाजार फी वसुली करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

अ.क्र ९. कोळीवाडा बाजार सन २०१९-२० पासुन ठेकेदाराकडुन अपेक्षित प्रतिसाद मिळाले नसल्याने मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली सुरु आहे.

सन २०२०-२१ निविदा प्रसिध्दी माहे दि. ०१/११/२०२० ते दि. ३१ /०३/ २०२१ या ५ महीन्याच्या कालावधी करीता करणे आवश्यक आहे. कारण निविदा प्रक्रिया करणेस अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असल्साने फक्त ५ महिन्याच्या कालावधी करिता निविदा रक्कम रु. १,२१,८००/- + रु. २१,९२४/- एकुण रक्कम रु. १,४३,७२४/- करिता ई निविदा प्रकिया करणे योग्य राहील. निविदा अंतिम होईपर्यंत मनपा कर्मचाऱ्यामार्फत दै. बाजार फी वसुली करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

अ.क्र १०. खाऊ गल्ली बाजार सन २०१९-२० पासुन निविदा प्रक्रिया झाली नसल्याने मनपा कर्मचाऱ्यामार्फत वसुली सुरु आहे.

सन २०२०-२१ निविदा प्रसिध्दी माहे दि. ०१/११/२०२० ते दि. ३१ /०३/ २०२१ या ५ महीन्याच्या कालावधी करीता करणे आवश्यक आहे. कारण निविदा प्रक्रिया करणेस अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असल्साने फक्त ५ महिन्याच्या कालावधी करिता निविदा रक्कम रु. २६,०००/- + रु. ४६८०/- एकुण रक्कम रु. ३०,६८०/- करिता ई निविदा प्रकिया करणे योग्य राहील. निविदा अंतिम होईपर्यंत मनपा कर्मचाऱ्यामार्फत दै. बाजार फी वसुली करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये अ.क्र.१ उमेळा बाजार व अ.नु.४ पापडी बाजार या दोन ठिकाणी मा.आयुक्त साहेबांच्या निर्देशानुसार दै. बाजार फी मनपा कर्मचाऱ्यामार्फत

वसुल करणे बंद आहे. तसेच अ.क्र.२,३,५,६,७,८,९ व १० या आठ बाजाराच्या ठिकाणी मनपा कर्मचाऱ्यामार्फत दि. १/०४/२०२० ते दि. १५ /०९/ २०२० पर्यत रक्कम रुपये ५६,४६०/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली.

ठराव :-

सन २०२०-२१ मध्ये प्रभाग समिती आय- वसई अंतर्गत एकूण १० .बाजाराची दै. बाजार फी ई निविदा प्रक्रिया आजतागायत प्रलंबित असुन दि.०१/११/२०२० ते दि.३१/०३/२०२१ या पाच महीन्याच्या कालावधी करीता सदर ई निविदा प्रक्रीया पुर्ण होणे कामी अंदाजे कमीत कमी एक ते दीड महीन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे वार्षिक निविदेच्या रक्कमेच्या अनुंषगाने फक्त पाच महीन्याकरिता येणारी दै. बाजाराची रक्कम ही किमान आधारभूत रक्कम गृहीत धरुन निविदा प्रक्रिया करण्याच्या मान्यतेस्तव तसेच निविदा प्रकिया पुर्ण होईपर्यत दै. बाजार फी ची वसुली महानगरपालिका कर्मचा-यामार्फत करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ९३७

विभाग :- आरोग्य विभाग
दिनांक :- 30/12/2020

प्रस्तावाचा विषय :- **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दैनंदिन रस्ते सफाई करणेकामी यांत्रिक झाडू (Road Sweeping Machine Vehicle) खरेदी करणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि.३ जूलै २००९ रोजी झाली असून भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई या शहराच्या लगतचे शहर म्हणून वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्राची दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार वसई विरार शहराची लोकसंख्या १२,२२,३९० एवढी असून सद्या स्थितीत अंदाजे २० लक्ष लोकसंख्या असून त्यामध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. वाढती लोकसंख्या व शहरीकरणाचा विचार करता महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत प्रभाग समिती A ते I मध्ये दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन या दैनंदिन स्वच्छतेच्या कामाकरिता २० झोन तयार करुन २० अभिकर्त्यांची नेमणूक केली आहे. वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात निर्माण होणारा घनकचरा संकलन व गटार सफाई करणेकामी प्रभाग निहाय कचरा संकलनासाठी १३७४ एवढे मनुष्यबळ सद्यस्थितीत कार्यरत आहेत. तसेच गटार सफाईसाठी ७८६ व रस्ते सफाई करण्यासाठी १२५२ असे एकुण ३४१२ मनुष्यबळ सद्यस्थितीत कार्यरत आहेत.

तरी वसई विरार शहर महानरगपालिका कार्यक्षेत्रात ९२४ कि.मी. लांबीचे रस्ते असून सदरील रस्त्यांची स्वच्छता करणेकामी १२५२ मनुष्यबळ सद्यस्थितीत उपलब्ध आहेत. सदरील मनुष्यबळावर मासिक खर्च रक्कम रु.३,०४,७२,४२७/- एवढा होत असून सदरील खर्च मोठया प्रमाणात होत असल्याने तसेच वाढते शहरीकरणामुळे दिवसाघडीत रस्त्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे भविष्यात सदरील रस्त्यांची स्वच्छता करणेसाठी मोठया प्रमाणात मनुष्यबळाचा वापर करावा लागणार आहे. सदरील बाब हि खर्चीक असल्याने सदरील कामाच्या खर्चावर नियंत्रण मिळविण्यासाठी रस्ते यांत्रिक पध्दतीने स्वच्छ केल्यास कमी मनुष्यबळ व वेळेची बचत होऊ शकते तसेच मनुष्यबळावर होणाऱ्या खर्चास हि आळा घालता येऊ शकतो.

तरी भविष्यात रस्ते सफाईचा विचार करता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ते सफाई करणेकामी यांत्रिक झाडू (Road Sweeping Machine Vehicle) ने रस्ते स्वच्छतेसाठी वापरल्यास रस्त्यावरील माती, गवत व केर कचरा यांत्रिक झाडूने उचल्यास मनुष्यबळावरील खर्च व वेळेची बचत होणार असल्याने मा.आयुक्त महोदय यांच्या सुचनेनुसार खरेदी करण्यात येणाऱ्या यांत्रिक झाडूचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ क्र	वाहनाचे नाव	प्रति मशीन दर	GST १८%	खरेदी करावयाच्या मशिनची संख्या	GST सह दोन मशीन खरेदीसाठी होणारा एकूण खर्च
१	यांत्रिक झाडू (Road Sweeping Machine Vehicle)	रु.१,८०,००,०००/-	रु.३२,४०,०००/-	२	रु.४,२४,८०,०००/-

तरी वरीलप्रमाणे यांत्रिक पध्दतीने रस्ते सफाईसाठी यांत्रिक झाडू (Road Sweeping Machine Vehicle)खरेदी करणेकामी अंदाजे GST सह रक्कम रु.४,२४,८०,०००/- (अक्षरी रक्कम रु.चार कोटी चोवीस लक्ष ऐंशी हजार मात्र) एवढा खर्च अपेक्षीत आहे. तसेच सदर वाहनांची ५ वर्ष देखभाल दुरुस्ती करुन सदर वाहने चालकासह दोन पाळीमध्ये काम करण्याकरिता दर मागविण्यात येणार आहेत. सदरील खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील लेखाशिर्ष घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इत्यादी साफसफाईसाठी घंटा गाडी यांत्रिक झाडू उपलब्ध करणेसह ठेका व भाडयाच्या वाहनाद्वारे यांत्रिक पध्दतीने नाले सफाई या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद रक्कम रु. १५५ मधून भागविणे शक्य आहे.

तरी वसई विरार शहर महनगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ते यांत्रिक पध्दतीने सफाई करणेकामी यांत्रिक झाडू (Road Sweeping Machine Vehicle) ई-निविदा प्रक्रियेने वाहन विभागाकडून खरेदी करणेकामी व त्यासाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

<u>ठराव निर्णय</u> :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्ते सफाई करणेसाठी स्वच्छता विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे २ नग (Sweeping Machine Vehicle) यांत्रिकी झाडूने स्वच्छता करावयाची वाहने खरेदी करणेत येत आहेत. सदर वाहनांचा हमी कालावधी १ वर्षे असणार आहे. ही वाहने स्पेशल वेहीकल म्हणून आहेत. सदर वाहनांचा हमी कालावधी संपलेनंतर वाहन सुस्थितीत ठेवण्यासाठी वेळेवर दुरुस्ती होणे आवश्यक आहे. करिता हमी कालावधी संपल्यानंतर सदर वाहनांवर पुढील ५ वर्षे वाहन चालकासहीत वार्षिक देखभाल दुरुस्तीचा ठेका काढण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका